रविवार, १३ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 13 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-18 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5



# वसंत मुंडे यांनी उपस्थित केलेले प्रश्न विधान परिषदेत मांडू

## आमदार श्रीकांत भारतीय यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या सोशल मीडिया कार्यशाळेत आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी लढा देत आहेत. पत्रकारांच्या खांद्याला खांदा लावून आपण काम करू. वसंत मुंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सजग असून हे प्रश्न विधान परिषदेत प्रभावीपणे मांडू, अशी ग्वाही भाजपचे प्रदेश महामंत्री तथा विधान परिषद आमदार श्रीकांत भारतीय यांनी शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथे दिली.**



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे सोशल मीडिया प्रशिक्षण कार्यशाळा आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या सत्कार सोहळ्यात आमदार श्रीकांत भारतीय उद्घाटक म्हणून बोलत होते. छत्रपती संभाजीनगर येथील अदालत रोडवरील आय.एम. ए. हॉलमध्ये महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई आयोजित सोशल मीडिया प्रशिक्षण कार्यशाळेला राज्यातील शेकडो पत्रकारांनी सहभाग नोंदवला. प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन विधान परिषद आमदार श्रीकांत भारतीय यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, प्रमुख अतिथी म्हणून दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, दैनिक पुढारी, मराठवाडा आवृत्तीचे संपादक धनंजय लांबे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे, जेष्ठ पत्रकार संतोष मानुरकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पहिले सत्र पार पडले. उद्घाटनपर भाषणात आमदार श्रीकांत भारतीय म्हणाले की, केवळ फोटो पोस्ट करणे याचा अर्थ सोशल मीडिया हाताळणे असे होत नाही. संपूर्ण राज्यात सदस्य संख्या असलेला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ आणि त्याचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे हे अतिशय क्रियाशील पत्रकार आहेत. समाजातील तळागाळातील लोकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम मुंडे यांनी आजवर केले आहे. त्यांच्यात संवेदनशील पत्रकार, कार्यकर्ता आणि नेता दडलेला आहे, असे गौरवोद्गार भारतीय यांनी काढले. तसेच तुम्ही किती दिवस दुसऱ्याच्या मुलाखती घेणार आहात, आता तुमच्या मुलाखती घेतल्या जातील, या वळणावर आपण आहात, असे म्हणत त्यांनी वसंत मुंडे यांना थेट राजकारणात येण्याचे आवाहन केले. देण्यात जो आनंद आहे तो कशातच नाही. त्यामुळे देणारे व्हा, गरज नसताना शासकीय सवलती घेऊ नका. यासाठी आमच्या सरकारने नियमात अनेक चांगले बदल केले आहेत. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे जिथे अनुदान परत करणे आता शक्य झाले आहे. याच धर्तीवर मी आगामी काळात सरकारी अनुदान परत करावे यासाठी जनजागृती चळवळ विविध संस्था संघटना सोबत घेऊन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांनी केले. याप्रसंगी संपादक चंदुलाल बियाणी, संपादक धनंजय लांबे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे यांनीही मनोगत मांडले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबा श्रीहरी देशमाने, नीळकंठ कराड, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, ठाणे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, नगरचे जिल्हा अध्यक्ष दत्ता घाडगे, जालना जिल्हा अध्यक्ष दिगंबर गुजर, जळगाव जिल्हा अध्यक्ष शरद कुलकर्णी, नितीन शिंदे, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष सोमेश्वर सोनटक्के, शांताराम मगर, अनिल सावंत, छबुराव ताके, विलास शिंगी, मुकेश मुंदडा, मनोज पाटनी, संजय व्यापारी, संदीप घंटे, राजन भोजने, आरेफ देशमुख, अखलाक देशमुख, सुधीर कोर्टीकर, बाळासाहेब जोगदंड, अतुल खंडगावकर, कृष्णा कोल्हे, अभय विखणकर, आकाश ठाकूर, प्रकाश लकडे, गोकुळसिंग राजपूत, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले. पहिल्या सत्राचे आभार अनिल सावंत यांनी मानले. मराठवाड्यातील नामांकित कवी दिवंगत ना. धों. महानोर, जेष्ठ विचारवंत हरी नरके यांना पत्रकार संघाच्यावतीने श्रध्दांजली वाहण्यात आली. सोशल मीडियाचे वाढते प्रस्थ लक्षात घेता, पत्रकार संघातर्फे राज्य पातळीवरील पदाधिकारी, विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष यांच्यासाठी एकदिवसीय सोशल मीडिया प्रशिक्षण शिबिरात संगणक तज्ज्ञ अतुल नाईक, ऋषिकेश पवार यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ पत्रकार, हरहुन्नरी कलाकार सुधीर कोर्टीकर यांनी काढलेल्या अप्रतिम फुलांच्या रांगोळीचे मान्यवरांनी तोंडभरून कौतुक केले. तसेच आ. श्रीकांत भारतीय यांनी कोर्टीकर यांचा सत्कार केला. नामांकित गायक प्रसाद साडेकर यांनी बहारदार महाराष्ट्र गीत गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

### प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा झाला यथोचित गौरव

लोकमत माध्यम समूहाचा अतिशय प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पातळीवरील "एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना दुबईत प्रदान करण्यात आला . त्या अनुषंगाने पत्रकार संघाच्या वतीने मुंडे यांचा आ .श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते गौरव करण्यात आला . यावेळी त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा अक्षय मिटकरी यांनी तयार केलेला लघुपट दाखविण्यात आला . अधिस्वीकृती समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल चंदन शिरवाळे, डॉक्टरेट पदवी प्राप्त झाल्याबद्दल विश्वास आरोटे यांचाही सत्कार करण्यात आला .

### आमदार श्रीकांत भारतीय यांनी पत्रकार संघाचे पालकत्व स्वीकारावे : वसंत मुंडे



पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर रचनात्मक आणि संघर्षात्मक अशा दोन्ही पातळीवर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व्यापक लढा देत आहे . पत्रकारितेपलिकडे जावून रक्तदान शिबिरे, अवयवदान जनजागृती चळवळ, नेत्रदान जनजागृती चळवळ राबवून पत्रकार संघाने विधायक कार्य केले आहे . आमदार श्रीकांत भारतीय हे संवेदनशील लोकप्रतिनिधी तथा मूळ पत्रकार आहेत . त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पालकत्व स्वीकारावे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केले .

### परळी तालुक्याचे भूमिपुत्र असलेल्या वसंत मुंडे यांचा अभिमान




लोकमत माध्यम समूहाचा अतिशय प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पातळीवरील "एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना दुबईत प्रदान करण्यात आला . परळी तालुक्याचे भूमिपुत्र म्हणून आम्हाला त्यांचा अभिमान आहे . पुरस्कार मिळाल्याबद्दल जसा त्यांचा छत्रपती संभाजीनगरात गौरव होत आहे त्यापेक्षाही मोठा गौरव समारंभ आम्ही परळीत आयोजित करू, असे प्रतिपादन मराठवाडा साथीचे मुख्यसंपादक चंदुलाल बियाणी यांनी केले .



**वसंत मुंडे यांची प्रामाणिक पत्रकारिता** : दैनिक पुढारी, मराठवाडा आवृत्तीचे संपादक धनंजय लांबे यांनी प्रसंगी बोलताना सांगितले, पत्रकार वसंत मुंडे यांच्या पत्रकारितेचा आज सर्वत्र गवगवा होतो आहे . मात्र आपणास काही मिळावे या हेतूने त्यांनी कधीच पत्रकारिता केली नाही . जे काही चांगले करता येईल . ते अगदी प्रामाणिकपणे करत राहिले, त्यासाठी ते गौरवास पात्र आहेत, अशा शब्दांत त्यांनी मुंडे यांचा सामाजिक पत्रकारितेची प्रशंसा केली .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आजकाल तुम्ही टीव्ही वर ज्या हॉर्लिक्स, कॉम्प्लान यासारख्या जाहिराती पाहता ना, त्यात दुसरे काय असते ? फक्त त्याला चॉकलेटची चव दिलेली असल्याने ते तुम्हाला आवडते इतकेच ! मॅगी, कुरकुरे या सारखे बाजारू पदार्थ खाण्यापेक्षा हे सातूचे पीठ शतपटीने चांगले असते बरं का बाळांनो. आणि यासाठी काही फार पैसे लागत नाहीत. हे सगळे पदार्थ सर्वसामान्यांच्या घरात सहज उपलब्ध असतात.' ' आई, आपल्याकडे पण कर ना हे सातूचे पीठ. आम्ही पण अधूनमधून खात जाऊ.' पिंकी म्हणाली. एवढ्यात निर्मलाताई दोन पिशव्या घेऊन आल्या. ' हे बरोबर घेऊन जा.' त्या श्यामलाताईंना म्हणाल्या. ' वहिनी, अहो हे काय आणलंत ? ' काही विशेष नाही. अहो, थोडं कळण्याचं पीठ आणि सातूचं पीठ दिलं आहे. मुलांना करून देत जा घरी.' निर्मलाताई म्हणाल्या. ' वा वा. खूप छान. मी देईन मुलांना करून. आणि आता तुम्ही आणि भावजी दोघेही या आमच्याकडे दोन दिवस राहायला.' श्यामलाताई म्हणाल्या. ' नक्की येऊ. अहो, वहिनी, श्यामकडे तर आम्ही हक्काने येणार. आपलंच घर आहे.' सोपानराव म्हणाले. सगळ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला. श्यामलाताई आणि मुले गाडीत बसली. श्यामरावांनी स्टिअरिंगचा ताबा घेतला आणि गाडी मार्गस्थ झाली. सकाळची रम्य वेळ होती. श्यामराव आनंदात गाडी चालवत होते. बऱ्याच दिवसांनी आपला बालमित्र भेटल्याने आणि त्याच्याकडे राहून गप्पा मारल्याने त्यांचा मूड फ्रेश होता. छानपैकी ऊन पडले होते. वातावरणात सुखद गारवा होता. ' फिटे अंधाराचे जाळे ' हे गाणे त्यांच्या ओठी त्या वातावरणामुळे आपोआप आले होते. सोपानरावांकडे रात्रभर मुक्काम केल्यामुळे पिंकी आणि राजेश खुश होते. सोपानरावांनी गावात त्यांना कुंभार आळी, रामू लोहाराचे दुकान आदी वेगवेगळ्या ठिकाणी फिरवून आणल्याने त्यांना त्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. त्यांच्या मनात त्याबद्दल बरेच प्रश्न होते. गाडीत त्याबद्दल त्यांच्या गप्पा सुरु होत्या. श्यामलाताई आणि सोपानराव यांचे एक वैशिष्ट्य होते. मुलांची उत्सुकता आणि कुतूहल ते कधी दाबून ठेवत नसत. आपल्या परीने ते त्यांचं समाधान करण्याचा प्रयत्न करीत असत. माहिती नसेल तर माहिती घेऊन सांगत. श्यामराव आणि श्यामलाताई या दोघांचेही अवांतर वाचन बऱ्यापैकी होते. त्यामुळे ते मुलांचे कुतूहल शमवू शकत. मुलांनाही आपल्या आईवडिलांबाबत धाक असण्याऐवजी प्रेम आणि आदर होता.
पिंकी शामलाताईंना म्हणाली, ' आई, सोपानकाकांच्या छोट्याशा गावात किती नवीन गोष्टी आपल्याला बघायला मिळाल्या नाही ?



समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## अंतरंग व अंतर्मनाचे महत्त्व अबाधित असते

आधुनिक केसरी

आपल्या भविष्यातील योग हे नशिबावर नाही तर आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार यांवर अवलंबून, आधारलेले असतात. कालचा दिवस संपला तरंच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन विसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय रिणांनी आपलं नवं आयुष्यच जणू काही सुरु होत असतं. विसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. हल्ली जगात पैशानं काहीही विकत घेता येतं आणि विकताही येतं. असं जरी असलं तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायानं निराश होतो. आजचा दिवस माझा, हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केलं पाहिजे. आपल्याला आपण स्वतः प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वतःला सिद्ध करण्याची जरुरी असते हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वतःला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आलं पाहिजे, आपण ध्यानांत घेतलं पाहिजे. अनेकदा नकारात्मक विचारच आपलं नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानानं आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचं अनुभवायला येऊ लागतं.

# वेळ...

आधुनिक केसरी

कोणती वेळ कोणावर कशी येईल ते आपण सांगू शकत नाही. असं आपण नेहमीच म्हणतो .वेळ या शब्दाला खूप महत्त्व आहे. एक चांगला अर्थ आहे .पण आरशासारखा त्यालाही पारा चिकटला आहे. त्यामुळे वेळ पारदर्शी नाही. वेळ चांगली ही येते व कधी कधी वेळ धोकाही देते. खूप प्रयत्न केल्यानंतर, खूप कष्ट घेतल्यावर ,खूप संकटाचा सामना केल्यानंतर ,कितीतरी अडीअडचणींना तोंड दिल्यानंतर वेळ चांगली येते असं म्हणतात ..बरं ठीक आहे, येते वेळ चांगली. एवढं सगळं भोगल्यानंतर.... पण मग आधी आपण एवढा त्रास भोगतो त्याचं काय ?? तो त्रास भोगावच लागतो. त्याशिवाय चित्रपटच पूर्ण होत नाही.. असंच आपल्या जीवनाचं आहे .आपलं जीवन ,आपलं आयुष्य हे एक चित्रपटच आहे. फक्त आपल्या चित्रपटाचं वय 50, 60, 70, 80 कितीही असू शकतं. आणि पडद्यावरचा चित्रपट संपूर्ण आयुष्याचा तीन तासात संपतो. तेच जीवन आपण आयुष्यभर जगतो. सांगायचं तात्पर्य असं की वेळ ही खूप पटकन हातातून निसटून जात असते. फुलपाखरांसारखी धरू जाता दूर निघून जाते. म्हणूनच वेळेला महत्त्व द्या. " टाईम इज मनी" खरंच वेळ पैशापेक्षाही मोठी आहे. वेळच्या वेळी प्रिय आप्तेष्टांना भेटा ,बोला.. पाण्याच्या बुडबुड्यासारखं आपलं आयुष्य आहे. कधी अचानक एक्झिट घेईल माहित नाही ?? सतत चांगले विचार, सकारात्मक वृत्ती, समाधानी, आनंदी राहिल्याने मनाचे आजार दूर होतात .मन निरोगी असेल तर शरीर निरोगी राहते. वेळ ही सगळ्यांच्याच आयुष्यात खूप महत्त्वाची असते.सगळ्या गोष्टी वेळेवर केल्या आणि त्या योग्य वेळी केल्या तर फारच उत्कृष्ट असं म्हणता येईल . आपल्याकडे एक म्हण सुद्धा आहे "वेळ मारून नेणे". आता वेळेला कसं मारतात ? म्हणजेच एखाद्या वेळी, एखाद्या प्रसंगी जर आपल्याला कोणी काही विचारलं तर त्यावेळी आपल्याला ताबडतोब समोरच्याला पटेल असं बोलता आलं पाहिजे, उत्तर देता आलं पाहिजे .त्या वेळी तिथल्या वातावरणाला साजेसं असं आपण बोललं तर त्याला वेळ मारून नेणे असे म्हणतात. म्हणजे त्यावेळची जी परिस्थिती होती त्यावेळी समोरच्या लोकांना आपण जे बोलणं हवं होतं जे योग्य होतं ते आपल्याकडून जर बोलल्या गेलं तर आपण त्याला वेळ मारून नेणे असे म्हणतो. कारण त्यावेळी समोरच्या व्यक्तींच्या प्रश्नाला आपण उत्तर देणे आवश्यक असतं. त्यांना आपल्याकडून त्यावेळी त्या प्रश्नांचे उत्तर अपेक्षित असतं .आणि त्यांचं समाधान सुद्धा झालं पाहिजे. म्हणून त्यावेळी आपल्याला तेवढ्याच तत्परतेनं आणि योग्य असं उत्तर त्यांच्या प्रश्नांना देता आलं पाहिजे. नंतर आपण भलेही म्हणतो की बरं झालं त्यावेळी मला हेच सुचलं आणि वेळ मारून नेता आली. पण आता खोलात जाऊन बघावं लागेल त्या गोष्टीचा योग्य अर्थ काय आहे ? किंवा योग्य ते काय आहे ? खरं काय आहे ? बरोबर काय आहे ? या गोष्टींचा उहापोह केलाच पाहिजे .त्यासाठी आपल्याला बऱ्याच गोष्टीचे वाचन आणि माहिती हवी असते .म्हणजे वेळप्रसंगी योग्य वेळी वेळ मारून नेता येते. इतकी ही वेळ सर्वांसाठी खूप महत्त्वाची आहे. तेव्हा वेळेची किंमत करू. वेळेला महत्त्व देऊ . सगळ्या गोष्टी वेळच्यावेळी करू .कोणतीही गोष्ट अवेळी केल्याने त्याचे अपचन होते. आणि मग ते सर्वांसाठीच त्रासदायक ठरते .म्हणून मनाची खूप काळजी घेऊ या, आपल्या व दुसऱ्यांच्याही... वेळेला महत्त्व देऊ.वेळ पाळून वेळेत सर्व गोष्टी करू. कराला ना!!! ?

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.११

# निरूपण

आधुनिक केसरी

अम्भोजवदने देवि हृत्कमलं विलसेच्च मे |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
६४ || हे कमलवदने, देवी, माझे हृदयकमल विलसित व्हावे. आनंदी व्हावे. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन संयुत क्रिय कर्म है, भक्ति है आतम धार ।
सुरति निरति ध्वनि गगन में, भक्ति परम तत्त्व सार ।।३७।।(स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/३७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : मनाशी संयुक्त होऊन जी क्रिया होते, ते कर्म आहे आणि जी शुद्ध आत्म्याद्वारे क्रिया होते, ती भक्ती आहे. कर्म हा मनाचा विषय आहे तर भक्ती आत्म्याचा विषय आहे. आत्मा भक्ती द्वारे सुरती-निरतीने गगनातील निःशब्द ध्वनी सारशब्द, परम तत्त्वाला म्हणजेच परमेश्वराला प्राप्त करतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

गाई विसरल्या चार । पक्षी श्वापदांचे भार । जालें यमुनेचें स्थिर । जळ वाहों ठेलें ।
देव पाहाती सकळ । मुखें घोटूनियां लाळ । धन्य म्हणती गोपाळ । धिग जालों आम्ही ॥९॥
म्हणती कैसें करावें । म्हणती कैसें करावें । यमुनाजळीं व्हावें । मत्स्य शेष घ्यावया ।
सुरवरांचे थाट । भरलें यमुनेचें तट । तंव अधिक ची होंट । मटमटां वाजवी ॥१०॥
आनंदें सहित । क्रीडा करी गोपीनाथ । म्हणती यमुनेंत हात । नका धुवुं कोणी ।

# मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

पुढच्या समासात समर्थ सांगतात की, आत्मा पिंड आणि ब्रम्हांड यांच्या उपाधीने लहामोठा भासतो पण तो मूळ एकचं आहे. तिथे भेदभावाला अजिबात थारा नाही. आत्मा अत्यंत सूक्ष्म आहे व तो सर्व व्यापून शिल्लक रहातो. म्हणून सर्वत्र दिसणारे या अफाट विश्वात प्रत्येक वस्तूला आत्मा आंतबाहेर निरंतर व्यापून आहे. त्याचे वर्णन करण्याचे सामर्थ्य प्रत्यक्ष शेषाच्या अंगी देखील नाही. आत्मा कसा अत्यंत सूक्ष्म आहे व तो सर्व व्यापून आहे हे ज्यांच्या अनुभवास आले त्यांचे जीवपण शिल्लक उरत नाही. त्याचा जीवभाव नाहींसा होतो उपाधीचा ठाव घेऊन ती बाजूला सारली की आत्मा मुळात
भेदरहित आहे हे समजते. माणूस जीवपणाने एकदेशी बनतो,संकुचित होतो. मी देह आहे या अहंकाराने त्याला जन्म सोसावे लागतात. जन्म मरणाच्या फेरीत तो अडकून बसतो. जन्ममरणाच्या कचाट्यातून जो सुटला त्याला मोक्ष मिळाला असे समजावे. तत्वांचा शोध घेता घेता माणूस सद्विचारावर चालतो . म्हणजे ब्रम्ह अनुभवतो. आपण स्वतः प्रत्यक्ष परब्रम्हाच आहोत असा या वाक्याचा खरा अर्थ आहे. सतत सन्मानित, सन्मानाने सत्कर्म करत जगावे हेच या निमित्ताने सांगणे आहे. आपल्यात असलेले अज्ञान हे दूर करण्यासाठी ज्ञानपूर्वक विवेकाने देहबुध्दि नाहिशी करून आत्मोन्नती करावी . अज्ञानरूपी रात्र संपवणे व ज्ञानाचा प्रकाश पाडणे हे आपल्याच हातात आहे हेच खरे ना! त्यासाठी सतत सन्मार्गाचा रस्ता धरा.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल

आधुनिक केसरी

नामात प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते अन्न गोड लागत नाही अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का याचे उत्तर आपल्याला स्वतःकडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे ते माझे आद्य कर्तव्य आहे त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की आम्ही नाम खऱ्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे घेण्याच्या निश्चयाने ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही.



नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे म्हणजे अंतःकरणाची शुध्दता होईल आणि अंतःकरण शुध्द झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामांतच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तिवर परिणाम होऊन तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता बसता चालता बोलता आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोडया श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे. ८. नामाचे प्रेम यायला एक गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे किंवा दुसरे नामातच माझे कल्याण आहे या भावनेने घ्यावे.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

अमुक एक साधन करीत जा म्हणून सद्गुरूने सांगितले, आपण ते अट्टाहासाने करू लागलो, पण आपले विचार जर आहेत तसेच राहिले, तर भगवंताचे प्रेम येणार कसे ? चारपाच वर्षे खूप कष्ट केले, विषय बाजूला ठेवले, पण अजून कसा अनुभव येत नाही असे म्हणू लागलो, तर साधनाचा जोर कमी होतो आणि निष्ठा घसरायला लागते. जे काही होणार ते सद्गुरूच्याच इच्छेने, त्याच्याच प्रेरणेने होते, अशी आपली ठाम श्रद्धा पाहिजे. साधनाचे प्रेम तो भगवंतच देतो, हे आपण विसरून जातो. आपण पूर्वी काही साधन करीत नव्हतो, ते आता करू लागलो, असा साधनाबद्दलचा अभिमान बाळगू लागलो तर काय उपयोग ? सद्गुरूच्या पायावर एकदा डोके ठेवले की काहींचे काम होते, यात सद्गुरू पक्षपात करतात असे कसे म्हणता येईल ? आपलेच कुठेतरी चुकत असले पाहिजे याचा विचार करावा. आजवर देवाचे नाव घेणे बरे असे वाटत होते,. क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यः स्वभावो हि यस्यास्ति स नित्यं दुरतिक्रमः ।
वा यदि क्रियते राजा स किं नाश्नात्युपानहम् ||

सरलार्थ – खरोखर ज्याचा जो स्वभाव असतो, तो कधीच बदलत नाही. कुत्र्याला जरी राजा केले, तरी तो वहाणा चघळण्याचे सोडील काय ?

स्पष्टीकरण - स्वभाव बदलणे मोठे कठीण असते. यासाठी प्रत्येक माणसाचा भाव लक्षात घेऊन त्या अनुरोधानेच त्याच्याकडून काम करून घ्यावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
adhunikkesari.com Adhunik Kesari
रविवार, १३ ऑगस्ट २०२३

# आत्मनिर्भर भारत नेईल देशाला प्रगतीच्या सर्वोच्च शिखरावर

## ना. सुधीर मुनगंटीवार : विद्यार्थ्यांकरिता विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भातील तरुणांमध्ये प्रचंड उत्साह आणि ऊर्जा आहे. बुद्धिमत्तेच्या जोरावर इथल्या तरुणांनी आपली वैचारिक क्षमता सिद्ध केली आहे. अशाच तरुणांच्या जोरावर आत्मनिर्भर भारताच्या माध्यमातून देश प्रगतीच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचणार आहे, असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. २०४७ साली १५ ऑगस्टचा तिरंगा भारताच्या आकाशात उंच फडकेल, तेव्हा संपूर्ण जग तिरंग्याला सलाम करेल, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.



**ज्ञानातून साधावे समाजहित :** ‘दिल्लीचेही तक्त राखतो महाराष्ट्र माझा’ याप्रमाणे महाराष्ट्राच्या विदर्भातील नागरीकांचे योगदान सोनेरी अक्षरात लिहिले जाईल. विद्यार्थ्यांनी विविध विषयावर विचार मांडले. विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता व वैचारिक क्षमतेचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. त्यामुळे आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वत :साठी न करता इतरांसाठी व समाजासाठी करावा. या ज्ञानातून समाज हितासाठी योगदान देण्याची भावना ठेवावी, असे आवाहनही ना. मुनगंटीवार यांनी विद्यार्थ्यांना केले.

प्रियदर्शनी सभागृहात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आत्मनिर्भर भारत विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल, कार्यक्रमाचे आयोजक भाजपाचे नेते रामपाल सिंग, भाजपा आत्मनिर्भर भारत आघाडीच्या जिल्हाध्यक्ष किरणताई बुटले, भाजपा चंद्रपूर महानगरचे अध्यक्ष राहुल पावडे, भाजपाचे नेते नामदेव डाहुले, स्पर्धेचे परीक्षक भाजयुमो जिल्हाध्यक्ष आशिष देवतळे, बिपीन गुप्ता, प्रशांत ठाकरे, एसएनडीटीचे संचालक डॉ. इंगोले, आत्मनिर्भर भारतचे महामंत्री राकेश बोमनवार, रणजित डवरे, उपाध्यक्ष हिना खान, सदस्य रंजना जेगटे, लीलावती रविदास, प्रभाताई गुडदे, विठ्ठलराव डुकरे, चांदभाई, सचिन कोतपल्लीवार, राकेश गौरकार, आयोजनात विशेष परिश्रम घेणारे सोहम बुटले आदींची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांची कल्पकता व त्यांच्या विचारांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती देऊन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, ‘परिसंवादांच्या माध्यमातून विचार मांडण्याची व विचार व्यक्त करण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वास दृढ होण्यास निश्चितच मदत होईल. फिल्मसिटीसारखे व्यासपीठ या ठिकाणी तयार करण्यात आले आहे हे कौतुकास्पद आहे.’ पालकमंत्री श्री. मुनगंटीवार पुढे म्हणाले, ‘स्पर्धेमध्ये समान नागरी कायद्यावर विचार मांडण्यात आले आणि चर्चाही करण्यात आली. देशामध्ये धर्म, जात, रंग, वंश, वय व शिक्षण यामध्ये विविधता आहे. मात्र, नागरिकांच्या हृदयामध्ये संविधानाचा भाव आणि भावना असणे आवश्यक आहे.

त्यासोबतच भारत हा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा सर्वात मोठा भाग व्हावा असा निर्धार देशगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सी ही समाजामध्ये सहजता, सरलता व सुलभता निर्माण करेल. त्यामुळे 'हम साथ साथ है' या भावनेने समाज निश्चितच पुढे जाईल.’ या स्पर्धेत विदर्भाच्या विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

# मोदी देशाला धोकादायक : ॲड. प्रकाश आंबेडकर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला धोकादायक झाले आहेत. त्यांना समर्थन देणाऱ्या हिंदू संघटनांनी फेरविचार केला पाहिजे असे वक्तव्य बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. मोदींनी मणिपूरमध्ये मैतेई जातीला आदिवासींचा दर्जा का दिला ? तशी मागणी होती का ? हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्ट केले पाहिजे असंही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. तसेच आगामी लोकसभा निवडणुका आपण अकोल्यातूनच लढणार आहोत असंही प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी भाजपाविरोधातल्या इंडिया या आघाडीच्या विरोधात वक्तव्य केले. या आघाडीत एसटी, एससी, ओबीसी नाहीत. माझ्यासारखे भाजपाच्या विरोधात असणारे तुम्ही का घेत नाही ? असाही प्रश्न प्रकाश आंबेडकर यांनी विचारला आहे. मुंबईत भाजपा विरोधी पक्षांची बैठक होणार आहे. या बैठकीचे कुठलही निमंत्रण मला देण्यात आलेले नाही. मुंबईतल्या बैठकीच्या निमंत्रणाची मी वाट पाहतो आहे असंही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत प्रकाश आंबेडकर यांनी हे वक्तव्य केले आहे. दरम्यान माझे माजी मुख्यमंत्री दिवंगत शंकरराव चव्हाण यांच्याशी घरगुती संबंध होते, अशोक चव्हाण यांच्याशीही माझे घरगुती संबंध आहेत त्यांच्याशी माझा राजकारणापलिकडचा संवादा आहे असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडीत माझा समावेश करण्याची जबाबदारी उद्धव ठाकरेंनी घेतली आहे. उद्धव ठाकरे हे शब्दाचे पक्के आहेत. औरंगजेबाच्या मजारीविषयी प्रकाश आंबेडकर यांनी वक्तव्य केले. आम्हाला दंगल थांबवायची होती म्हणून आम्ही तिथे गेलो होतो असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# पुण्याच्या वाहतूक कोंडीवर गडकरींचा उपाय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणे शहर दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच पुण्यातील वाहनांची संख्या देखील वाढली आहे. पुणेकरांची वाहतूक कोंडीमधून सुटका होण्यासाठी हवेतून चालणाऱ्या बसचा वापर करण्याचा विचार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले आहे. यावेळी गडकरी यांनी पुण्यातील प्रदूषण कमी करण्यासाठी तसेच कचरामुक्त पुणे करण्यासाठी उपाय सुचवले आहेत. पुण्याला मोकळा श्वास घेऊ द्या, असे देखील गडकरी यावेळी म्हणाले. पुणेकरांचा प्रवास आजपासून सुसाट होणार आहे, म्हणजे वाहतूक कोंडीतून पुणेकरांची सुटका होणार आहे. कारण चांदणी चौकातील उड्डाणपुलाचं लोकार्पण आज झाले. केंद्रीय मंत्री नितीत गडकरींच्या हस्ते चांदणी चौकातील उड्डाणपुलाचे मोठ्या दिमाखात लोकार्पण करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते



**चांदणी चौकातील पूल उभारण्यासाठी परदेशी तंत्रज्ञानाचा वापर :** नितीन गडकरी म्हणाले, अनेक अडचणींवर मात करून चांदणी चौकातील रस्त्याचं काम पूर्ण झाले आहे. पुण्यातील रस्त्यांसाठी मेधा कुलकर्णी यांनी अनेक प्रयत्न केले आहेत. अडचणींवर मात करून चांदणी चौकातील रस्त्याचं काम पूर्ण झाले. चांदणी चौकातील पूल उभारण्यासाठी परदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. मलेशिया, सिंगापूर इथल्या तंत्रज्ञानाचा वापर करून उड्डाण पूल करण्यात आला आहे. पुण्यात 40 हजार कोटींची कामे भविष्यात पूर्ण करणार आहे.

**पुण्याला पेट्रोल, डिझेलपासून मुक्त केले तर चाळीस टक्के प्रदूषण कमी होईल**

वाहनांची संख्या वाढल्याने अर्थात प्रदूषण वाढले आहे. पुण्याला पेट्रोल, डिझेलपासून मुक्त केले तर चाळीस टक्के प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. मला भारतातून पेट्रोल आणि डिझेल हद्दपार करायचे आहे. त्यासाठी इथेनॉल, मिथेनॉल आणि हायड्रोजन याचा वापर वाढवा. कचऱ्यापासून वीजनिर्मिती करु नका तर कचऱ्यापासून ग्रीन हायड्रोजन तयार करा, ग्रीन हायड्रोजन तेच भविष्य असल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.



गडकरी म्हणाले, माझी अजित पवार आणि चंद्रकांत पाटील यांना विनंती आहे की एकदा याचे एकदा प्रेझेंटेशन पहावे. हवेतून चालणारी बस ही पुण्यातील वाहतूक कोंडीवर हा चांगला पर्याय आहे. पुण्याच्या विकासासाठी चाळीस हजार कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हवेतून चालणाऱ्या बस आपण येथे आणणार असून या बसमधून एका वेळेस 250 प्रवाशांन प्रवास करता येणार आहे.

# प्रा. नरकेंच्या शोकसभेत भुजबळांना अश्रू अनावर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ विचारवंत साहित्यिक प्रा.हरी नरके यांच्या निधनाने माझा वैचारिक आधारस्तंभ हरपला असल्याच्या शोकभावना व्यक्त करतांना मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांना अश्रू अनावर झाले. यावेळी ‘हरी तुला आम्ही तुला मरू देणार नाही, तू सुरु केलेले काम आम्ही नेटाने पुढे नेऊ’ अशा शोकसंवेदना त्यांनी व्यक्त केल्या.

ज्येष्ठ विचारवंत प्रा.हरी नरके यांच्या निधनामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने मुंबई येथील भुजबळ नॉलेज सिटीत शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस सामाजिक, साहित्य, सांस्कृतिक, पत्रकारिता, कला आदी क्षेत्र यांसह सर्वपक्षीय राजकीय मान्यवरांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मंत्री छगन भुजबळ बोलत होते. प्रा.हरी नरके हे लेखक, अभ्यासू संशोधक, वक्ते आणि ओबीसी चळवळीचे खंदे कार्यकर्ते होते. तब्बल 55 पेक्षा अधिक पुस्तके आणि शोधनिबंध लिहिले. देशासह जगभरातील 60 हून विद्यापाठातील चर्चामध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले होते. त्यांचे विविध वर्तमानपत्र, वृत्तपत्रे आणि नियतकालिकांमधून 100 पेक्षा अधिक लेख प्रकाशित झाले होते. ते पुढे म्हणाले की, फुले - शाहू - आंबेडकर यांच्या विचारासाठी कोणाशीही भांडायला तयार होते. आपला विचार नव्या पिढी पर्यंत पोहचवायचा असेल तर नव्या पिढीची जी माध्यमे आहेत त्या मार्गाने आपण सुद्धा जायला हवे असा विचार करणारे ते होते असे त्यांनी सांगितले. एका गरीब कुटुंबात जन्माला आलेले नरके यांनी पुण्यात येऊन अगदी स्मशानभूमीत देखील काम केले. पुण्यातील नामांकित टेल्को कंपनीची नोकरी महात्मा फुले यांच्या विचारासाठी त्यांनी सोडली. पुणे विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केलं. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य होते. तसेच पुण्यातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेवर उपाध्यक्ष पद त्यांनी भूषविले.

# रेणुकामाता मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष भालेराव यांना राष्ट्रीय एकता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** आझादी की अमृत महोत्सवातंर्गत दिल्ली सरकारच्या ओबीसी आयोगाकडून समाजाच्या विविध घटकात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जाणार आहे.



यात रेणुकामाता मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत भालेराव यांना रविवारी दिल्लीत राष्ट्रीय एकता पुरस्काराने सन्मानीत केले जाणार आहेत. आयोगाचे सल्लागार अनुप चावला यांनी या पुरस्काराची घोषणा केली आहे. एकवीरा फौंडेशनच्या माध्यमातून केलेल्या समाज कार्याची दखल घेत रविवारी ( दि .१३ ) दिल्लीतील कॉन्सटीट्यूशन क्लबमध्ये पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान सोहळा कार्यक्रम होत आहे. आयोगाचे अध्यक्ष जगदीश यादव, सचिव रंजीत सिंह यांच्या उपस्थितीत कर्नल पूनम सिंग, जीएसटी कमिशनर सारांश महाजन, गायक पंडित बलदेवराज वर्मा ( इंदौर ), निवृत्त जिल्हा न्यायाधीश पिंकी महाजन ( दिल्ली ) यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले हे जाणार आहेत. प्रशांत भालेराव यांनी रेणुकामाता फौंडेशनच्या माध्यमातून २५ शाळांना प्रोजेक्टर, बेंच, टी.व्ही स्क्रीन देण्यासोबतच २५० गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आहे.

शालेय साहित्य, गणवेश आणि त्यांची फी देखील रेणुकामाता फौंडेशनमार्फत अदा केली जाते. डॉ. सुधा कांकरि यांच्या 'बेटी बचाव, बेटी पढावो' या उपक्रमाची दखल घेत या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.




# श्री गुरु महिमा



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा: गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः॥ आयुष्यात असंख्य माणसं भेटत असतात. पण ती व्यक्ती भेटण्याची आणि आयुष्यातून निघून जाण्याची एक वेळ नक्की ठरलेलीच असते आणि प्रत्येक व्यक्ती काहीतरी शिकवूनच जाते. चांगले वा वाईट. पण फायदाच देऊन जाते. परंतु अत्यंत अडचणीच्या काळात, मानसिक रित्या हरलेल्या काळात, तो अवघड मार्ग म्हणजे जंगलात चकव्यात हरवलेला माणूस असतो तशी वेळ... आणि अशावेळी कोणीतरी सहज आपल्याला भेटते वाटाड्या म्हणून अर्थात हा शब्द गुरुमाऊली श्री ज्ञानेश्वरांनी श्री निवृत्तीनाथांसाठी वापरला आहे. म्हणजे या शब्दाचे मोल किती असावे...? पण असे वाटाडे अर्थात सद्गुरु ज्यांच्यामुळे अडचणीतून व्यक्ती दूर तर होतेच पण त्यांचा सहवास हा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या सदैव बरोबर असतो. ते म्हणजे सद्गुरु.**

श्रीमत् अनुभवामृतामध्ये श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात गुरु याचा अर्थ ज्यांच्या चित्तातले पातकादी सर्वदोष गेलेले आहेत, त्यांना संसार दुःखातून बाहेर काढण्याकरता आपल्या वाणी, नेत्र इत्यादीकांकडून होणाऱ्या शक्तीपाताने परमात्मास्वरूपाचे ठिकाणी ऐक्य ज्ञान करून देणारा शरीरधारी जो आचार्य तो सद्गुरु. असे सद्गुरूंचे लक्षण श्रुतीने सांगितलेले आहे.

माऊली गुरूंना वसंत म्हणतात. माऊली म्हणतात वसंत काल प्राप्त झाला तरच वनातील वृक्षांना नवीन पालवी फुटते फुले येतात फळे येतात अन्यथा बागवानाने कितीही कष्ट केले तरी वसंताने जर त्या वनामध्ये प्रवेश केला नाही तर ती मेहनत व्यर्थ जाते. तसेच सद्गुरूंचे असते. आपण मोक्षप्राप्तीसाठी कितीही श्रवण करो, मनन करो, यज्ञयागादी करो, काय वाटेल ते करू परंतु या सर्व श्रमांमध्ये जोपर्यंत वसंत रुपी सद्गुरु प्रवेश करत नाहीत तोपर्यंत आपले श्रम व्यर्थ होतात.

आयुष्यात आलेली माणसे येतात आणि निघून जातात मात्र गुरु एकदा आयुष्यात आले तर ते आपले बोट कधीही सोडत नाही. कासवी जसे आपल्या पिल्लांना फक्त दृष्टीच्या जोरावर पोसते ,मोठे करते ,जगवते तसे गुरु आपली कृपादृष्टी सतत आपल्यावर ठेवत असतात.

ज्यावर श्री गुरुची कृपादृष्टी होते किंवा ज्याच्या मस्तकावर त्यांचा वरदहस्त पडतो तो जीव असला तरी शिवाशी साम्यता पावतो. माऊली म्हणतात दृष्टीने अलगे म्हणजे सद्गुरूंच्या कृपादृष्टीचे अग्र जरी मिळाले तरी त्याचा आपल्या आयुष्याला खूप मोठा फायदा होतो.



**श्री गुरु सारिखा असता पाठीराखा ।**
**इतरांचा लेखा कोण करी ॥**

खरेच आयुष्यातले कितीही मोठ्यातले मोठे संकट सुद्धा सद्गुरु पाठीशी असताना अगदी वाटेतल्या छोट्या दगडासारखे होऊन जातात.

ज्ञानेश्वरीच्या दहाव्या अध्यायामध्ये महाराज आपले आराध्यलिंग जे श्रीगुरु म्हणजे श्री.निवृत्तीनाथ महाराज यांचे असे स्तवन करतात की जणू शब्दांना अमृताची फळेच लागलेली आहेत. वाचता वाचता आपणही गुंग होऊन जातो. परंतु खरोखरच हे सर्व गुण सद्गुरूंमध्ये असतात आणि म्हणून त्यांच्या केवळ स्पर्शाने आपल्या जीवनाचा अर्थच बदलून जातो.

माऊली अध्यायात स्तवन करताना म्हणतात, सद्गुरूंच्या अंगी जीवनाचा सुस्पष्ट बोध करण्याचे चातुर्य असते. विद्या रुपी कमळाचा ते विकास करतात. संसार रुपी अंधाराचा ते सूर्य असतात. जगातली काही रत्ने धारण केल्यावर जसे ते आपल्याला मंगल अनुभव देतात, तसेच श्री गुरुदेव म्हणजे एक मांगल्यरुपी रत्नच असते. गुरूंच्या वाचेतून अभयाचा संकेत मिळतो.

खरं म्हणजे सद्गुरूंची स्तुती करणे म्हणजे चोख सोन्याला चांदीचे पुट द्यावे असे होते त्यामुळे शब्दांमध्ये सद्गुरु व्यक्त होणं केवळ अशक्यप्राय असते. त्यांच्या चरण कमलांची सेवा म्हणजे भगवंतापर्यंत पोहोचण्याचा मार्ग एवढीच व्याख्या आपण लक्षात ठेवू शकतो. आजच्या शुभ दिनी वंदन करताना एवढेच म्हणेन की जसे कापराचे अलंकार केले तरी अग्नी जवळ उरतच नाहीत तसे गुरूच्या सानिध्याने शिष्यत्व मिळावे. जे नामरूप सुद्धा राहणार नाही. शांतीब्रह्म श्री एकनाथ महाराज सद्गुरूंसाठी म्हणतात,

**माझी जनार्दन माऊली ।**
**प्रेम पान्हा पान्हाइली ॥१ ॥**
**तीच नित्य मज सांभाळी ।**
**रात्रंदिवस सर्व काळी ॥२ ॥**
**आठविते वेळोवेळां ।**
**माझ्या तीजलागीं कळवळा ॥३ ॥**
**एका जनार्दनी बाळ ।**
**माता रक्षी पै स्नेहाळ ॥४ ॥**

सद्गुरूंसाठी काया वाचा मन गुरुचरणी अर्पण असा भाव आपल्या मनात सदैव राहू दे अशीच प्रार्थना आजच्या दिवशी करते आहे. श्री एकनाथ महाराज म्हणतात तसे

धन्य श्री गुरुनाथे ।
दाखविले पाय तुमते ॥१ ॥
मी अभागी दातारा ।
मजे तारीले पामरा ॥२ ॥
करुनी दास्यत्व ।
राखीयले माझे चित्त ॥३ ॥
ऐसा मी हीनदीन ।
शरण एक जनार्दन ॥४ ॥

गुरुस्तुती करून शब्दांचे ऋण अंशतः फेडण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. गोड मानून घ्यावे.

# वैज्ञानिक दृष्टिकोन



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**विज्ञानाच्या अध्ययन आणि अध्यापनाचा वैज्ञानिक दृष्टिकोनाशी काही संबंध नाही. असा संबंध असता तर विज्ञान शाखेशी संबंधित सर्व जनता वैज्ञानिक दृष्टिकोनवादी झाली असती आणि काही अंशी वैज्ञानिक समाजाची निर्मिती होऊ शकली असती. नवयुगाचे, प्रगतिशील आणि आधुनिक समाजाचे मोजमाप करण्याचे एकक किंवा प्रमाण म्हणून आज आपण वैज्ञानिक दृष्टिकोन ही संकल्पना वापरतो. श्रध्दा, अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यातील साम्य आणि भेदाची स्पष्ट कल्पना असावयास हवी म्हणजे गोंधळ उडणार नाही. मुळात विज्ञानाची सुरुवात कशी झाली हे पाहणे गरजेचे आहे, म्हणजे आपणास वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय? हे लक्षात येईल.**

मानवी उत्क्रांतीच्या काळात निसर्गातील अनेक आश्चर्य पाहून माणूस मंत्रमुग्ध झाला. निसर्गात जे काही घडत होते ते त्याच्या आकलनाच्या बाहेरचे होते. त्याच्या या आश्चर्यमुग्धतेची परिणती अध्यात्मात आणि तत्त्वज्ञानात होणे साहजिक होते कारण आपल्या कल्पनाविस्ताराने त्याने नैसर्गिक घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला.

या सर्वांच्या मुळाशी आश्चर्य ही गोष्ट होती. म्हणून देशोदेशीचे अध्यात्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान आपणास परस्परविरोधी नसले तरी भिन्न जाणवतात ते याच कारणामुळे. काही तत्त्वज्ञान अगदी पृष्ठस्तरावरच राहिले तर काहींनी उपनिषदांच्या रूपाने उत्तुंग झेप घेतली. म्हणून मानवी मनाला या तत्त्वज्ञानातील कल्पनाविलास आणि विचारांची जटिलता नेहमीच मोहित करत आलेली आहे. परंतु जसजशी विज्ञानाची प्रगती होऊ लागली तसतसे मानवी आश्चर्य ज्ञानलालसेत परिवर्तीत झाले. आश्चर्य, कल्पनाविलास आणि अवगुंठित ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान किंवा अध्यात्मशास्त्र तर निव्वळ विशुद्ध ज्ञानाची परिपूर्ती म्हणजे विज्ञान असे विज्ञानाच्या जवळपास जाणारे विधान आपणास करता येईल. तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे दोन्ही परस्परविरोधी नसून विवक्षित ज्ञानापर्यंत पोहचण्याचे हे दोन मार्ग आहेत. दोन्हींची आपापली सामर्थ्ये वेगळी आणि मर्यादा वेगळ्या. न्यायमीमांसेत ज्या प्रमाणांची चर्चा पहावयास मिळते त्यातील प्रत्यक्ष प्रमाणावर भर देऊन विज्ञान आपले कार्य करते. विज्ञान काय साध्य करू इच्छिते याकडे आपले लक्ष नसते. कारण साध्यापेक्षा साधनात गुरफटून जाणे, सिद्धांतापेक्षा दृष्टांतावरच चर्चा करणे ही मानवी सहजप्रवृत्ती आहे. विज्ञान हे त्या सत्यापर्यंत पोहचण्याचा एक मार्ग आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे विज्ञानात गुरफटून जाणे नव्हे, ती एकप्रकारची अंधश्रद्धाच ठरते. त्याच्या साह्याने लक्ष्य प्राप्त करणे हे विज्ञानाचे साध्य होय. बिगबँग थेअरीचा जन्म यातूनच झाला. उपनिषदांची निर्मिती यातूनच झाली. मुळात वैज्ञानिक दृष्टिकोन असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्यासमोर सामान्य जनता असते. सामान्य माणूस कोणत्याही काळात फार विचार न करता कृती करणारा असतो. त्याला ज्ञानकांडापेक्षा कर्मकांड आवडतच असतात. एखाद्या मुलाला शाळेपेक्षा बैलगाडीत बसून, वखरावर बसून मजा करण्यासारखे. कर्मकांड सामान्य माणसास मजा देतात, आनंद




देतात. त्याला जोपर्यंत वाटणार नाही तोपर्यंत त्याचे आनंदाचे ठिकाण आपण स्थलांतरित करू शकणार नाही. ज्या काळात उपनिषदांची निर्मिती होत होती, प्रचंड चर्चा चालू होती, वाद झडत होते तेव्हा सर्व समाज त्यात भाग घेत होता का ? तर नाही असेच उत्तर येईल. किंवा या तत्त्वज्ञानात काय आहे, हे त्यास पहावे वाटले का ? नाही. आजही विज्ञानाची प्रगती होत असताना कोणत्याही सामान्य माणसास त्याचे काही देणेघेणे नसते. त्याचे लाभ घेणे वेगळे आणि त्यात सामील होणे वेगळे. सामान्य माणूस सामील न होता ज्ञानाचा लाभार्थी असतो. मी सर्व समाज सुधारून टाकीन, अशी भीष्मप्रतिज्ञा करणे ही अंधश्रद्धा होय. जगाचा बदल सर्व बदलल्याशिवाय होणार नाही, असे म्हणणे म्हणजे आपल्या अज्ञानाचे द्योतक आहे. ज्यांना आपण शहाणी, ज्ञानी माणसे म्हणतो त्यांनी स्वतः बदलावे जग त्याबरहुकूम बदलते, हा आजपर्यंतचा अनुभव आहे. कारण कोणत्याही काळात सामान्य माणूस तिन्ही प्रकारचे कर्म करणारा असत नाही. उपनिषदांमध्ये तीन प्रकारचे कर्म सांगितले आहेत. इष्ट कर्म, पूर्त कर्म आणि दत्त कर्म. आकलनसुलभतेसाठी आपणास यास कर्मकांड, समाजकार्यात्मक कर्म आणि कर्तव्ये असे म्हणता येईल. ज्याचा जसा गुण असेल तसा तो कार्य करेल. गुणांचे प्रकार आणि त्याची वैशिष्ट्ये येथे आपण



पाहणार नाहीत. फक्त एवढे लक्षात घेतले पाहिजे की, समाजात ज्ञानात्मक चर्चा चालू ठेऊन अंतिम सत्य काय याचा शोध चालू ठेवला पाहिजे. त्याकडे जाण्याचे अनेक मार्ग असू शकतात. आपण म्हणतो तोच मार्ग खरा हा दुराग्रह एक प्रकारची अंधश्रद्धाच. कारण ज्ञानचिकित्सा पध्दतीचे विविध मार्ग असतात. वैशषिक दर्शनात याविषयी खूप चर्चा आलेली आहे तर पाश्चात्य जगतात बेकनने कल्पकता, ग्रहणशक्ती आणि तार्किकता असे मार्ग सांगितले. त्याचाच विकास नंतर तार्किकतेच्या अनुषंगाने कान्ट, हेगेल यांनी केला. हेगेलचे तर्काच्या संबंधी एक वाक्य फार प्रसिद्ध आहे. हेगेल म्हणतात, वास्तव तर्कसंगत आहे व जे तर्कसंगत आहे तेच खरे वास्तव होय. आधुनिक काळात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगायचा म्हणजे काय करायचे हे हेगेलच्या विधानातून समजून घेण्यास अडचण नसावी. इंद्रयातीत आणि इंद्रीयगम्य अशी जरी आपण विभागणी केली तरी. ज्याचे खरेखोटेपण तर्कावर आधारित आहे, अशा गोष्टींचा स्वीकार आपणास अधिकाधिक ज्ञानाच्या जवळ नेणारा असतो. अध्यात्म आणि विज्ञान यात अनेक भेद असले तरी माणसाने विवेकबुद्धीने त्याचा वापर करून स्वीकार केला तरच आपण सर्वार्थाने उन्नत होऊ. शेवटी गीतेत म्हटल्याप्रमाणे जशी ज्याची श्रद्धा तशी त्याची प्रकृती व जशी प्रकृती तशी जगताविषयी प्रवृत्ती आणि कल्पना. या दृष्टिकोनातून विचार केल्याशिवाय आपल्यात बदल होऊ शकणार नाही. कालाय तस्मे नमः या उक्तीप्रमाणे आपल्या धारणा खूप बदलल्या आहेत, पुढेही त्या बदलतील. त्या बदलाव्यात म्हणून प्रज्ञावंत मंडळींनी कर्म केले पाहिजे. आपणास आणखी वैज्ञानिक दृष्टिकोनातून बराच शोध घ्यायचा आहे. आतातर कुठे विज्ञानाची सुरुवात आहे, वैज्ञानिक दृष्टिकोन ही त्या पुढची अवस्था असेल.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पक्षवाढीसाठी शिस्त महत्त्वाची

## पक्ष निरीक्षक सुभाषराव साळुंखे

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांचे प्रतिनिधी परभणी जिल्ह्याचे शिवसेना पक्ष निरीक्षक श्री. सुभाषजी साळुंखे साहेब यांनी दिनांक 10 ऑगस्ट 2023 गुरुवार रोजी शिवसंघटन अभियानांतर्गत जिंतूर येथील शिवसेना पदाधिकारी तसेच शिवसैनिकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

पक्ष संघटना वाढीसाठी शिस्त महत्त्वाची असून सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय साधून 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हे धोरण राबवत तळागाळापर्यंत कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रातील कल्याणकारी योजना शेतकरी, बालक, युवक, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा असे शिवसैनिकांना, बुथप्रमुखांना, शिवदुतांना आवाहन केले. याप्रसंगी, परभणी जिल्ह्याचे संपर्कप्रमुख माजी खासदार सुरेश रावजी जाधव साहेब, सह-संपर्कप्रमुख भास्करराव लंगोटे साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे, बहुजन आघाडी जिल्हा प्रमुख धम्मदीप रोडे, महिला जिल्हाध्यक्ष सौ. गीता सूर्यवंशी, युवा जिल्हाध्यक्ष दीपक भाऊ टेंगसे, उपजिल्हाप्रमुख प्रल्हाद होगे पाटील, उपजिल्हाप्रमुख केशव कदम, महिला उपजिल्हाप्रमुख सौ. सुशीला ताई चव्हाण, नरेश शेठ खैरजानी, जिंतूर शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. सुनिल शिवाजीराव बुधवंत, महिला तालुकाप्रमुख सौ. अक्षता पाटील, तालुका संघटक श्री. अंकुश राठोड, उप तालुकाप्रमुख डॉ. विजय वटाणे पाटील, उप तालुकाप्रमुख श्री. सोपान राजे देशमुख, तालुका सचिव अशोक देशमुख, शहर प्रमुख कल्याणराव देशमुख, शहर संघटक संतोष मोरे, महिला शहर प्रमुख सौ. जया थिटे, उपशहर प्रमुख शिवाजी पुणेकर, युवा शहर प्रमुख गजानन गीते इत्यादी पदाधिकारी, शिवसैनिक तसेच महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



# नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्या

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** मागील महिन्यात २२ जुलै रोजी जळगाव जा., संग्रामपूर तालुक्यात प्रचंड अशी ढगफुटी झाली. त्यामुळे अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने अनेकांची घरदारे वाघुन गेली नदीकाठच्या घरांमध्ये पाणी प्यायला ग्लास सुद्धा राहिला नाही कुटुंबचे-कुटुंब बेघर झाले. शेतीचे अतोनात नुकसान झाले असून नदीकाठच्या जमिनी शेती पिकांसह खरडून गेल्या तरीही सरकारने कोणत्याच प्रकारची आर्थिक मदत केलेली नाही. २० दिवसांचा कालावधी उलटून सुद्धा आर्थिक मदत मिळत नसेल तर आम्ही लोकांनी पाहायचं कोणाकडे ढगफुटीमुळे गोरगरीब ,कष्टकरी,मजूर वर्ग यांना होत असलेल्या अडीअडचणी ह्या फक्त आम्हा गरीबांनाच कळणार त्यामुळे शासनाने तात्काळ गरीब लोकांना मदत देणे अपेक्षित आहे. ही मागणी घेऊन आज युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी तालुक्यातील भूमिपुत्रांना घेऊन उपविभागीय कार्यालय जळगाव जामोद येथे उपविभागीय अधिकारी शैलेश काळे साहेब यांची भेट घेऊन त्यांच्याकडे तात्काळ आर्थिक मदत द्या अशी मागणी केली.

# साहित्य वाचनाने नवोदित साहित्यिक निर्माण होतात : कवी अय्युब पठाण लोहगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवी आपल्या भेटीला



या उपक्रमातून शाहू विद्यालयामध्ये नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात प्रसिध्द बाल साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर हे मुला-मुलींना मार्गदर्शन करीत होते. याप्रसंगी पठाण म्हणाले की, दर्जेदार शिक्षणातून भविष्यात चांगले विद्यार्थी घडतात आणि ते चांगल्या पदावर कार्यरत राहतात.

तसेच मराठी साहित्यातून दर्जेदार काव्यसंग्रह वाचल्याने भविष्यात आशयघन साहित्यातून चांगले कवी आणि लेखक निर्माण होतात." या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका, आणि पालकवर्ग, शाळेतील विद्यार्थी मोठया संख्येने कार्यक्रमाला हजर होते.



# आ.फारुख शाह यांच्या हस्ते कॉँक्रीट रस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रमांक 19 जामचा मळा अंतर्गत कॉँक्रीट रस्ते व गटर काम करणे या कामाचे 50 लाख रुपये कामाचे शुभारंभ आमदार यांचे हस्ते करण्यात आले.

प्रभाग क्रमांक 19 भागात सुमारे पाच वर्षांपूर्वी एक सुद्धा रस्ते व गटार नव्हती तसेच या प्रभागात मूलभूत सुविधा याचा अभाव होता परंतु आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नाने व या प्रभागाचे नागरिकांच्या मागणीनुसार संपूर्ण प्रभागात आज रोजी 75 टक्के रस्ते व गटारीचे कामे झाले असून या प्रभागात आजपर्यंत कोणत्याच आमदारांनी एक दमडीच्या सुद्धा निधी उपलब्ध करून दिला नव्हता असे आरोप ही करण्यात आले त्यामुळे या भागाची स्थिती फार भयानक होती या प्रभागात पावसाळ्यात नागरिकांचे फार हाल होत होते पावसाळ्याचे पाणी साचल्यामुळे लोकांना चालणे सुद्धा दुराप्रास्त होते. तसेच गटार नसल्यामुळे सर्व पाणी परिसरात पसरत होते आ.फारुख शाह यांनी या परिस्थितीच्या विचार करून या चार वर्षात या प्रभागात रस्ते गटार व पाईपलाईन साठी शेकडो कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करून दिला आहे.

आ.फारुख शाह यांनी शहराच्या विविध भागात आजपर्यंत रस्ते गटार पाईपलाईन व शहराच्या सुशोभीकरणासाठी शेकडो कोटी रुपयाचा निधी आज पर्यंत उपलब्ध करून दिलेला आहे नागरिकांची मूलभूत सुविधा साठी व त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून शहराच्या कसा विकास होईल यावर आमदार साहेब यांचे प्रयत्न असून आज प्रभाग क्रमांक 19 येथे जा आमच्या मळा अंतर्गत 50 लाख रुपये कामाचे शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी या भागातील नागरिकांनी आ.फारुख शाह यांच्या सत्कार केला व आभार मानले या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात परिसरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी आ.फारुख शाह यांचेसोबत हाफिज दानिश मौलाना,नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक आमिर पठाण, नगरसेवक गनी डॉलर,सलीम शाहडॉ. दिपश्री नाईक, अनिस शाह,डॉ.बापुराव पवार, प्यारेलाल पिंजारी, मौलाना शकील,शरीफ पठाण, फुझेल आझमी, अयाझ शेख, आसिफ शाह, शहजाद मंसुरी, नजर पठाण, अजहर सैय्यद,इरफान शेख, जीड्या पहिलवान, हलीम शमसुद्दिन, अल्ताफ मिर्झा, शगिर पिंजारी, एजाज सैय्यद, चांद पिंजारी, शहजाद मणियार, जमील खाटीक, शोएब मुल्ला, माजीद पठाण, वसिम मंसूरी, छोटू मच्छीवाले, गफ्फार शेख, इंजि. अफसर शाह आदी उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta












# अमृतमहोत्सवी स्वातंत्र्याची उंच सखल वाटचाल



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**भारतासारख्या प्रचंड विस्तार असलेल्या देशासाठी ७५वर्षाचा स्वातंत्र्योत्तर काळ महत्वाचा ठरतो. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या निमित्ताने बरेच सिंहावलोकन झाले आहे. कोणत्या सरकारने काय केले ( काय नाही केले), याबद्दल आकडेवारी सह दावे केले जाताहेत. प्रत्येक क्षेत्रात प्रगती निश्चितच झाली आहे.दळण वळण, उद्योग, शिक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान अर्थ व्यवस्था अशा सर्वच बाबतीत डोळे भरतील अशी प्रगती दिसते आहे. दुसरीकडे १४०कोटी लोकसंख्या सांभाळताना व्यवस्थेवर नको तितका ताण पडतो आहे. त्यामुळे गरीबी, बेरोजगारी, शेतकऱ्याच्या समस्या, खेडे गावातील वीज पाण्याच्या समस्या अनेक दुर्गम भागात आहे तशाच आहेत. संघ राज्य पध्दती मुळे राज्यात सरकार वेगळे,केंद्रात वेगळे.या दोन सरकारात ताळमेळ नसणे, राजकीय मतभेद(वैर) असणे, ही प्रश्न आहेच. प्रत्येक राज्याची भाषा, संस्कृती वेगळी. शिवाय एकूणच गरीब श्रीमंत ही दरी अधिकाधिक वाढत जाणारी.**

समाज जाती धर्माच्या नावाने दुभंगलेला. प्रत्येकाला घटनेने दिलेले अधिकार, हक्क हवे आहेत. जबाबदारी मात्र नको आहे. मी, माझे कुटुंब, माझे हित, माझे प्रश्न याच वर्तुळात गोल गोल फिरत राहायचे! समाजाचा, देशाचा विचार फार कमी. स्वातंत्र्य पूर्वी इतका स्वार्थ नव्हता. अशी संकुचित वृत्ती नव्हती. जहाल मवाळ, विचार, पक्ष कुठलाही असो, उद्दिष्ट एकच होते.. स्वातंत्र्य मिळविण्याचे. आता तसे सर्वांसाठी एक मजबूत ध्येय राहिले नाही. आपण आपलाच इतिहास विसरत चाललो किंवा त्याची तोडमोड करण्यात धन्यता मानतो आहोत. आपल्याला आपली जात, आपला धर्म, आपला पक्ष,आपला विचार तेव्हढा पुढे रेटायचा आहे इतर कुणाची पर्वा नाही. हा बदल एकाएकी झालेला नाही.तो वेग वेगळ्या वर्गा कडून अजेंडा म्हणून पुढे रेटण्याचा प्रयत्न होतो आहे. त्यात जीसकी लाठी उसकी भैस या न्यायाने बाहुबली जिंकताहेत. गरीब दुबळे मागे पडताहेत.७५वर्षात यात फारसा फरक पडलेला नाही.

दुसरीकडे या देशाने या सात दशकात खूप काही चांगले वाईट दोन्ही अनुभवले. प्रचंड लोकसंख्येच्या रेट्याला सामर्थ्याने तोंड देत नवे उद्योग निर्माण झाले. दळण वळण क्षेत्रात तर प्रचंड क्रांती झाली. संगणक, मोबाईल, इंटरनेट ,ऑटोमेशन, या नव्या तंत्रज्ञानामुळे शिक्षण, आरोग्य, सरकारी व्यवस्थापन, मूलभूत गरजा अशा सर्वच बाबतीत आपली घोड दोड सुरू आहे.गेल्या दशकात तर डिजिटल क्रांतीने देशाचा चेहरा मोहराच बदलला आहे. अगदी सामान्य माणसं देखील लाभार्थी म्हणून अभिमानाने मिरवताहेत. इंजिनिअर डॉक्टर होणाऱ्याची संख्या किती तरी पटीने वाढली. आपली मुलं परदेशात जाऊन स्थिरावली आहेत.तिकडे अनेकांनी वेग वेगळ्या क्षेत्रात नाव कमावले आहे. त्यामुळे मुलं मुली परदेशात अन् इकडे त्यांचे वृद्ध आई वडील एकटे अशी परिस्थिती अनेक शहरात दिसते आहे. पण हा बदल आपण आनंदाने स्वीकारला आहे. अर्थात या क्रांतीचे परिणाम अनेक धंद्यावर झालेत. अनेकाचे रोजगार बुडलेत हे खरे.सायकल रिक्षा गेली, टांगे गेले. कॅमेरे गेल्याने स्टुडिओ वर परिणाम झाला.टायपिंग क्लास बंद झालेत. ट्रॅव्हल एजंट कमी झाले. पोस्ट बँक इथली गर्दी बरीच कमी झाली. कुरीयर, घरपोच सामान खरेदी हे प्रकार वाढले. छोट्या किराणामालाचे दुकान कमीझालेमोठमोठे मॉल्स आले. टी व्ही चॅनलसमुळे तर घर बसल्या कंटाळा येईपर्यंत मनोरंजन.. सिनेमा नाटक संगीत या माध्यमातून पूर्वी होणारे मनोरंजन भरकटले, मरगळले.

देशाने युद्ध पाहिले. काही जिंकले. काही हरले!दोन पंत्रप्रधानाची हत्या झाली. तर एकाचा परदेशात संशयास्पद मृत्यू! अनेक दंगली, देशाला हादरवून टाकणारे बॉम्ब स्फोट, स्क्यांडलस, आर्थिक घोटाळे.. असे अनेक चढउतार देशाने, जनतेने पचवले. शिवाय निसर्गाचे प्रकोप. भूकंप, महापूर, वादळं. हे सरकारसाठी त्या त्या वेळी फार मोठे आव्हान होते. त्यातुनही आपण वाट काढत वाटचाल केलीच. अशा वेळी देशाचे ऐक्य देखील आपण अनुभवले. या अनुभवाने देशातील संरक्षण यंत्रणा मजबूत झाली. सीमा सुरक्षित झाल्या. सीमे पलीकडे आपला वाचक निर्माण झाला. शत्रुलाही वाकडे पाऊल टाकण्या पूर्वी दहादा विचार करण्या इतपत आपण दहशत निर्माण करू शकलो. बलाढ्य राष्ट्रांनी देखील वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला. आपले नैतिक सामर्थ्य जगाने मान्य केले.

हे सगळे असले तरी खेडी सुधारली नाहीत हव्या त्या प्रमाणात. शेतकऱ्याच्या समस्या, त्याची गरीबी तशीच आहे. अनेक दुर्गम भागात पाणी नाही. शाळा नाही. असली तरी अवस्था अतिशय वाईट. त्यात कुठे पूर, वादळं, तर कुठे दुष्काळ. काही पैशाचे दान देऊन प्रश्न सुटत नाहीत.तात्पुरत्या मदतीने लाचारी वाढते. आरक्षणाचे लाभ वर्षानुवर्षे मिळूनही बहुजन समाजाची, दीन दलितांची परिस्थिती म्हणावी तशी सुधारली नाहीय. कारण तीच ती कुटुंब पुन्हा पुन्हा लाभ घेताहेत.गरीब त्या पासून वंचित राहताहेत.जर एखाद्या कुटुंबाने आरक्षणाचा लाभ घेतला,त्यातून वरचे पद कमावले,लाखोंचा पगार मिळवला,तर पुन्हा त्याच कुटुंबातील दुसऱ्या तिसऱ्या पीढीला लाभ कशासाठी ?त्यांची स्थिती सुधारली.तोच लाभ त्या कुटुंबा ऐवजी त्याच जमाती च्या अधिक गरजू,अधिक गरीब मुलांना मिळाला तर अनेक कुटुंब खालच्या स्तरातून वर येतील. हे अन् असे कायदे ,नियम, यांचा पुनर्विचार व्हावा. आरक्षण गरजू गरीब वंचितांना मिळालेच पाहिजे. पण त्याचे लाभ एकांगी न राहता सर्व समावेशक व्हायला हवेत. नवीनपिढीला त्याच्या जाती धर्माकडे न बघता अधिक सुशिक्षित,सक्षम,नैतिक दृष्ट्या बलवान बनवले पाहिजे. त्यासाठी राष्ट्र व्यापी कार्यक्रम राबवले पाहिजेत.

इथे समस्या आहे. सर्वात बलाढ्य लोकशाहीचा आपण डंका पिटतो. प्रत्येकाला स्वातंत्र्य हवे आहे. अभिव्यक्तीचे,वागण्याचे,घटनेचे.पण बहु पक्षीय राजकारणाच्या वेगळ्या समस्या आहेत.राज्यात सरकार एका( स्थानीय )पक्षाचे,अन् केंद्रात दुसऱ्या पक्षाचे. यात छत्तीसाचा आकडा!त्यामुळे एकसंघ असे राष्ट्रीय धोरण ठरविण्यात अडचणी येतात. आता तर अनेक पक्षांचे सरकार असते.कुठे युती,कुठे आघाडी. स्वार्था पोटी,सत्ते साठी मंडळी एकत्र येतात. त्यात विश्वास नसतो. खात्री नसते.स्थैर्य तर नसतेच.



गेल्या एक दोन दशकांत हा राजकीय तमाशा,नौटंकी आपण बघतो आहोत.सर्वांचे एक देशहित हा कन्सेप्ट राहिला नाही आता.राज्याची अस्मिता वेगळी. प्रत्येक पक्षाची वेगळी. त्यांची भाषा वेगळी, अजेंडा वेगळा.या बदललेल्याराजकारणाच्या चिखलात ,या दलदलीत फसतो सामान्य माणूस. तुम्ही आम्ही.हे कटू सत्य नाकारता येणार नाही.कारण अमृत महोत्सवी वाटचालीत हा चिखल वाढतो आहे.जी मंडळी आपण निवडून देतो, ती अधिकार प्राप्त होताच माज आल्या सारखी वागतात.आपल्या चांगल्या कामाने उदात्त आदर्श निर्माण करण्याऐवजी तोंडाला येईल ते बरळत जातात. द्वेषाचे सुडाचे राजकारण करतात.७५वर्षात आपले समाजकारण,राजकारण परिपक्व झालेले नाही. उलट आपण पुढे जायचे सोडून मागेच चाललो आहोत !हा सामाजिक सांस्कृतिक माहोल यापुढे बदलला पाहिजे.

आपले सांस्कृतिक सण कोणत्या उद्देशाने सुरू झाले अन् आज त्यांचे स्वरूप कसे का बदलले हेही तपासायला हवे. श्री गणेश उत्सव,नवरात्र उत्सव,दही हंडी , महा पुरुषांच्या जयंत्या..अशी अनेक उदाहरणे आहेत. हे सण कुठल्या पद्धतीने, उद्देशाने सुरू झालेत अन् आज त्यांनी काय स्वरूप धारण केले याचा विचार करायला नको ? इथेही राजकारण आले, पक्ष आले, पुढारी नेते आले, अन् एका चांगल्या सांस्कृतिक सोहळ्या्ना बघता बघता वेडेवाकडे स्वरूप आले. वाट चुकली तर गियर बदलून,स्टिअरिंग फिरवून दिशा बदलायची असते. नवी चांगली वाट शोधायची असते. हे शहाणपण आपल्याला कधी सुचेल ?स्वातंत्र्याच्या७५वर्षात सुचले नाही कुणाला, म्हणून हा प्रश्न पडतो.

कायदे, संविधान उत्तम आहे. आदर्श स्वरूप आहे.पण कायद्याचा कुणाला धाक नाही. शिथिल संथ न्याय व्यवस्थेत कधी कसा न्याय मिळेल, मिळेल की नाही याची शाश्वती नाही.दहशतवाद वाढतो आहे. स्त्रिया वरील अत्त्याचार वाढतच नाहीत तर, त्यांनी भीषण बीभत्स रूप धारण केले आहे आता!भावना चे संतुलन कमी होत चालले आहे.सहिष्णुता, एकमेका विषयीचा आदर, तुम्ही आहात म्हणून मी आहे हे उबंटू चे तत्वज्ञान,आपल्याच वेद पुराणातली नीती मूल्ये,सारे सारे मागे पडत चालले. आम्ही अमुक केले आम्ही तमुक केले अशा गत काळाच्या वायफळ गप्पा आता चालणार नाहीत. भूत काळाच्या कामगिरी वर वर्तमान,भविष्य उभे करता येत नाही.आपले आजचे अस्तित्व,आजचे कर्तृत्व,आजचे नेतृत्व,महत्वाचे असते. स्वातंत्र्य पूर्व काळातील नेतृत्व आठवून बघा. नावे मुद्दाम घेत नाही.कारण क्रांतिकारक,समाज सुधारक,जहाल,मवाळ,सगळ्यांचेच योगदान सारखे महत्वाचे आहे. त्यांचे मार्ग, विचार वेगळे असले तरी उद्दीष्ट सामान होते.त्यात देशहितच सामावले होते. स्वार्थ मुळीच नव्हता.तिथेही कुणाचे चुकले असेल. कुणी भरकटले असेल. ती त्या वेळची,परिस्थितीची गरज असेल.ते भागदेय आता तपासून कीस काढण्यात ,दोषारोप करण्यात अर्थ नाही.आपल्याला जोमाने पुढे जायचे आहे.जगाशी स्पर्धा आहे. छोटी छोटी राष्ट्रे उंच झेप घेऊन आपल्या पुढे जाताहेत.आपण आत्मसंतुष्ट राहून,आपल्याच गुर्मीत , स्वप्नरंजनात राहून चालणार नाही. आपल्यालाही धावावे लागेल. रांगुन चालणार नाही. गरज आहे आपल्या समस्या समजून घेण्याची.गरिबी हटाव अशा घोषणा दिल्याने गरीबी दूर होईल या भ्रमात राहू नये.आधी गरीबी म्हणजे काय, त्या मागची कारणे काय हे समजून घ्यावे लागेल.गरिबीची तात्विक,वैधानिक व्याख्या स्पष्ट करावी लागेल.तसेच शेतकऱ्याचे प्रश्न मंत्रालयात ए सी केबीन मध्ये मीटिंग घेऊन सुटणार नाहीत. खेडे गावात जाऊन,शेतकऱ्यांशी चर्चा करून प्रश्न समस्या समजून घ्यावी लागेल.प्रत्येक राज्याचे,प्रत्येक समाज वर्गाचे प्रश्न वेगळे असू शकतात. सर्वा साठी एकच उत्तर, एकच कायदा,एकच उपाय असे बंदिस्त विचार कामाचे नाहीत. शिक्षणात सुधारणा करायच्या तर, शिक्षक,संस्था चालक, उद्योजक यांना विचार,विश्वासात घ्या. त्यांना काय हवेहेतपासा. भविष्याची गरज ओळखून दूर दृष्टीने निर्णय घ्या. हार्वर्ड चा अभ्यासक्रम कॉपी करून चालणार नाही इकडे.एव्हढेच काय,दिल्लीचे उपाय बिहार ओरिसात कुचकामी ठरतील! धोरण ठरविताना,लोकलचा विचार प्राथमिक . नंतर ग्लोबल चा विचार करा.आता तर नवनवे तंत्रज्ञान आपल्या सोबतीला आहेच.त्याने कामे सोपी होतील.वेळेची, श्रमाची, पैशांची बचत होईल ती वेगळी.मार्ग आहेत.एकापेक्षा जास्त मार्ग आहेत. इच्छा शक्ती हवी. मनोवृत्ती बदलायला हवी. स्वार्था ऐवजी समाजाचा विचार हवा.मग अशक्य काहीचनाही.

सरकार कोणत्याही पक्षाचे असो. एक इंजिन की डबल इंजिन हे महत्वाचे नाही. आपले धोरण,आपले निर्णय एकांगी,अतिरेकी, धर्म द्वेष्टे,राजकारणाने कलुशित विचाराचे नकोत. सर्वांचे हित,सर्वांचे कल्याण, सर्वांना सारखा लाभ अशा सर्व समावेशक धोरणाचे हवे. सत्ता कायम नसते.देश कायम असतो. समाज कायम असतो. समाजहित कायम असते. एकहाती सत्ता, संपूर्ण बहुमत ही लोकशाही गेली. आता पक्षांची संख्या वाढली.प्रत्येक राज्याची अस्मिता वाढली.राज्य स्तरीय पक्षाचे वर्चस्व,महत्व वाढले. राजकारणाचे गणित,तोडफोडीचे समीकरण सारेच बदलले.पण देशहित,राष्ट्र प्रेम,नेशन फर्स्ट ही संकल्पना बदलता कामा नये. ती सशक्त लोकशाहीची गरज आहे.

आता अमृत महोत्सवा कडून स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवा कडे आपल्या देशाची वाटचाल सुरू आहे. येणारी दोन दशके त्या दृष्टीने महत्त्वाची. कारण आपल्याच समाजाच्या, नागरिकाच्या नव्हेत तर जागतिक पातळीवर आपल्या कडून अपेक्षा वाढल्या आहेत. प्रगत राष्ट्रांना आपली ताकद, आपले महत्व विसरणे,दुर्लक्ष करणे कठीण जाते आहे. त्यामुळे आपली ( सरकारचीच नव्हे तर नागरिकांची देखील ) जबाबदारीवाढली आहे.देश म्हणजे भौगोलिक सीमा नाही. सुजाण नागरिक देश घडवतात. समृद्ध करतात. गळ्यात उपरणे कुठल्याही रंगाचे असले तरी प्रत्येकाच्या उजव्या हातात मात्र तिरांगाच हवा.हा राष्ट्राभिमान आपल्याला आपल्या उद्दिष्टांकडे निश्चित घेऊन जाईल. सहविर्यम करवावहे..let us do great things together!

# सायलेंट किलर आजार!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**रक्तदाब हा अभिसरण होत असलेल्या रक्ताद्वारे रक्तवाहिन्यांच्या आतील भिंतींवर पडणारा दबाव होय. धमन्या या हृदयातून शरीरातल्या सर्व उती आणि अवयवांना रक्तपुरवठा करतात. हृदयातून धमन्यांमधे रक्त ढकलले जाण्यामुळं आणि धमन्यांद्वारे या रक्ताच्या प्रवाहाला दिला जाणारा प्रतिसाद यांच्या परिणामाने रक्तदाब निर्माण होतो. परंपरेनुसार, एखाद्या व्यक्तीचा रक्तदाब हा सिस्टॉलीक/ डायस्टॉलीक असा व्यक्त केला जातो, उदाहरणार्थ- १२०/८०. हृदयाचे स्नायू आकुंचन पावून धमन्यांमधे रक्त ढकलले जाते तेव्हा धमन्यांच्या आतल्या भिंतीवर निर्माण झालेला दाब म्हणजे सिस्टॉलीक रक्तदाब होय. आकुंचनानंतर हृदयाचे स्नायू शिथील होतात त्यावेळेला धमन्यांमधील दाब म्हणजे डायस्टॉलीक रक्तदाब होय. हृदय जेव्हा रक्त पंप करत असतं त्यावेळेला रक्तदाब हा उच्च असतो, ते शिथिल असतं तेव्हा नाही. बहुतांश सुदृढ प्रौढांसाठी सिस्टॉलीक रक्तदाब हा पा-याच्या ९० आणि १२० मिलीमीटर्स दरम्यान असतो.**

**(मागील अंकावरून)** जीवनशैलीचे उपचारः जीवनशैलीचा उपचार हा रक्तदाबासाठी पहिला आणि खूप महत्त्वाचा आहे. आपल्याला औषधे सुरू असोत किंवा नसोत, जीवनशैलीतील बदल हे फार महत्त्वाचे ठरतात. सगळ्यात महत्त्वाचा बदल म्हणजे आपली शारीरिक हालचाल वाढवणे. बहुतांशी लोकांच्या शारीरिक हालचाली खूपच कमी असतात. यांत्रिकीकरणामुळे आपल्याला आजकाल शारीरिक कष्ट फार कमी करावे लागतात. आज जवळपास सगळ्यांची जीवनशैली ही बैठी जीवनशैली झाली आहे. शारीरिक हालचाल वाढली, तर आपला रक्तदाब नियंत्रणात यायला मदत होते. आपण सतत अर्ध्या तासापेक्षा जास्त बसू नये. थोडा वेळ उठून पाय मोकळे करावेत किंवा थोडी शारीरिक हालचाल करावी. अर्धा तास बसून आणि अर्धा तास उभे राहून काम केलेले सगळ्यात उत्तम. जिथे जिथे आपल्याला पायी चालण्याची संधी मिळते, तिथे पायी चालावे. लिफ्टऐवजी जिन्याचा वापर करावा. जास्तीत जास्त घरकामे स्वतः करावीत. बरेचदा एवढे करूनही आपली शारीरिक हालचाल पुरेशी वाढत नाही, यासाठी आपल्याला व्यायाम करण्याची गरज पडते. व्यायाम म्हणजे थोड्या वेळात केलेली जास्त शारीरिक हालचाल. व्यायाम केल्याने आपल्याला दोन प्रकारचे फायदे होतात. एक म्हणजे, आपले स्नायू बळकट होण्यासाठी मदत होते. दुसरे म्हणजे हृदय आणि फुफ्फुसे बळकट होण्यासाठी मदत होते. आपण हे दोन्ही प्रकारचे व्यायाम करावेत. आपण दिवसभरात एकदाच व्यायाम केला आणि दिवसभर बसून असलो तर त्याचा फारसा फायदा होत नाही. म्हणून आपण व्यायाम करावा व दिवसभर शारीरिक हालचाल सुरू ठेवावी. सकाळी काही वेळ आणि संध्याकाळी काही वेळ विभागून व्यायाम केल्याससुद्धा फायदा होतो. जर आपण जलद गतीचा व्यायाम केला, तर आपल्याला जास्त फायदा होतो. वजन कमी करणे- आपली शारीरिक वाढ पूर्ण झाल्यावर जे आपले वजन वाढते ते मुख्यत्वे चरबीच्या स्वरूपात वाढलेले असते. हे वजन आपण कमी केल्यास आपल्या आरोग्यावर खूप चांगले परिणाम होतात. वजन कमी केल्यामुळे रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी खूप मोठी मदत होते, म्हणून डॉक्टर आपल्याला वजन कमी करण्याचा सल्ला देतात. आहारामध्ये आपण पुरेसे बदल केले तर वजन कमी करणे सोपे होते. प्रक्रिया केलेले पदार्थ हे आपल्या आरोग्यासाठी खूप वाईट असतात. त्यामध्ये उष्मांक म्हणजेच कॅलरी यांचे प्रमाण खूप जास्त असते. शिवाय, अशा पदार्थांमध्ये लपलेले मीठ आणि लपलेले साखर यांचे प्रमाणसुद्धा खूप जास्त असते. हे पदार्थ टाळल्याने वजन कमी व्हायला मदत तर होतेच, शिवाय रक्तदाब कमी होण्यासाठीसुद्धा मदत होते. आहारामध्ये आपण फळे आणि भाज्या यांचा भरपूर वापर करावा. आपले अर्धे जेवण हे कच्चे, हिरवे, सलाद किंवा कोशिंबिरी असलेले असे असले, तर त्याचा आपल्याला फायदा होतो. आहारामध्ये भाज्या आणि फळे भरपूर असतील तर त्यातून आपल्याला आवश्यक अशी जीवनसत्त्वे तर मिळतातच, सोबत आवश्यक अशी खनिजेसुद्धा मिळतात. आपल्याला पोटॅशियम हे खनिज फळांमधून आणि भाज्यांमधून मिळते. हे आपल्याला बीपी नियंत्रणात आणायला मदत करते. याशिवाय रक्तदाब नियंत्रणात आणणारी काही द्रव्ये हिरव्या पालेभाज्यांमध्ये असतात. आपल्या शरीरामध्ये इन्फ्लेमेशन म्हणजेच सूज येण्याची प्रक्रिया हलक्या प्रमाणात सुरू असते, ती कमी करण्यासाठी पालेभाज्या व फळे यांची खूप मदत होते. आपल्या पोटातील उपयुक्त जीवाणूंची संख्या वाढण्यासाठी आपल्याला पालेभाज्या, फळे आणि त्यातील फायबर याचा खूप मोठा फायदा होतो. आपल्या आहारामध्ये मीठ खूप जास्त प्रमाणात असेल, तर रक्तदाब वाढण्याचा धोका असतो; पण मीठ कमी केल्यास रक्तदाब कमी होण्यासाठी मदत होते. आपल्याला साधारणपणे एका दिवसात सहा ग्रॅमपेक्षा जास्त मीठ म्हणजे एक छोट्या चमचापेक्षा जास्त मीठ आहारात नको, असे तज्ज्ञ सांगतात. आपण मिठाचे प्रमाण जर एक-दोन आठवडेसुद्धा कमी ठेवले, तर आपल्या जिभेवरील स्वाद इंद्रिये बदलून जातात आणि आपल्याला जास्त मिठाची गरज वाटेनाशी होते. आपल्याला कमी मिठामध्येसुद्धा चव जाणवायला लागते. धूम्रपान- मद्यपान टाळा- आपल्याला धूम्रपान किंवा नियमित मद्यपानाची सवय असेल, तर ते कमी करणे फार आवश्यक आहे. धूम्रपान आणि मद्यपान यामुळे आपल्या रक्तवाहिन्या, हृदय आणि रक्तदाबावर खूप मोठा फरक पडतो. सिगारेट पिल्यावर लगेच रक्तदाब वाढतो, असे दिसते. दारूमुळे रक्तवाहिन्यांची लवचिकता कमी होते. जर या सवयी बंद झाल्या, तर आपला रक्तदाब औषधांशिवायसुद्धा कमी होऊ शकतो, असे बऱ्याच रुग्णांमध्ये दिसून येते. ताणतणावाचासुद्धा आपल्या रक्तदाबावर खूप मोठा परिणाम होतो. जर सतत ताणतणाव असेल, तर आपल्या शरीरातील हार्मोन्ससुद्धा बदलून जातात. ताणतणाव हा काही काळासाठी असेल, तर तो उपयुक्त असू शकतो; पण सतत झाला तर तो आजारासाठी निमंत्रण ठरतो. म्हणून आपण ताणतणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. ध्यानधारणा, योगासने व नियमित व्यायाम हे ताणतणाव निवारण करण्यासाठी चांगले उपाय आहेत. ज्यांचे बीपी थोडेफार वाढले आहे म्हणजेच प्री-हायपर टेंशन आहे, अशा लोकांचे बीपी जीवनशैलीत पुरेसे बदल केले तर बरेचदा औषधांशिवायसुद्धा नियंत्रणात येते. काही लोकांचे बीपी जीवनशैलीतील बदल करूनसुद्धा पुरेसे नियंत्रणात येत नाही, सतत वाढलेले राहते, अशा वेळी आपल्याला औषधोपचार सुरू करावा लागतो. उच्च रक्तदाबाच्या औषधोपचारामध्ये मूत्रपिंडामधील अन्जीयोटेनसीन कन्वर्तींग इन्झाईम नावाच्या रसायनाच्या कामांमध्ये बदल करणारी औषधे बरेचदा वापरली जातात. याशिवाय लघवीमार्फत क्षार बाहेर टाकणारी औषधे यांना आपण डाययुरेटिक म्हणतो, अशी औषधे रक्तदाब कमी करण्यासाठी वापरण्यात येतात. क्लोरथालीडॉनसारखी औषधे या गटात येतात. बीटा ब्लॉकर नावाची काही औषधे रक्तदाब कमी करण्यासाठी वापरण्यात येतात. कॅल्शियम चांनेल ब्लॉकर या गटातील औषधेसुद्धा रक्तवाहिन्यांना शिथिल करण्यात मदत करतात आणि रक्तदाब कमी करतात. रक्तदाब नियंत्रणात आणणारी औषधे घेतल्यावर काही लोकांना कोरडा खोकला येऊ शकतो. तसेच, कॅल्शियम चांनेल ब्लॉकर औषधे घेतल्यावर काही लोकांना पायावर सूज येऊ शकते. बीपी कमी करणारी औषधे सुरू केल्यानंतर काही लोकांना थोडे चक्कर आल्यासारखेसुद्धा वाटू शकते. औषधांचे हे दुष्परिणाम दिसल्यास डॉक्टर औषधे बदलून देऊ शकतात. बरेचदा औषधांचे कुठलेही दुष्परिणाम दिसत नाहीत. औषध उपचारांचा फायदा जेव्हा दुष्परिणामापेक्षा मोठा असतो, तेव्हाच डॉक्टर औषध देतात, त्यामुळे आपल्या औषधांविषयी काही शंका असल्यास डॉक्टरांना भेटावे. आपणास स्वस्थ आणि तंदुरुस्त राहिलात तर मलाही सुखाची झोप घेता येईल, आपण सदैव सुखी रहावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

# विडंबन काव्यप्रकाराचा वस्तुपाठ : प्रसन्न प्रहार विडंबन काव्यसंग्रह

आधुनिक केसरी

**विडंबन काव्यप्रकार कवितेचं एक आगळे वेगळे रूप घेऊन मराठी साहित्य विश्वाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातो आचार्य प्र. के. अत्रे यांनी मराठी कवितेत आणि इथल्या जनमानसापर्यंत विडंबन काव्यप्रकार पोहोचवला आज त्यांच्या जयंती निमित्ताने एका खास विडंबन काव्यसंग्रहाबद्दल माहिती देणारा हा लेख आपल्यापर्यंत पोहोचवता येतोय याचा आनंद वाटतो. आचार्य प्र.के अत्रेनंतर विडंबनाचा बाज ज्यांनी लिलया पैलला असे ख्यातनाम विडंबनकार कविवर्य गुरूवर्य प्रभाकर साळेगावकर यांचा प्रसन्न प्रहार नावाचा विडंबन काव्यसंग्रह अत्यंत सुंदर वाचनीय असा आहे. विडंबनातली सहजता मार्मिकता त्यांच्या प्रत्येक विडंबनातून जाणवते सामाजिक प्रश्नांची उकल करणारे विडंबन या काव्यसंग्रहात आपणास वाचायला मिळतात .**

महाराष्ट्रातील एकही असा जिल्हा नसेल जिथे सरांचे विडंबन काव्य सादर झाले नसेल जनमानसाच्या हृदयापर्यंत विडंबनकाव्य पोहोचवत असतानाच सद्य स्थितीतील सामाजिक प्रश्नांवर मार्मिक पद्धतीने विनोदी पद्धतीने व विडंबनाचे मिरीट जपत लिहिलेली ही एकोणतीस विडंबणे व दोन समछंदी या प्रसन्न प्रहार विडंबन काव्यसंग्रहात वाचकांना वाचायला मिळतील गुरुवर्य प्रभाकर साळेगावकर यांना मुळात कवितेची उत्तम जाण आहे ते उत्तम वाचक, उत्तम श्रोता, आणि सुमधुर आवाजाची देन लाभलेले हे व्यक्तिमत्व मराठी साहित्यातील अद्वितीय असेच आहे.

प्रसन्न प्रहार या काव्यसंग्रहाचे नाव आपण पाहिले तर किती प्रेरक व दिशादर्शक आहे. प्रहार आहे पण तोही समाजाच्या अनिष्ट प्रथेवर न रुचणाऱ्या घटनावर उपहास आणि विनोद यांचा मध्य साधत प्रसन्नतेने केलेले भाष्य म्हणजे या विडंबन कविता आहेत. हा काव्यसंग्रह हाती घेताच निदर्शनास येणारे मन वेधून घेणारे मुखपृष्ठ आपणास पाहायला मिळते एक हातोडा ज्यावर झेंडूची फुले आहेत कवी नेहमी आपल्या सोबत ठेवणारी एक कवितेची पिशवी त्याला आपण शबनम म्हणतो ती त्या हातोड्या सोबत जोडली आहे म्हणजे वार करणारा हातोडा मृदू कोमल झेंडूची फुले हे सारं त्या शबनम मध्ये दडलेल्या विडंबन कवितेतून दिसू लागतं
अभिसंधान प्रकाशन संभाजीनगर येथून प्रकाशित झालेला हा विडंबन काव्यसंग्रह मराठी विश्वाला दिशादर्शक ठरणार आहे जेव्हा जेव्हा विडंबन काव्यसंदर्भात संशोधन व चिकित्सा केली जाणार त्या त्यावेळी प्रसन्न प्रहार या काव्यसंग्रहा शिवाय पुढे जाता येणार नाही काव्यसंग्रहातील अर्पण पत्रिका लक्ष वेधून घेते आद्य विडंबनकार आचार्य प्रल्हाद केशव अत्रे अर्थात केशवसुत यांना हा काव्यसंग्रह अर्पण केलेला आहे तसेच विनोद विद्यापीठ पुणे येथील अत्रेमय व्यक्तिमत्व श्री बाबुराव कानडे यांना अर्पण केलेले दिसते म्हणजेच प्र.के अत्रेंच्या विडंबन काव्याची पुढची छबी आपल्याला पाहायची असेल तर प्रसन्न प्रहार हा काव्यसंग्रह एक वेळी नक्की वाचावा असे मला वाटते
अनेक माध्यमातून सरांची विडंबन काव्य प्रसिद्ध झाली खूप मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी त्यांना मिळाली पण त्याहीपेक्षा ती विडंबणे जन माणसांच्या हृदयात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली अर्थात त्यासाठी सरांनी आपले संपूर्ण जीवन साहित्य कविता यासाठी समर्पित केले.
काव्यसंग्रास सरांचे प्रस्तावनारूपी मनोगत विडंबनाचे रूप उलगडून नववाचकाला संपूर्ण माहिती व्हावी या दृष्टिकोनातून चिंतनशील पद्धतीने अभ्यासपूर्ण रित्या केलेली मांडणी विडंबनाचा इतिहास वर्तमान आणि भविष्य आपल्यासमोर ठेवते
विडंबना बाबत आजच्या काळातील ख्यातनाम कवींचे भाष्य यामुळे प्रस्तावनारुपी मनोगत वेगळे ठरते एकूण एकोणतीस विडंबन कविता व दोन समछंदी प्रसन्न प्रहार काव्यसंग्रहात वाचायला मिळतात या संग्रहाची रचना आजवर कुठल्याही कवितासंग्रहाची नाही अशा पद्धतीचे आहे कारण मूळ कविता व त्यासमोरील पानावर असलेले सरांची विडंबन यामुळे वाचकाला मूळ कविता, गीत व त्यावरील विडंबन समोरासमोर वाचायला मिळते व विडंबनाबद्दल असलेली आवड रूची वृद्धिंगत होते.
हे राष्ट्र देवतांचे ग. दि. मांडगूळकर यांच्या या सुंदर गीताचे केलेले विडंबन आजच्या समग्र परिस्थितीवर भाष्य करते प्रसन्नतेने पण आपला मार्मिक पणा जपत असणारे विडंबन नाच्या या चार ओळी पाहूया...

**हे वेड घोषणांचे हे वेड शोषणाचे**
**आ चंद्र सूर्य भांडो हे भक्त भामट्यांचे**

ग. दि. माडगूळकर यांचे रचना आणि प्रभाकर साळेगावकर सरांचे मार्मिक पद्धतीने भाष्य करणारे विडंबन काव्य वाचकाला नवीनतम व उच्च कोटीची प्रसन्नता देणारे ठरते प्रत्येक विडंबनातून सामाजिक प्रश्नांची उकल करत समाज जागृती निर्माण करणारे विडंबन काव्य या काव्यसंग्रहात वाचायला मिळतात सर्वात लोकप्रिय ठरलेले सरांचे विडंबन जेथून सरांना विडंबनकार अशी ओळख निर्माण झाली कवी बी यांचे मूळ कविता चाफा बोलेना चाफा चालेना या अप्रतिम कवितेवर सामाजिक प्रश्न उचलून शेतकऱ्यांची अवस्था सांगणारे




विडंबनकाव्य प्रभाकर साळेगावकर यांनी मांडले

**काटा होईना**
**काटा होईना**
**काटा पणनचा**
**काही केल्या**
**चालना**
**किती घाम गाळूनी**
**आनलं रान**
**फडलवूनी**
**आम्ही**
**कर्जावर कर्ज काढूनरे**

अशी अनेक सुंदर प्रसन्न प्रहार करणारे प्रबोधनकारी विडंबने या काव्यसंग्रहात आहेत
मला आवडलेले विडंबन या काव्यसंग्रहातील ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या शूर आम्ही सरदार या कवितेवरील आहे. शूर आम्ही सरकार आम्हाला काय कुणाची भीती टोल गॅस अन् महागाईने प्राण घेतलं हाती आजच्या सर्व सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारे हे विडंबन मनास भावते आणि सरांच्या सुमधुर आवाजात ऐकताना तर श्रोते आपले भानच हरपून जातात निसर्गताच लाभलेल्या गोड गळ्यामुळे विडंबन सादरीकरणाची एक वेगळी शैली सरांची आहे या विडंबनातील सरदार मधील एकच शब्द बदलून म्हणजे सरकार असे केलेले विडंबन आजवर कुठेही पाहिला वाचायला मिळाले नाही ते या संग्रहात पाहायला मिळते. परम पूज्य साने गुरुजी यांच्या आता उठवू सारे रान या कवितेला आपल्या खास शैलीत मार्मिकपणे कविवर्य प्रभाकर साळेगावकर लिहितात

**आता विकूया सारे रान**
**आता फुकूया सारे रान**
**लाचखोरांच्या राज्यासाठी**
**देऊ आपले प्राण**

सरांच्या विडंबनाचे खासियत अशी की ती कधीही वाचा ती समकालीन परिस्थितीवर चपलखपणे प्रहार करतात त्रिकाल बाधित सत्य मांडणारी सांगणारी विडंबने या काव्यसंग्रहात आहेत कारण अतिशय सूक्ष्म पणे चिकित्सकवृत्तीने काळाचे भान जपत अभ्यासपूर्ण जागृकतेने लिहिलेली ही विडंबणकाव्य आहेत म्हणूनच मराठी साहित्यातला प्रसन्न प्रहार हा अतुलनीय असा विडंबन काव्यसंग्रह आहे.
अशोक पत्की यांचे राधा ही बावरी या गाण्याचे विडंबन लिहिताना सभागृह खुळखुळ हसते व कुठेतरी अंतर्मुख सुद्धा होते त्यातील काही ओळी पाहुयात

**अंगात भिनतो माज मस्त**
**पाहण्या कहर फुर फुटतो**
**विसरू भान ओढून कान**
**हा वाट गावाची लावतो**

एका दिशाहीन पुढाऱ्याबद्दल केलेले मार्मिक भाष्य तेही हास्य विनोदातून प्रबोधन करणारे दिशा देणारे असेच आहे. यासारखी अनेक विडंबने या काव्यसंग्रहात पाहायला मिळतील वाचकांनी अवश्य या काव्यप्रकाराचा आदर्श वस्तूपाठ असणारे प्रसन्न प्रहार वाचावे विडंबन काव्याबद्दलच्या संशोधनासाठी कार्य करणाऱ्या अभ्यासकांसाठी हे विडंबन पुस्तक अत्यंत महत्त्वाचे वाटते या विडंबन काव्य संग्रहात ना. धो.महानोर यांची रचना असलेले मी कात टाकली असो किंवा नारायण सुर्वे यांचे पत्रात लिहा या अनुवाद कवितेवर लिहिलेले विडंबन असू द्या किंवा काही बोलायचे आहे या कुसुमाग्रजांच्या कवितेवरील केलेले विडंबन खूप छान आणि अप्रतिम असेच आहे या काव्यसंग्रहाच्या शेवटी मुद्दाम दोन समछंदी रचना दिलेले आहेत त्या यासाठी की समछंदी आणि विडंबन यातील फरक वाचकाला कळायला हवा नाहीतर समछंदीला आपण विडंबन काव्य म्हणतो आणि आपली गफलत होऊ लागते यासाठी दिलेल्या दोन समछंदी महत्वपूर्ण वाटतात
म्हणून सज्जगपणे नवी दिशा नव्याने लिहणा-या प्रत्येकाला प्रेरक दिशादर्शक असा अफलातून असा काव्यसंग्रह प्रसन्न प्रहार हा आहे शेवटी यांची पाठराखण त्यांच्या खास लेखन शैलीमुळे लक्ष वेधून घेते आद्य विडंबनाकार प्र.के अत्रे यांच्या जयंतीनिमित्ताने एका अप्रतिम अशा विडंबन काव्यसंग्रह बद्दल लिहिण्याचा योग आला हे मी माझे भाग्य समजतो.

**डॉ.प्रवीण काळे**
**माजलगाव जि. बीड**
**8698701955**

**विडंबन संग्रह...प्रसन्न प्रहार**
**कवी...प्रभाकर साळेगावकर**
**प्रकाशक ...अभिसंधान प्रकाशन छ. संभाजीनगर . मुखपृष्ठ ...सरदार जाधव**
**मुल्य..रू.१३५/-**

# व्यर्थ न हो बलिदान...!



अय्युब पठाण लोहगांवकर,
संपर्क क्र. ९७६४३५०३७४


आधुनिक केसरी

**रामपुर गावात सखाराम नावाचा शेतकरी राहत होता. त्याला पाच एक्कर शेती होती. तो आपली पत्नी तुळसाबाई सोबत शेती करायचा. काही दिवसाने त्याला एक मुलगा झाला. त्या मुलाचे नाव रमेश असे ठेवण्यात आले. रमेश सहा वर्षाचा झाल्यानंतर गावातल्या सरकारी शाळेत जाऊ लागला. रमेश हा बालपणापासूनच चंचल, हुषार, आणि जिज्ञासू प्रवृत्तीचा होता. चौथीमध्ये असतांना त्यांना वि.दा. सावरकरांची " ने मजशी परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला." ही कविता त्यांच्या मराठीच्या शिक्षकांनी अगदी चालीवर गाऊन व राष्ट्रभक्तांचे आदर्श दाखले देऊन शिकविले होते. या कवितेचा आणि सावरकरांनी भोगलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेने रमेशच्या मनावर इतकी भुरळ घातली की, रमेशचा प्रखर राष्ट्राभिमान जागृत झाला होता, आणि त्याचवेळी रमेश असा निर्धार केला की, मोठा होऊन मी माझ्या देशाची सेवा करीन, आणि माझ्या मातृभूमीचे रक्षण करीन.**

सखाराम गायकवाड यांचा रमेश हा एकुलता एक मुलगा होता. ते रमेशला शाळेच्या सुट्टयामध्ये आपल्या सोबत शेतात घेऊन जात. शेतातील औत हाकणे, नांगरणी करणे, पेरणी, कोळपणी ही कामे कशी करतात याची शिकवणूक देत होते. परंतु रमेशचे मन त्या कामात लागत नसे, तो दुपारीच घरी यायचा आणि गावातल्या वाचनालयातून देशावर, राष्ट्रावर आधारीत पुस्तकांचे मन लावून वाचन करायचा.रामपूर गाव तस छोटसं. परंतु गावाच्या नावाप्रमाणे गावातील लोक हे प्रमाणिक व सत्याने वागाणारी होती. श्रावण- माहिन्यात मंदिरात प्रवचन, पारायन सप्ताह व्हायचा. त्यासाठी गावातले लोकं वगर्णीतून पंगती जेऊ घालायचे. सारा गाव धार्मिक कार्यात हिरारीने सहभागी व्हायचा,त्यामुळे रामपूरमधील वातावरण नेहमीधार्मिक राहत असे.

रमेश आता आठरा वर्षाचा झाला होता. त्याने दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. रमेश तसा उंच -पुरा धिप्पाड तरुण होता. रमेश सहज एके दिवशी भारतीय सैन्यदलात भरती होण्यासाठी शहरात गेला, आणि सैन्यात भरतीदेखील झाला. हे सारे रमेशच्या मनाप्रमाने घडले होते. परंतु सखाराम आणि तुळसाबाई या गोष्टीला विरोध होता. कारण सखाराम म्हणायचा, " रमेश, ही पाच एक्कर जमीन तुझ्या एकटयाचीच आहे, मग तु कशाला सैन्यात भरती होतो. आपली शेती करशील व नेहमी आमच्या डोळ्यासमोर राहशील." परंतु गावातल्या काही अनुभवी वृध्द व जाणकार बुजुर्ग व्यक्तीनी सखाराम व तुळसाबाईची समजूत काढून रमेशला सैन्यदलात जाण्यासाठी त्याच्या आई-वडिलांचे मन वळविले. दोन-तीन दिवसांनी रमेशला सैन्यदलाच्या कार्यालयातून बोलावणे पत्र आले. रामपूर गावात रमेश गायकवाड सैन्यात भरती झाला,ही बातमी वाऱ्यासारखी रामपूरच्या घराघरात पोहचली.

रमेशने सैन्यदलाच्या अधीकाऱ्याकडून आपले नियुक्तपत्र घेतले,मध्यप्रदेशातील जबलपूर या ठिकाणी एका वर्षाच्या प्रशिक्षणासाठी रमेशला रेल्वेने पाठविण्यात आले.प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर रमेशची जम्मुकाश्मीरातील सिमावर्ती भागात, " नाईक " या पदावर नियुक्ती झालेली होती. रमेशने याठिकाणी तीन वर्षे चांगले कार्य केले. यावेळी त्याने शत्रुंच्या बऱ्याच सैनिकांना जखमी करून त्यांना कंठस्नान घातले.मध्यंतरी रमेशला दोन



महिन्याची सुटी मिळाली होती. सखारामने अगोदरच रमेशच्या मामाची मुलगी पूजा हीचा विवाह रमेशशी व्हावा असे मामा,व सर्व नातेवाईकांनी ठरविले होते.ठरल्याप्रमाणे रमेशचे लग्न पूजाशी थाटामाठात पार पडले. रमेशची सुट्टी संपत आली होती, सुट्टी संपल्यावर रमेश पुन्हा जम्मू कश्मीरच्या पुंछ भागातील सीमेवर रुजू झाला. शुत्रचे सैनिक व दहशतवादी हे भारतीय सिमारेषा ओलांडून भारताच्या हद्दीत प्रवेश करायचे आणि भारतात घातपात घडवून आणायचे. परंतु रमेश आणि त्याच्या तुकडीतील इतर सैनिकांनी शत्रुचे हे मनसुबे नेहमी हाणून पाडायचे. त्यात शत्रुंच्या सैनिकांचा व दहशतवादयांचा खात्मा होत असे.

रमेशचे आईवडिल, पत्नी पूजाशी नेहमी फोनवरून संभाषण होत असे,आणि रमेश अधुन-मधुन सुट्टीत गावी यायचा.काही दिवसाने रमेशला मुलगा झाला.रमेश मुलाला भेटण्यासाठी आठ दिवसाची सुट्टी काढून आला होता. रमेशच्या मुलाचे " अंकुश गायकवाड " असे नामकरण करण्यात आले. रमेश पुन्हा आपल्या नोकरीच्या ठिकाणी हजर झाला.रमेशचा मुलगा २४ जूनला एक वर्षाचा होणार होता, आणि रमेश मुलाच्या वाढदिवसाला येणार होता, परंतु सीमेवर शत्रुंच्या सैनिकांच्या व दहशतवादयांच्या छुप्या कारवाया वाढलेल्या होत्या. त्यामुळे रमेशला सुटी मिळाली नाही.अशातच सीमेवर रमेश व त्याचे सैनिकीय तुकडी गस्त घालत असतांना दहशतवादयांची टोळी ही भारताच्या सरहद्दीत सीमारेषा ओलांडून प्रवेश करू लागली होती, आणि त्याचवेळी सीमेपलीकडून शत्रुंच्या सैनिकांनी रमेशच्या तुकडीवर बेछुट गोळीबार सुरू केला. रमेशने दुश्मनाच्या दोन सैनिकांना यमसदनी पाठविले.परंतु दहशतवादयांच्या टोळीने केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये दोन गोळ्या रमेश व त्याच्या एका साथीदाराच्या छातीतून आरपार गेल्या. शत्रुंचे सैनिक आणि भारतीय जवान यांच्यात सहा तास गोळीबाराची चकमक सुरू झाली, तो दिवस २३ जूनचा होता.रमेशने एका दहशतवादयाचा खात्मा केला, व त्यांच्या तुकडीतील इतर सैनिकांचे दोन जणांना यमसदनी पाठविले, परंतु सीमेपलीकडून अचानक पुन्हा एक गोळी रमेशच्या छातीतून आरपार निघून गेली. रमेश कोसळून रक्ताच्या थारोळ्यात पडला, व त्याच्या तोंडातून शेवटचे शब्द निघाले ते, " भारतमाता की , " आणि तो धारातीर्थ पडला.

भारताच्या प्रसारमाध्यमांनी रमेशचा फोटो व तो शहीद झाल्याच्या बातम्या दिल्या.महाराष्ट्रातील वीर जवान, रमेश सखाराम गायकवाड यांना वीर मरण आले.दरम्यान भारतीय जवानही शत्रुला चोख उत्तर देत होते.आपल्या लाडक्या वीराला निरोप देण्यासाठी रामपूर गावात पंचक्रोशीसह गावागावांच्या कानाकोपऱ्यातून नागरीकांनी अलोट गर्दी केली होती, " भारतमाता की जय, हिंदुस्थान जिंदाबाद,रमेशभैय्या अमर रहे," या घोषणा आणि लष्कराच्यावतीने व नागरीकातून दिल्या जात होत्या, त्यानंतर लष्कराने बंदुकीतून हवेत तीन फैरी झाडून मानवंदना दिल्यावर अवघ्या एका वर्षाचा मुलगा अंकुशने आपल्या वीर पित्याला भडाग्नी दिला. तेव्हा वातावरण स्तब्ध झाले होते, आणि आरोळ्या अक्रोशाने सारा रामपूरचा परिसर दणाणून गेला होता.

अंकुश हा २४ जूनला एक वर्षाचा होणार परंतु, " मला येता येणार नाही,"असे सांगून गेलेले बाबा असे अचानक वाढदिवसाला कसे हजर झाले. तुम्ही तुमचे वचन कसे तोडले म्हणून टाहो फोडणारी वीरपत्नी पूजा, वडील सखाराम गायकवाड आणि इतर कुटुंबीय. तर ज्या हातानी आज केक कापायचा होता, त्याच हातात भारतमातेच्या रक्षणासाठी शहीद झालेल्या वीर पित्याच्या पार्थिवाला अग्नी देण्यासाठी चिमुरडया अंकुशच्या हाती टेंभा होता. वीरपत्नी पुजाच्या काळजाला चिरणाऱ्या किंकाळ्यामुळे हजारो मने हळहळली. सारे काही अकस्मात, अकल्पीत तरीही देशासाठी लढणाऱ्या रमेश गायकवाडचे बलिदान व्यर्थ न जावो, असे साऱ्यांना वाटत होते. त्यात वडील सखाराम गायकवाड यांची तर छाती स्वाभिमानाने फुलली होती. त्यांच्या एका डोळ्यात अश्रु तर दुसऱ्या डोळ्यात तेजाळती राजनिष्ठा दिसत होती.

# नाहीं संतपण मिळत ते हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

कोणताही सृजन आपली निर्मिती साकार करतांना काय करत असतो? त्याच्या नवनिर्मितीमागील आणि भविष्यातील कल्पना आणि संकल्पना काय असतात? लेखन आणि इतर कलाविष्काराच्या माध्यमातून सर्वच भाषेचे सुज्ञ अभ्यासक, चिंतक आणि समीक्षक या प्रश्नाच्या अनुषंगाने बोलत-लिहित असतात. या प्रश्नांच्या जोडीने त्या निर्मितीचे सौंदर्यशास्त्र, त्याची मूलगामी बैठक आणि त्याचे सार्वकालिक परिणाम काय असतील इत्यादी बाबींचा उहापोह होतंच असतो आणि सातत्याने व्हायलाच पाहिजे. पाश्चिमात्य वाङ्मय इतिहासात एक काळ असाही येऊन गेला, जिथे समीक्षकांना भिऊन लेखक-कवींनी लेखनच बंद केले. दुसरीकडे भारतात यापेक्षाही खडतर काळ येऊन गेला.

जिथे समीक्षा राहिली दूर आणि वर्ण व्यवस्थेवरून नियमांचे उल्लंघन केले म्हणून अनेकांच्या कलाकृती नष्ट केल्या गेल्या, बुडवल्या गेल्या. लेखनाचा इतिहास मोठा क्रांतिकारी आहे. अनेक विस्मयकारक बाबी लेखनाच्या बाबतीत होऊन गेल्या आहेत. अगदी प्राचीन कालखंडापासून जगातले सर्वच लेखन जर आजपर्यंत जशाला तसे उपलब्ध असते तर वर्तमान काळात शास्त्रज्ञ आणि इतर संशोधकांना एवढे कष्ट घ्यावे लागले नसते. आज लोक बुद्धिमान, संशोधक वगैरे आहेत, परंतु आपले पूर्वज आपल्यापेक्षा कितीतरी पटीने बुद्धिमान, निर्मितीक्षम, कुशल, दृष्टे, बहुआयामी, वैश्विक, विद्वान, बुद्धिमान होते यात तिळमात्र शंका नाही! यासाठी फार काही खोलवर संशोधन करण्याची सुद्धा आवश्यकता नाही. हे पहायचे असेल तर कोणत्याही लेणी किंवा प्राचीन वस्तूला ( मंदिर वगैरे ) भेट द्या, आपल्या विद्वत्ता-बुद्धी-चातुर्याचा दंभ गळून पडेल. तिथे फक्त नतमस्तकच व्हावे लागते! त्यापैकी आमच्या औंढा नागनाथ येथील नागेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर हे जगातील सर्वोत्तम शिल्प म्हणजेच सृजनत्वाचा उत्कृष्ट दाखला होय!

जगद्गुरू तुकोबाराय याच सृजनत्वाच्या मांदियाळीतील एक उत्तमोत्तम रत्न म्हणावे लागेल. अनेक वैश्विक निर्मितीपैकी तुकोबांचे अभंग ही एक सर्वोत्तम निर्मिती! वर्णव्यवस्थेच्या आघाताने आणि काळाच्या तडाख्यात चारशेहून जास्त वर्षे होऊन देखील हे अनमोल अभंगरत्ने धीरोदात्तपणे तुम्हा-आम्हाला मार्गदर्शन करत आहेत, नव्याने जगण्याची उभारी देत आहेत, नवनवा विचार शिकवतांना विवेकी चिंतन करायला प्रवृत्त करत आहेत. अशा सृजनशिल आणि संवेदनशील लोककवी तुकोबांना वाचतांना नेहमीच एकावर एक धक्के लागत असतात. आपण आपल्या भोवतालच्या लोकांना काय बोलतो, उपदेश करतो आणि आपण स्वतः कसे कर्तव्य आणि वर्तन करतो( ? ) याचा सुद्धा त्या त्या व्यक्तीच्या निर्मितीच्या प्रभावाचा परिणाम दृगोचर होतोच. त्याच अनुषंगाने समकालीन समाजाची समीक्षा करतांना तुकोबाराय आपली स्वतःची सुद्धा भीडभाड ठेवत नाहीत. एवढेच काय ते स्वतःविषयीच बोलतांना जनमानसाला उपदेश करतात. असा माणूस त्या त्या काळातील समाजाला, व्यवस्थेला पचत नसतो. हे वैश्विक सत्य नाकारून चालणार नाही. त्यापैकीच

**तुकारामनीती**
**भाग -64**

नाहीं संतपण मिळत ते हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥१ ॥
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥२ ॥
तुका म्हणे मिळे जिवाचिये साठी । नाहीं तरी गोष्टी सांगो नये ॥३ ॥
( अ.क्र.१२०५ )

प्रस्तुत अभंगात तुकोबाराय आपला नैसार्गीक स्वभाव प्रकट होतात. सतरावे शतक मोठे खडतर होते. वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था अत्यंत कठोर होती. अभिव्यक्ती स्वातंत्र्य नावाची गोष्टच अस्तित्वात नव्हती. असे असतांना देखील माणसे आपले काम करायची आणि का केले( ? ) म्हणून व्यवस्था त्यांना जीवे मारायची. अगदी इसवीसपूर्व कालखंडात महान तत्ववेत्तासॉक्रेटिसला जेल मध्ये टाकले, शेवटी विष प्यायला लावले आणि संपवले. असा भयंकर परिणाम असला तरी सच्चा सृजन आपली निर्मिती थांबवत नसतो. उन, वारा, थंडी, पाऊस इत्यादीचा सामना करून कृषक जसा आपली मायभूमी कसतो; त्याच न्यायाने जीवाची पर्वा न करता सृजन आपले काम करत असतो. याचे पुरेपूर जाण आणि भान तुकोबांना आले होते. आपल्या भोवताल चाललेला अवडंबर, धर्माचा, भक्तीचा बाजार तुकोबांना असह्य होत होता. त्यातून ते विमनस्क होऊन घरून, गावातून डोंगरावर निघून जात आणि आपल्या भोवतालच्या दगड-धोंड्यांना बोलत. त्यांच्याशी संवाद साधतांना त्यांच्या मुखावाटे सहजतेने अभंग येत असत. त्यातील जे खोलवर गेलेले काही अभंग स्मरणात राहतील तेच अभंग कीर्तनात म्हणायचे आणि त्यांच्या मागोमाग भजनकरी, समोरील श्रोते म्हणायचे. तुकोबांचा हा विचार मोठा खडतर आणि रोखठोक असायचा. त्यापैकीच हा एक अभंग.

संत आणि संतपण म्हणजे काय ? संत म्हणजे शांत. संत म्हणजे आप-पर भावाच्या पलीकडे जाणे. षड्विकार रहित जीवन जगणे म्हणजे संतपण जगणे होय! श्रीमद् भगवद्गीतेत भगवान श्री कृष्ण संत लक्षणे

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च | निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी || १३ || संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्च यः | मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः || १४ ||

अशी सांगतात. याला जोडून माऊली आपल्या ज्ञानेश्वरीत संतांची आणखी काही लक्षणे सांगताना लिहितात जो सर्व भूतांचां ठायीं । द्वेषातें नेणेचि कहीं । आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ||४४|| उत्तमातें धरिजे । अधम तरी अव्हेरिजे । हें कांहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ||४५|| कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न म्हणेचि कृपाळु । प्राणु पैं गा ||४६|| गाईची तृषा हरूं । कां व्याघ्रा विष होऊनि मारूं । ऐसें नेणेचि कां करूं । तोय जैसें ||४७|| तैसी आघवांचि



भूतमात्रीं । एकपणें जया मैत्री । कृपेसि धात्री । आपणपां जो ||४८|| आणि मी तूं हे भाष नेणे । माझें कांहींचि न म्हणे । सुखदुःख जाणणें । नाहीं जया ||४९|| जो द्वेष रहित असतो, अहंकार रहित असतो, सतत संतुष्ट असतो, जो सर्वत्र असतो, आपपर भाव रहित, चैतन्यासारखा द्वेष रहित, पृथ्वी सज्जन आणि चोर यांत भेद करत नाही तसा, प्राण-वायू गरीब-श्रीमंत पहात नाही, पाणी गाय-वाघ भेद पाहत नाही, याप्रमाणे संत सर्वांसी मैत्री करून मी-तू भेद टाकून सर्वांचे सुखदुःख समसमान जाणतो. याशिवाय माऊली संतांची अनेक गोष्टींशी तुलना करतांना; जसे पाउस पडो अथवा न पडो, समुद्र जसा नित्य ओतप्रोत भरलेला असतो तसा संत ओतप्रोत, नित्य, निर्भर, संतुष्ट समुद्र असावा!

अशी लक्षणे असलेला व्यक्तीचं संत असू शकतो. असे होण्यासाठी कोणतेही अवडंबर किंवा सोंग आणण्याची गरज नाही. तुकोबाराय म्हणतात, असा संत आणि त्याच्या सोबतीने येणारे अंतर्बाह्य संतपण हे कुठे बाजारात विकत भेटत नाही. असे संतत्व गिरी-कंदरी, रानीवनी फिरून मिळत नाही. कितीही पैसे देऊन मिळत नाही. असे संतपण आकाशात अथवा पाताळातून प्राप्त होत नाही. असे संतपण आपल्या सर्वांच्या जिवाचाच म्हणजे दैनंदिन जगण्याचाच एक नैसर्गिक भाग आहे! त्यासाठी आपण सर्वानीच असे संतत्वाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करण्याची अपेक्षा जगद्गुरू करतात. त्याकाळी धर्माच्या, संतत्वाच्या नावाखाली भोंदूगिरी, अवडंबर, भेदाभेद, पिळवणूक, शारीरिक-मानसिक शोषण होत होते. त्यासाठी तूकोबांनी हे खडे बोल सुनावले आहेत. तत्कालीन व्यवस्थेला तुकोबाराय पटले नाही. धर्ममार्तंडांच्या कमाईवर आणि शोषणावर तूकोबांनी गंडांतर आणले. त्यांचे उत्पन्न थांबविले. याचा परिणाम म्हणजे तुकोबांना मार खावा लागला. आपले रोखठोक अभंग बुडवावे लागले. परंतु आपण हे नेहमी लक्षात घेतले पाहिजे की; विचार अथवा माणूस बुडवून-मारून संपत नसतो. तो सृष्टीत कायम रहात असतो. तुकोबांचे अभंग जनमाणसात तरले. लोकांचे ह्रदय त्यांनी धरले. त्यातूनच ते नित्य नित्य लोकप्रवाही ठरले.

आज वर्तमानात सुद्धा तुकोबांच्या या शब्दांवर चिंतन-मंथन करणे क्रमप्राप्त ठरते. नव्हे नव्हे, ती आपली सर्वांची मोठी जबाबदारी आहे. तुकोबा कडेकोट वर्णव्यवस्था आणि राजेशाहीत असतांना एवढे रोखठोक बोलायचे- लिहायचे. आज लोकशाही असतांना बोलता-लिहिता येते का ? हा अत्यंत महत्वपूर्ण प्रश्न आहे. आज सुद्धा धर्म क्षेत्रात मूलगामी प्रबोधनाची नितांत आवश्यकता आहे. धर्म आणि जीवन ? धर्म म्हणजे काय ? धर्म म्हणजे बाह्य देखावा करणे काय ? धारण करणे म्हणजे धर्म! माणुसकी, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सह्रदयता, देश, जीवन इत्यादी महत्वपूर्ण बाबींचा अंतर्भाव असणारा वैश्विक विचार मांडणारा धर्म म्हणजे मानव धर्म! हे प्रतिपादन करण्याची गरज आहे. आज सर्वच धर्मातील मूलगामी तत्वज्ञान धूसर होत चालले असून थोतांड, कर्मकांड, दाखवेगिरी, रंगाचे बीभत्स प्रदर्शन इत्यादी बाबींनी थैमान घातले आहे. खरा धार्मिक कोण आणि खोटा-बेगडी धार्मिक कोण ? यातील अंतर अस्पष्ट झाले आहे. त्यासाठी सर्वच धर्मात विवेकशील, उच्च शिक्षित, चिंतनगर्भ, अभ्यासू, वैश्विक विचारांची बैठक असणाऱ्या जबाबदार लोकांनी आपल्या भोवताल समाजाचे मूलगामी प्रबोधन करण्याची गरज येऊन ठेपली आहे. त्यासाठी सर्वच धर्मातील धर्म प्रसारकांनी आपल्या धर्म ग्रंथातील मूलगामी सूत्र आणि आपापल्या धर्मातील भूतकाळातील महान लोकांच्या जीवनाचे अनुकरण करून प्रबोधन करणे अत्यंत गरजेचे आहे. असे झाले तर वर्तमान मोबाईलच्या आहारी गेलेली तरुण पिढी धर्माचा नीट अर्थ समजून घेतील. त्यांच्यात सकारात्मक, वैश्विक विचारांची रुजवणूक होईल. परिणामी धर्माधर्मात कडेकोट भिंती उभ्या राहणार नाहीत. असे होणे म्हणजेच तुकोबांच्या शब्दांचे आणि त्याच्या जोडीने या तुकाराम नीती सदराचे सार्थक होईल! जय तुकोबाराय!

# भारतात गरिबी कमी होत आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार २००५ -२००६ ते २०१९ -२०२१ या अवघ्या १५ वर्षांत भारतात एकूण ४१.५ कोटी लोगरिबीतून बाहेर आले आहेत. जागतिक बहुआयामी गरीबी निर्देशांक (एमपीआय) च्या ताज्या अपडेटमध्ये असे म्हटले आहे. हे युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या ऑक्सफर्ड पॉव्हर्टी अँड ह्युमन डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह यांनी प्रसिद्ध केले आहे. अहवालानुसार, भारतासह २५ देशांनी १५ वर्षात त्यांचे जागतिक MPI मूल्ये (गरिबी) यशस्वीरित्या निम्मे केले, ही आकडेवारी या देशांमध्ये वेगाने प्रगती दर्शवते.

या देशांमध्ये कंबोडिया, चीन, काँगो, होंडुरास, भारत, इंडोनेशिया, मोरोक्को, सर्बिया आणि व्हिएतनाम यांचा समावेश आहे.

लोकांच्या उत्पन्नाच्या आधारे देश गरीबांची गणना करतो. मूलभूत उष्मांक पातळीचे अन्न पुरवण्यासाठी आवश्यक सरासरी उत्पन्न किती आहे हे ते ठरवतात. त्या आधारे दारिद्र्यरेषा निश्चित केली जाते. या पातळीपेक्षा कमी कमावणारा कोणीही गरीब आहे. दारिद्र्यरेषा निश्चितीच्या या प्रमाणामध्ये एक कमतरता आहे. म्हणजेच गरिबीच्या इतर आयामांकडे दुर्लक्ष करते. उदाहरणार्थ, एकीकडे बेघर व्यक्ती आणि दुसरीकडे ज्याच्याकडे वीज जोडणीसह हवेशीर घर आहे, ते दोघेही उत्पन्नाच्या आधारे दारिद्र्यरेषेखाली असू शकतात, परंतु प्रत्यक्षात बेघर व्यक्तीची स्थिती घर असलेल्या व्यक्तीपेक्षा वाईट आहे.भरतात गरिबी कमी होत असली अशी आकडेवारी समोर येत असली तरी प्रत्येक जण श्रीमंत होत आहे का ? आकडेवारी काय दर्शविते ?



असे कुटुंब वंचित किंवा गरीब मानले जाते ज्यात 10 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने किमान सहा वर्षे शालेय शिक्षण पूर्ण केलेले नाही, जो बहुतेक देशांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा कालावधी आहे. ज्या कुटुंबाचे शालेय वयाचे मूल आठवी पूर्ण होईपर्यंत शाळेत जात नाही असे कुटुंब देखील वंचित मानले जाते.

कोणत्याही सदस्याने प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या कुटुंबांची संख्या २००५-०६ मधील २४ % वरून २०१९-२१ मध्ये ७.७% पर्यंत घसरली. त्याच वेळी, ज्या कुटुंबांची मुले शाळेत जात नाहीत त्यांची संख्या याच कालावधीत १९.८% वरून ३.९% पर्यंत घसरली आहे. चिंतेची बाब म्हणजे, अलिकडच्या वर्षांत घसरणीचा हा दर मंदावला आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२३ मध्ये, भारत १४२८.६. दशलक्ष लोकसंख्येसह चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल. अहवालात म्हटले आहे की, 'विशेषतः भारताने गरिबीत लक्षणीय घट दर्शविली आहे. येथे १५ वर्षांच्या ( २०५-०६ ते २०१९-२१ ) कालावधीत ४१.५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले. अहवालात असे सुचवले आहे की गरिबीचा सामना केला जाऊ शकतो, जरी कोविड-१९ साथीच्या आजाराच्या काळात सर्वसमावेशक डेटाच्या अभावामुळे तत्काळ संभाव्यतेचे मूल्यांकन करण्यात आव्हाने उभी राहिली. २००५-६ ते २०१९-२१ या काळात भारतात ४१.५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले. २००५-२००६ मध्ये जिथे गरिबांची लोकसंख्या ५५.१ टक्के होती, ती २०१९-२१ मध्ये १६.४ टक्के झाली. पोषण आणि बालमृत्यूच्या आकडेवारीतही सुधारणा झाली आहे. २००५-०६ मध्ये, भारतातील सुमारे ६४५ दशलक्ष लोक गरिबीच्या यादीत समाविष्ट होते, ही संख्या २०१५-१६ मध्ये सुमारे ३७० दशलक्ष आणि पुढे २०१९-२१ मध्ये २३० दशलक्ष इतकी कमी झाली. अहवालानुसार, भारतातील सर्व निर्देशकांमध्ये गरिबीत घट झाली आहे. गरीब राज्ये आणि गटांनी, ज्यात मुले आणि वंचित जाती गटातील लोकांचा समावेश आहे, सर्वात वेगाने प्रगती केली आहे. अहवालानुसार, भारतातील पोषण निर्देशकांखाली बहुआयामी गरीब आणि वंचित लोकांची संख्या २००५-०६ मधील ४४.३ टक्क्यांवरून २०१९-२०२१ मध्ये ११.८ टक्क्यांवर आली आहे. या काळात बालमृत्यूचे प्रमाण ४.५ टक्क्यांवरून १.५ टक्क्यांवर आले. गरिबांमध्ये स्वयंपाकाच्या इंधनाची वाढती उपलब्धता अहवालानुसार, भारतात स्वयंपाकाच्या इंधनापासून वंचित राहिलेल्या गरिबांची संख्या ५२.९ टक्क्यांवरून १३.९ टक्क्यांवर आली आहे. दुसरीकडे, जिथे २००५-२००६ मध्ये ५०.४ टक्के लोक स्वच्छतेपासून वंचित होते, त्यांची संख्या २०१९-२०२१ मध्ये ११.३ टक्क्यांवर आली आहे. पिण्याच्या पाण्याच्या प्रमाणाबद्दल बोलायचे तर, या कालावधीत बहुआयामी गरीब आणि वंचित लोकांची टक्केवारी १६.४ वरून २.७ वर आली आहे. विजेशिवाय राहणाऱ्या लोकांची संख्या २९ टक्क्यांवरून २.१ टक्क्यांवर आली आणि घर नसलेल्या गरीबांची संख्या ४४.९ टक्क्यांवरून १३.६ टक्क्यांवर आली.




# थोडक्यात उत्तर

आधुनिक केसरी

एक दिवस, बिरबल बागेत फिरत असताना सकाळच्या ताज्या हवेचा आनंद घेत होता की अचानक एक माणूस त्याच्या जवळ येऊन बोलला 'तुम्ही मला सांगू शकता की बिरबल कुठे मिळेल ?'

'बागेत.' बिरबल बोलला. तो माणूस काहीवेळ थांबला आणि बिरबलला बोलला 'तो कुठे राहतो ?' 'त्याच्या घरात.' बिरबलने जोरात उत्तर दिले. तो माणूस अजून काही वेळ थांबला. थोडा वैतागून त्याने पुन्हा विचारले 'तुम्ही मला त्याचा पूर्ण पत्ता का देत नाही ?' 'कारण तुम्ही मला त्याचा पूर्ण पत्ता विचारलाच नाही ?' बिरबलने आणखी जोरात उत्तर दिले. 'तुम्हाला लक्षात येत नाही का, मी काय विचारू इच्छित आहे ते ?' त्या माणसाने पुन्हा प्रश्न केला. 'नाही.' बिरबलने उत्तर दिले. तो माणूस काही वेळ शांत राहिला, बिरबलचे फिरणे चालूच होते. त्या माणसाने विचार केला की, मी असे विचारले पाहिजे की तू बिरबलला ओळखतो का ? तो माणूस पुन्हा बिरबलच्या जवळ गेला आणि बोलला 'बस, मला तू फक्त इतके सांग की तू बिरबलला ओळखतो का ?' 'हो, मी ओळखतो.' बिरबल उत्तरला. 'तुझे नाव काय आहे ?' त्या माणसाने विचारले. 'बिरबल.' बिरबलने उत्तर दिले. तो माणूस चकित झाला. तो बिरबललाच इतक्या वेळापासून बिरबलचा पत्ता विचारत होता आणि बिरबल होता की जो स्वतःहून स्वतःबद्दल सांगत नव्हता की तो बिरबल आहे. त्याच्यासाठी ही आश्चर्याची गोष्ट होती. 'तू किती मजेदार माणूस आहेस!' असे बोलत तो माणूस काहीसा त्रासदायक दिसत होता, 'मी तुला तुझ्याबद्दलच विचारत होतो, आणि तू काहीतरी वेगळेच सांगत होतास' सांग, तू असे का बरे केले ? 'मी फक्त तू विचारलेल्या प्रश्नांची सरळ सरळ उत्तरे दिली.' बिरबल बोलला. बिरबलची हुशारी आणि चातुर्य बघून त्या माणसाला हसू आले. तो माणूस म्हणाला 'त्याला त्याच्या काही घरगुती समस्या सोडविण्यासाठी बिरबलची मदत घ्यायची होती' त्यावर बिरबलने मदतीसाठी होकार दिला.

# मगर ये देश रहना चाहिए



हर्षवर्धन घाटे,नांदेड
संपर्क क्र. ९८२३१४६६४८

आधुनिक केसरी

**लोकशाही देशांमध्ये निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असते. आपला नेता कोण आणि आपली विचारधारा कोणती याची स्पष्टता घेऊनच लोक मतदान करतात. लोकशाहीत विचारधारा आणि त्यांची धोरणे याबरोबरच लोकांना वाटणारा पक्षावरील विश्वास हाही महत्त्वाचा असतो. अलीकडे हा विश्वासच अधिक डळमळीत होईल अशी स्थिती संबंध देशभरात निर्माण झाली आहे . भारतीय जनता पक्ष आपला प्रबळ विरोधक कोणीही नसावा या अहंमगंडातून विरोधी विचारधारा जोपासणाऱ्या लोकांना वेगवेगळ्या पद्धतीची दडपशाही वापरून आपल्याला अनुकूल धोरणे ते कसे घेतील यासाठीच पूर्ण आपली शक्ती खर्ची घालताना दिसुन येत आहे. लोकशाही प्रणालीमध्ये कुठल्याही पक्षाला आपला पक्ष महाशक्ती म्हणून विकास पावावा असे वाटणे साहजिक आहे परंतू केवळ आपणच एकटे महाशक्तीशाली बनण्यासाठी वाटेल ते आयुधे लोकशाही प्रणालीमध्ये वापरून विरोधकांना नामोहरम करीत केवळ भाजपच महाशक्तीशाली पक्ष आहे.**

हे सिद्ध करण्याच्या प्रयत्नात दिवसेंदिवस हा पक्ष रसातळाला जातो आहे. एकेकाळी केवळ दोन खासदार आणि राजकीय दृष्ट्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या या पक्षाची आजची वाटचाल ही आश्चर्यचकीत आणि थक्क करणारी आहे यात कुणाचेही दुमत नाही. परंतू २०१४ च्या विजयानंतर या पक्षाला जी सत्तेची झिंग चढलेली आहे ती पहाता या पक्षाची आगामी काळात वाताहत होईल हे विधान आज धाडसाचे वाटत असले तरी ते नक्की होणार यात कसलेही दुमत नाही. एकेकाळी भष्टाचार आणि राष्ट्रद्रोही म्हणून टिका करणाऱ्या पक्षातील नेत्यांनाही अलीकडच्या काळात या पक्षाने आपल्यात सामावून घेतलेले आहे. आज भाजपविरोधी पक्षात असणारा नेता कितीही स्वच्छ आणि राष्ट्रप्रेमी असला तरी तो कसा नालायक आहे हे सिद्ध करण्याचा एककलमी कार्यक्रम हा पक्ष आणि त्याचे बाजारू नेते राबवितात. त्या नेत्याला एकतर भाजपात सामिल व्हावे लागते किंवा तपासयंत्रणाच्या पाशवी जुलमाला सामोरे जावे लागते.याचे ताजे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सत्तेत नव्याने सहभागी झालेला अजित पवार गट घेता येईल. माणसाला एकदा सत्ता आणि पदांची हाव लागली की माणूस त्यासाठी काहीही करू शकतो हे अजित पवारांच्या उदाहरणावरून दिसून येते. केवळ तपास यंत्रणांच्या दहशतीमुळे अजित पवार गट भाजपात सामिल झाला हे अजित पवारांचे काहीशे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला गेला हे तितकेसे खरे नाही. अजित पवार हे महाराष्ट्रातील एक कसलेले आणि मुरब्बी नेते आहेत. आपल्या काकांच्या राजकीय छत्रछायेखाली त्यांनी राजकारणाचे धडे गिरवलेले आहेत.शरद पवारांचा राजकीय पिंड आणि कार्यशैली पाहिली तर अजित पवारांनी घेतलेली भूमिका ही काहीही चूकीची नाही. याचे कारण अजित पवारांची राजकीय अभिलाषा काही लपून राहिलेली नाही. त्यांनी ती वेळोवेळी तशी जाहीर भाषणांमधून महाराष्ट्रातील जनतेसमोर प्रदर्शित केलेली आहे.आपल्या काकांच्या हयातीतच संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मालकी आपल्यालाच मिळावी अशी त्यांची मनोभूमिका आहे. सुप्रिया सुळे यांना पक्षात दिलेले जाणारे अवाजवी महत्त्व ओळखून आगामी काळात त्यांच्याच नेतृत्वाखाली हा पक्ष वाटचाल करेल आणि त्यात अपेक्षीतच आपले स्थान दुय्यम राहील हे हेरूनच अगदी पद्धतशीरपणे त्यांनी आपल्याला अनुकूल अश्या आमदारांचा एक गट त्यांनी पक्षात जिवंत ठेवला. हा गट शरद पवार राजीनामा दिल्यानंतर त्यांनी तो निर्णय कायम ठेवावा यासाठीच प्रयत्नांची पराकाष्ठा करून शरद पवार हे आता घेतलेला निर्णय कायम ठेवतील अशीच आशा बाळगून होता. परंतू शरद पवारांवर प्रेम करणारा जो सामान्य मतदार वर्ग महाराष्ट्रामध्ये होता त्याचे एक दडपण आणि अजित पवारांची संभाव्य रणनिती स्पष्ट दिसत असताना आपण हा घेतलेला निर्णय आत्मघातकी होऊन शिवसेनेसारखी आपल्या पक्षाची वाताहत होऊन आपलाच पक्ष आपल्या हातातून जाईल अशी एक साधार भिती शरद पवार बाळगून होते. त्यातूनच त्यांनी आपला निर्णय बदलला आणि अजित पवारांना आता काहीतरी केल्याशिवाय पर्याय उरला नाही. यावेळी आपण जर काही करू शकलो नाही तर आपल्या सोबत असलेल्या आमदारांचाही आपण विश्वास गमावू अशी शक्यता लक्षात घेऊन अजित पवार गट सत्तेत सहभागी झाला.त्यामुळे सोबतीला घेऊन आलेल्या आमदारांना सत्तेचे लाभ मिळाले आणि काहीअंशी आपल्यावरील विश्वासही कायम ठेवता आला. त्यांनंतर काही काळ महाराष्ट्रातील राजकीय वातावरणामध्ये एक अस्वस्थता निर्माण झाली होती. आजचे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण पहाता महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. पक्षांची पडझड झाली आमदार पळवले गेले तरी उध्दव ठाकरे आणि शरद पवार हे दोन्ही नेते नाउमेद न होता शांत राहून सोबतीला असलेल्या संघटनाच्या आणि राजकीय कार्यकर्त्यांच्यां बळावर नव्याने पक्षाची उभारणी करण्यासाठी महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. कोणत्याही क्षणी निवडणुका लागल्यास आपला पक्ष त्यास सामोरे जाईल इतपत त्यांनी आपला प्रभाव आणि जम बसवलेला आहे.

अशास्थितीत एकनाथ शिंदे गटाने दिल्लीश्वरांच्या राजकीय बळावर आणि आशीर्वादाने शिवसेना पक्ष चिन्ह स्वतः कडे ठेवून घेऊन ही लढाई आपण जिंकली असे भासवत असले तरी शिवसेना पक्षप्रमुख असा स्वतःचा कुठेही ते उल्लेख करताना दिसत नाहीत. याउलट मुख्य नेते अशी काहीशी ते त्यांची ओळख करून देत आहेत. एकनाथ शिंदे हे काही स्वंयभू नेते नाहीत हे उघड आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्याला प्रबळ विरोध करून महाविकास आघाडीत सामील होत महाराष्ट्रातील सत्तेपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्याला शह देण्यासाठी शिवसेनेला फोडून आपण त्यांना त्यांची जागा दाखवली आहे त्यासाठीचे एक हत्यार एकनाथ शिंदे होत हे वेळोवेळी भारतीय जनता पक्षाने अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे तो निवडणुका जश्या जवळ येतील तसतसे अधिक स्पष्टपणे सांगितले जाईल. एकनाथ शिंदे हे भाजपाच्या वळचणीला गेल्याने त्यांना भाजपच्या दिशानिर्देशानुसारच काम करावे लागेल नव्हे तसे त्यांनी मान्यच केले आहे. नव्याने सामील झालेल्या अजित पवार गटामुळे एकनाथ शिंदे यांची कोंडी होणार हेही आता वेगळे सांगण्याची गरज नाही. तेव्हा २०२४ च्या निवडणुकांत निश्चितच महाविकास आघाडीची स्थिती मजबुत होणार हे आतापासूनच दिसत आहे. एकेकाळचे महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाचे छोटे मित्र पक्षही आता भाजपविरोधी बाकावर बसण्यास सूरूवात झाली आहे. अगदी देशपातळीवर विरोधी पक्षांची एकजुट घडवून आणण्यातही शरद पवार आणि उध्दव ठाकरे यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे.दिल्लीपुढे महाराष्ट्र झुकणार नाही झुकला नाही हे वेळोवेळी सिद्ध झालेले आहे. मुंबईचे महत्व कमी करून महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचा चंग भारतीय जनता पक्ष बाळगून आहे. अलीकडच्या काळात मुंबईत महाराष्ट्राच्या मराठी माणसांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. परप्रांतीयांच्या वाढत्या राजकीय दबावामुळे मराठी माणसाचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पळवले जात आहे. आरेचे जंगल उद्ध्वस्त करून कारशेड उभारले जात आहे.अशास्थितीत मराठी अस्मीता विसरलेले नेते भारतीय जनता पक्षाचे, पंतप्रधानाचे स्तुतीसुमने गाऊन आपली निष्ठा व्यक्त करण्यात स्वतः ला धन्य मानत आहेत हे महाराष्ट्र कदापी विसरणार नाही. महाराष्ट्राने नेहमीच दिल्लीच्या तख्ताला हादरे देण्याचे काम केलेले आहे. महाराष्ट्राचा इतिहास हा स्वाभिमानाचा आणि जाज्वल्यांचा आहे. त्यातूनच नव्याने निर्माण झालेल्या विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीत महत्वाची भुमिका महाराष्ट्रातील नेते वठवित आहेत. भारत जोडो यात्रेनंतर राहुल गांधींची प्रतिमा उजळली आहे. नव्याने शिक्षेवरील सुनावणीला सर्वाच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर त्यांना लोकसभा सदस्यत्व लोकसभा सचिवालयाकडुन यथावकाश प्रदान करण्यात आल्यानंतर लोकसभेत ज्या जल्लोषात इंडिया आघाडीकडून त्यांचे लोकसभा आवारात स्वागत झाले त्यामुळे एक नवा विश्वास आणि नवी उमेद या विरोधी आघाडीत निर्माण झाली आहे. आपण भारतीय जनता पक्षाच्या जुलमाला सामोरे जाऊन लढू शकतो आणि पुन्हा जिंकू शकतो हा आत्मविश्वास विरोधी बाकावरील नेत्यांमध्ये निर्माण झाला आहे. हा विश्वासच आता जनतेच्या मैदानावर भारतीय जनता पक्षाला पराभवाचे दिवस दाखवेल. गेली नऊ वर्षे केवळ आणि केवळ लोकांना स्वप्नरंजनात रमवून धार्मिकतेच्या नावावर मंदीर मस्जिदांमध्ये लोकांना खिळवून ठेवून लोकशाहीची फळे चाखण्याची पासून वंचित ठेवले जात असल्याची भावना आता देशभरातील सामान्य मतदारामध्ये निर्माण झाली आहे. आपल्या विरोधी वातावरण तापले असतानाही सत्तेच्या जोरावर आणि धार्मिक दहशतीच्या जोरावर माध्यमांना अंकित करून विरोधी पक्षाला कमकवूत करून हा आवाज क्षीण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पक्ष करतो आहे.मणीपूर जळते आहे. तेथील महिलांना त्या हिंसाचाराची सर्वाधिक झळ बसत आहे. वरकरणी हा हिंसक लढा दोन जमातीतील वाटत असला तरी त्याला अनेक कंगोरे आहेत. चीनच्या शेजारी असलेली हे प्रदेश भारतासाठी अतिशय महत्वाचे आहेत.चीनचा वाढता विस्तारतावाद रोखायचा असेल तर या भागातील लोकांमध्ये भारताबद्दल एक विश्वास जागविला लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर ही जबाबदारी असताना त्यांनी त्यावर हेतूपूर्वक दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला आहे. एरवी अगदी परीक्षेपासून ते शेती पर्यंतच्या विषयावर मन का बात करणारे आपले पंतप्रधान अगदी महत्वाच्या विषयावर बोलायचे कसोशीने टाळतात. ते माध्यमांनीही कधी कोणत्या विषयावर प्रतिक्रिया देत नाहीत किंवा पत्रकार परिषद ही घेत नाहीत .अगदी ठरवुन विरोधी प्रश्न न विचारणाऱ्या भाजप प्रणीत रिपब्लिकन सारख्या माध्यमांना ठराविक मुलाखती देतात. पंतप्रधान हे स्वंयप्रेणीत नाहीत.त्यांना नियंत्रीत करणारी त्यांची संस्था जे सांगेल तेवढेच प्रामाणिकपणे करण्यात हे महाशय अगदी चपखल असल्याने त्यांची वर्णी पंतप्रधान पदी लागली हे काही लपून राहिलेले नाही. पंतप्रधान म्हणुन नरेंद्र मोदी यांची कारकिर्द भारताला विकासापासून आणि लोकशाही स्वातंत्र्यापासुन दुर नेत एक गुलाम आणि हिंदू झुंडशाही कडे पूर्णपणे झुकलेले राष्ट्र तयार करणारा पंतप्रधान अशी इतिहासात गणना होईल.स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात शेतकरी नागवला जात आहे, मणिपूर जळते आहे, विरोधक पंतप्रधानांनी निवेदन करावे म्हणून अविश्वास प्रस्ताव आणत आहेत, विद्यार्थांना विरोधी विचारांची प्रतारणा केली म्हणून मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते आहे, तरूण बेरोजगारीने त्रस्त आहेत, बॅंक प्रणाली सह संपूर्ण अर्थव्यवस्था धनाढ्या कडुन लुटली जात असताना पंतप्रधान आपण भारताचा विश्वास जिंकलो आहोत असे सांगत आहेत. हा विश्वास जिंकला की नाही हे महाराष्ट्रासह अन्य राज्यातील विरोधी पक्षांची सरकारे पाडून, साम दाम दंड भेद निती वापरून आपल्या पक्षाने सत्तास्थाने कशी बळकावली हे पाहिल्यानंतर आपसूकच लक्षात येते. भारतीय जनता पक्षाने जे विष गेली सात दशके या देशभर पेरले आहे. त्याला आता सुरूंग पेटून त्यांच्या ज्वालेत भारतीय जनता पक्ष आणि त्यांनी हेतूपूर्वक पसरवलेली धार्मिक विध्वसता जळून भारत हे राष्ट्र नवाने मोकळा श्वास घेईल. हे वेळोवेळी ऐतिहासिक दाखल्यावरून सिद्ध झालेले आहे. त्यासाठी आपण सर्वांनी प्रामाणिकपणे काम करण्याची गरज आहे.सरतेशेवटी पक्ष, विचारधारा आणि संसदीय राजकारण यापलीकडे भारत नावाचा देश हा इथे असलेल्या हाडामांसाच्या माणसांपासून बनलेला आहे .देशभर हिंसाचारांचा आगडोंब उसळला जात आहे. मणिपूर जळते आहे.अशास्थितीत भारतीय जनता पक्ष आणि त्याचे नेते मात्र सत्तेत रममान होऊन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत आहेत.तेव्हा अटलबिहारी वाजपेयी यांच्या ह्या कवितेच्या ओळी आठवतात..

सरकारें आएंगी, जाएंगी, पार्टियां बनेंगी, बिगड़ेंगी मगर ये देश रहना चाहिए.....

# `प्रोफेशनल` व्यवसायातील माणुसकीचा माणूस...

आधुनिक केसरी

**'द प्रोफेशनल कुरियर'च्या संभाजीनगर शाखेचे प्रमुख रवींद्र कुलकर्णी यांचे आज आकस्मिक निधन झाल्याचे धक्कादायक वृत्त कळले. त्यांच्याशी अनेक वर्षांपूर्वी ग्राहक म्हणून संपर्क आला होता आणि त्यांचा अनुभव चांगला होता. दोनेक वर्षांपूर्वी एक छोटासा प्रयोग केला, त्यात त्यांच्या आजवरच्या वाटचालीवर लिहिण्याचा योग आला. हाही अनुभव छानच होता. मध्यंतरी काही गाठीभेटी झाल्या पण वर्षभरात भेट नव्हती. त्यात त्यांच्या तब्येतीविषयी कानावर आले होते आणि त्यात आज हा धक्का... अशा वेळी काय बोलावे, सुचत नाही. 'द प्रोफेशनल कुरियर' या कंपनीचा जन्म 1980 च्या दशकात झाला. 1986 च्या दरम्यान श्री. रवींद्र कुलकर्णी यांनी फ्रेंचाईसी घेतली. बंधू श्री. अविनाश यांच्या साथीने व अन्य सहकाऱ्यांच्या सहकार्यातून हा कारभार पाहत.**

एका सामान्य प्राथमिक शिक्षकाचा मुलगा असलेले रवींद्र 1985 मध्ये दहावी पास झाले. शिक्षणात फारसा रस नव्हता, त्यामुळे काहीतरी काम शोधावे आणि चार पैसे कमावून घराला हातभार लावावा म्हणून ते काम शोधू लागले. योगायोग असा की त्या वेळी 'आकाश कुरियर्स' नावाने जी. एस. कुलकर्णी नावाचे गृहस्थ चालवीत. त्यांच्याकडे रवींद्र यांना दरमहा 300 रुपयांची नोकरी मिळाली. साधारण 6 महिन्यांत त्यांनी कुरियरचे सारे काम शिकून घेतले. बाहेरून येणाऱ्या कुरियरच्या वितरणापासून स्थानिक पातळीवरील डिलिव्हरीपर्यंत सारी कामे शिकतानाच त्यांचे मालक जी. एस. कुलकर्णी यांनीच त्यांच्यातील हुशारी ओळखली आणि 'किती दिवस नोकरी करणार? स्वतःचे काम सुरू कर,' अशी प्रेरणा दिली.

योगायोग असा, कीत्याच दरम्यान मुंबईत असलेल्या 'द प्रोफेशनल कुरियर' या कंपनीचे काम 'आकाश'मधून चालू होते. त्या कंपनीला श्री. रवींद्र यांनी पत्र पाठविले आणि आपण त्यांचे काम करू शकू, अशी तयारी दाखविली. त्यांनाही पूर्ण वेळ फक्त त्यांचेच काम करणारी व्यक्ती हवीच होती. त्यांच्या फ्रेंचाईसीची सुरुवात अशी झाली आणि 19 मार्च 1986 रोजी 'महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळा'च्या कार्यालयातून त्यांना पहिले पार्सल कुरियरसाठी मिळाले. त्याच दिवशी मिळालेले दुसरे ग्राहक होते 'पंजाब अँड सिंध बँक.' त्यांचेही मुंबईचे एक पार्सल रवींद्र यांना मिळाले. 'हमने मौका नहीं दिया तो तू कैसे आगे जायेगा?' असे आस्थेने विचारत तेथील अधिकाऱ्यांनी रवींद्र यांना प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या प्रवासाचा श्रीगणेशा झाला.

पोस्टानेच पत्र पाठविण्याचा तो काळ होता. कुरियरचा विश्वासार्हता कमी होती. कुरियरची कामे करणाऱ्यांना लोक नावे ठेवत. तेव्हा टीका करणारे आता 'आमच्या मुलाला नोकरी द्या' असे सांगत येतात तेव्हा रवींद्र यांना ही सगळी गंमत वाटते...!
त्या काळात रवींद्र यांनी खूप मेहनत घेतली. दररोज वाळूज आणि चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत सायकलवर फिरून डिलिव्हरी करायची, तेथून मिळणारे पार्सल जमा करायचे, संध्याकाळी सारी नोंद करून रात्री अजिंठा एक्सप्रेसने मनमाडपर्यंत जायचे आणि तेथे मुंबईहून येणाऱ्या कंपनीच्या माणसाकडे आपले पार्सल सोपवून त्याच्याकडून औरंगाबादेत डिलिव्हरी करण्याचे पार्सल ताब्यात घ्यायचे. सकाळी औरंगाबादेत पोहोचून ती डिलिव्हरी करायची. रात्री गाडीत झाली तेवढीच झोप. असा हा क्रम 1991 पर्यंत चालू होता. 91 मध्ये पहिली लुना घेतली आणि फिरण्यातील कष्ट थोडे कमी झाले.
पुढे विस्तार वाढला आणि डिलिव्हरीसाठी स्वतंत्र माणसाची नियुक्ती करता आली. पण तोवर त्यांची स्वतःची मेहनत सुरू झाली. पदवी घेतल्यानंतर त्यांचे धाकटे बंधू अविनाश कामात सहभागी झाले. त्या पाठोपाठ बाबूराव शिंदे ( आता चितेगाव शाखेचे



मॅनेजर ), रमेश नागापूरकर ( आता ऑपरेशन्स मॅनेजर ), संभाजी मॅकलवाड ( आता शेंद्रा शाखेचे मॅनेजर ) आणि सुरेश जोशी ( आता सिडको शाखेचे मॅनेजर ) हे चार जण त्यांना येऊन मिळाले आणि सगळ्यांच्या मेहनतीतून काम उभे राहिले.

स्वतःच्या घराच्या छतावर काढलेल्या 8 बाय 8 च्या पत्र्यांच्या शेडमधून आता तब्बल 22 गाळ्यांत विस्तारलेल्या व्यापापर्यंतचा हा प्रवास आणि साऱ्या मराठवाड्यात उभारलेल्या नेटवर्कचा विस्तार हे सारे श्री. कुलकर्णी यांच्या डोळस मेहनतीचे फळ. द प्रोफेशनल कुरियर ही कंपनी नावाप्रमाणे प्रोफेशनल आहे. उद्याचे काम आज आणि आजचे काम आत्ता, असे धोरण घेऊन काम करणाऱ्या या कंपनीची ग्राहकांप्रती असलेली बांधिलकी सर्वोच्च आहे, असे श्री. कुलकर्णी सांगत.
औद्योगिक विश्वातील गरवारे, विप्रोसारख्या विविध कॉर्पोरेट कंपन्या आणि बहुतेक सर्व बँका यांचे काम अधिकृतपणे त्यांच्याकडे आहे. महत्वाचे म्हणजे बँकांची क्लियरिंगची पार्सल त्यांच्या माध्यमातून जातात. एलआयसीचाही संपूर्ण बिझनेस त्यांच्याकडेच आहे. ईमेलच्या काळात पत्रांचे वहन कमी झाले असल्याने आता कंपनीने आपला मोर्चा 'कार्गो'कडे वळविला आहे. त्यात ही कंपनी आता मोठे काम करते आहे. सगळ्या आघाड्यांवर झुंज देत अतिशय मेहनतीने श्री. रवींद्र कुलकर्णी यांनी उभारलेला हा व्यवसाय 'कमीटमेंट' या शब्दावर चालतो. हीच त्यांची खरी कमाई. रवींद्र यांना श्रद्धांजली...

– दत्ता जोशी, छत्रपती संभाजीनगर

# पाळी आली रे आली...

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**

मुलींच्या आयुष्यात पाळी हा शब्द खूप महत्त्वाचा आहे. मासिक पाळी सुरू झाली की मुलगी वयात येते आणि तिचं स्त्री म्हणून खरं जीवन सुरू होतं. आयुष्याच्या अनेक टप्प्यांवर ही स्त्री कोणाची मुलगी असते, कोणाची बहीण असते, कोणाची पत्नी असते, आई असते, आजी असते या सगळ्या जबाबदाऱ्या मुलींना आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर समर्थपणे पेलायच्या असतात. मुलगी वयात आली की तिच्या शरीरातही बदल व्हायला सुरुवात होते. काखेत, जांघेत, हात, पाय यावर केसांची लव येणे, मुलांच्या उंचीपेक्षा मुलींची उंची झपाट्याने वाढणे, पिंपल्स येणे, घाम येणे, बाह्यांगातून स्राव येणे, तसेच छातीचा भाग मोठा होण्यास सुरुवात होणे असे बदल नैसर्गिकरीत्या सुरू होतात.




मासिक पाळी या यापैकीच एक महत्त्वाचा भाग असून वयाच्या ८ व्या वर्षापासून ते १६ व्या वर्षापर्यंत ती कधीही सुरू होऊ शकते. हा एक नैसर्गिक भाग असून शरीरात जेव्हा इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉनच्या मात्रा कमी जास्त होऊन, बीजांड बाहेर येण्यासाठी तसेच प्रजनन क्रियेसाठी तिची परिपक्वता झालेली असते. पाळी ही ३ ते ५ दिवसांची असते. या काळात स्त्रीच्या अंगावरून वाहणारा प्रवाह हा गाठीच्या स्वरूपात असतो आणि तो चौथ्या किंवा पाचव्या दिवशी बंद होतो. या काळात स्त्री शरीरात झालेले बदल पूर्ववत होतात. पाळीच्या अकराव्या ते पंधराव्या दिवसात बीजांड हे बाहेर पडते आणि त्याला 'पीक पीरियड' असे म्हणतात. कारण या काळात जर स्त्रीचा पुरुषांशी संबंध आला तर गर्भधारणा होण्याची शक्यता खूप जास्त असते. ही पाळी वयाच्या ४० ते ५० वर्षांच्या काळात बंद होऊन जाते. यालाच आपण रजोनिवृत्ती असे म्हणतो. पाळीच्या या काळात स्त्रियांना स्तनांमध्ये दुखणे, चिडचिडेपणा, चेहऱ्यावर पिंपल्स येणे असे अनेकविध त्रास होत असतात. जेव्हा मुलगी सातवी, आठवीमध्ये जाते तेव्हा पाळीला सुरुवात होते. त्यामुळे तिला या गोष्टीची पूर्णकल्पना देणे खूप आवश्यक असते. कारण मुलगी शाळेत असताना, किंवा बाहेर कुठे असताना जर पाळीचा रक्तस्राव झाला तर ती गोंधळून जाते, घाबरते आणि ती मानसिक तणावाखाली येण्याची दाट शक्यता असते. त्याचबरोबर 'सेफ्टी पॅड'ची मुलींना माहिती करून देणे आवश्यक आहे. ते कसे वापरतात? त्याची स्वच्छता कशी ठेवावी? कोणत्याही स्वरूपाचे इन्फेक्शन होणार नाही याची काळजी कशी घ्यावी याही गोष्टी मुलींना सांगाव्यात. तसेच या काळात सेफ्टी पॅड त्यांच्यासोबत ठेवून द्यावे. कारण पाळी काही तुम्हाला सांगून येत नाही. याकाळात मुलींमध्येही विविध मानसिक बदल होत असतात. त्याही एक-एकट्या राहण्याचा प्रयत्न करतात. कधी जास्त वेळ मित्र-मैत्रिणींसोबत राहण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी त्यांच्यावर न रागावता, त्यांच्यासोबत चर्चा करावी, चौकस राहावे, मित्र-मैत्रिणींकडून या गोष्टींचे ज्ञान मिळण्याऐवजी योग्य काळात पालकांनीच त्यांना योग्य माहिती दिली तर मुली तणावमुक्त राहतील आणि त्यांच्या अभ्यासावरही कोणता दुष्परिणाम होणार नाही. मुलगा असो किंवा मुलगी असो, काही दक्षता या दोघांनीही घ्यायच्या आहेत. जसं की, बाहेरून आल्यावर चेहरा स्वच्छ धुणे, टॉवेलने चेहरा व्यवस्थित कोरडा करून घेणे, शक्य असेल तर चेहऱ्याला मॉईश्चरायझर लावणे, घामाची दुर्गंधी येऊ नये म्हणून सहसा रात्री झोपताना अंघोळ करून, ब्रश करणे व शक्य असल्यास 'इनर्स' बदलूनच झोपावे, योनीवर आलेले केस हे कोणत्याही ब्लेडन न काढता ट्रीमरने काढावेत. आपली पर्सनॅलिटी छान ठेवण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी स्वच्छ धुतलेले कपडे घालणे. चांगले मित्र बनवणे, कोणतीही अडचण वाटल्यास त्या त्या बाबतीतील तज्ज्ञांचा सल्ला घेणे, डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि मगच निर्णय घेणे अशा गोष्टी कराव्यात. कोणत्याही प्रकारचा स्ट्रेस किंवा टेन्शन घेऊ डिप्रेशनमध्ये जाणे, आत्महत्या करणे इत्यादी प्रकार न करता तज्ज्ञांना भेटून संबधित शंकांचे, अडचणींचे निरसन करून घेणे हे सजीव असल्याचं द्योतक आहे. हे जीवन एकदाच प्राप्त होते. ते असे किड्या-मुंग्यांसारखे संपवण्यापेक्षा त्याचा पुरेपूर आनंद घ्या. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्न पूर्ण करा आणि आपले आयुष्य आनंदात जगा.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# निष्ठेच्या बाजारात स्वार्थाचा बोलबाला



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सगळ्याच क्षेत्रात खरी माणसं दुर आहे पण जी माणसं क्षणिक मळभ निर्माण करुन गवगवा करतात तिचं सगळ्यात जास्त लाभानवित असतात. लाभ संपलं क्षणिक निष्ठा संपली हा नवीन अध्यया म्हणजे तोतया निष्ठावंत निष्ठावान असंच काहीसं सध्या तरी चालेल आहे. स्वार्थ हे कधीच एकत्र नसतात मतलब स्वार्थ ठेवून निर्माण झालेला आदर निष्ठा नाही तर वेळेनुसार तात्पुरत्या स्वरूपात स्वार्थ लाभ मतलब आहे.**


तोपर्यंत अथवा तो साधे पर्यंत फक्त घनिष्ठता दाखविण्याचा प्रयत्न असतो त्याला निष्ठा हे नामकरण केलं जातं पण वास्तविक हा निष्ठा या शब्दाचा अवमान आहे. मुळात निष्ठा हि निस्वार्थ असते.पण सध्या निष्ठेचा व्यापार चरण सिमेवर असुन जितकं मतलब तितकी आणि तोपर्यंतच निष्ठा हा नवीन निष्ठेचा प्रकार अस्तित्वात आला आहे. खरा निष्ठावंत हा नेहमीच उपशी असतो. सृष्टीवर अस्तित्वात असणार्या सर्वच क्षेत्रात आणि वेगवेगळ्या व्यवहारातील संबंधात खरा हा दुर असतो. तर नकली हा नेहमीच जवळीक साधुन लाभ करून घेऊन पुन्हा शत्रू यादीत समाविष्ट होतो .हे सध्याच्या काळातील निष्ठेच्या व्यापारातील वास्तविक फलित आहे .नाव फक्त निषठेच आहे. पण अडुन व्यापार चालु आहे. कोण गृहक ? कोण व्यापारी ?हे गुपित उशिराने कळते हेच या व्यापारातील गमक आहे. पण तो पर्यंत खरा निष्ठावान हा अक्षरशः पायदळी तुडवला जातो . परंतु खरा निष्ठावान हा या व्यापाराचा घटक नसल्याने तो सदैव आत्मियतेने निष्ठावान च असतो. सध्याच्या काळात प्रत्येक क्षेत्रात आपण किती निष्ठावान आहेत हेच दाखवण्याचा प्रयत्न सगळ्यांचं क्षेत्रात होत आहे. पण या निष्ठे आड स्वार्थ नसेल तर अभिनंदनच आहे. निष्ठे आड जर स्वार्थ असेल तर मग ती निष्ठा कसली तो चक्क व्यापार आहे. हल्ली निष्ठा हि कशी मोजायची हाच खुप मोठा गहण प्रश्न आहे.स्वार्थ किंवा विशिष्ट हेतूने प्रेरित होउन आपल्या सोबत जोडला गेलेला व्यक्ती हा निष्ठावंत या गोंडस नावाखाली आपल्या सोबत असतो.खरा पण तो आत्मियतेने कधीचं आपला नसतो ही बाब आपल्याला कळत नाही कि कळुन वळत नाही अथवा हा वेळेचा प्रभाव आहे. हे मात्र वेगळं गणित आहे.जस गुळाची ढेप आहे तोपर्यंतच मुंगळे असतात. आणि ढेप संपली कि ते दुसरी ढेप शोधतात. या मध्ये मुंगळयांचा दोष अजिबात नाही. ते ढेपी शिवाय राहु शकत नाहीत .आणि नविन ढेप शोधण्यासाठी निष्ठावंत होण्याशिवाय पर्याय नसतो. म्हणूनच तर मी खूप निष्ठावान आहे. हे वरकरणी दाखवून द्यावे लागते . म्हणूनच स्वार्थासाठी निष्ठावंत होणारांचा सगळीकडे बोलबाला आहे. असंच चित्र आपण सध्या सर्वत्र पाहतोय. मात्र आपल्या स्व स्वार्थासाठी क्षणिक निष्ठावंत होऊन स्वतःला आणि ज्यांच्या साठी आपण क्षणिक निष्ठावंत होऊ त्यांना देखिल अंधारात ठेवण म्हणजे आपण आपल्या स्वतःलाच कुठेतरी फसवतोय .पण हे कळण्याची समज आणि उमज हि त्या क्षणाल आपल्याकडं नसते. म्हणून आपल्याला आपण आपण केलेल ते कृत्य त्या तात्कालिक क्षणी योग्य आहे. असंच वाटतं असत . परंतु अशा पद्धतीने स्वार्थासाठी निष्ठावंत होण्यापेक्षा दुर्लक्षित एकनिष्ठ असलेल कधींही उत्तम नैसर्गिक न्यायाला धारूण आणि आत्मिक दृष्या योग्य आणि समाधान कारक समाधान देणारं असत . नात्या पासुन गोत्या पर्यन्त, व्यापारा पासुन उदयोगा, पर्यन्त समाजकारण पासुन, राजकारणा पर्यन्त ,कले पासुन क्रिडे पर्यंत जवळपास सगळ्याच क्षेत्रात जो प्रामाणिक आहे.निस्वार्थी निष्ठावंत आहे. तो दुर्लक्षित आहे हे अगदी वास्तव व कटु सत्य असुन जो स्वार्थी आहे तो अगदी तळहातावर आहे. त्याचा सगळीकडेच बोलबाला आहे . हे प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक संबंधात नात्या मध्ये स्वार्थी आणि संधी साधु निषठवंताचा बोलबाला झाला आहे . त्यामुळे खरे प्रमाणिक आणि मी निस्वार्थी निष्ठावंत पायदळी तुडवले जातात. मग हे नेमकं दुर्भाग्य कोणाच .ज्याला सत्य असत्य खरा खोटा स्वार्थी निस्वार्थी लक्षात येत नाही त्याच कि ज्याच्या संदर्भात हे सगळं घडलं आहे त्याचं. शेवटी महत्वाचं हेच आहे कि जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या घटना घडामोडी व सार्वजनिक जीवनातील सुद्धा वेगवेगळ्या बाबी या अनुषंगाने कित्येक लोक हे आपल्या जीवनातील सगळ्यात जवळचे आणि प्रमाणिक हित चिंतक आहेत. आपले हितेषी आहेत असं भासवतात पण या पाठिमागे स्वार्थ आहे. कि निस्वार्थी आहे. हे आपल्याला न समजणं म्हणजे आपलं भविष्यात खुप मोठा नुकसान करून घेणं आहे. म्हणून नातं असो किवा सार्वजनिक जीवन किंवा व्यवहार व्यापार समाजकारण, राजकारण कोणत्याही क्षेत्रातील आपला निष्ठावंत समर्थक शोधता येण आवश्यक आहे आणि त्यासाठी आवश्यक अशी दिव्य दृष्टी लाभण्यासाठी ज्ञान हाच सर्वोत्तम उपाय आहे. त्याच बरोबर आपलं भविष्यात होणार अहित टाळण्याचा अ प्रतिम मार्ग म्हणजे खरा निष्ठावंत भेटणं आणि ओळखण .पण निष्ठे बाजारात व्यापारात स्वार्थाचा बोलबाला हा शेवटी निष्प्रभ ठरतो पण तो पर्यंत खरा निष्ठावंत पायदळी तुडवला जातो. म्हणून उचित समयी खरा खोटा ओळखता येणं हे आपल्या साठी लाभदायक असत.



# देश स्वतंत्र झाला पण...?

आधुनिक केसरी

**आज स्वातंत्र्य दिन या शुभ दिनानिमित्त सर्व भारतवासियांना स्वातंत्र्य दिनाच्या मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा. आजचा हा शुभ दिवस कधी न विसरणारा दिवस आहे.कारण हा शुभ दिन येण्यासाठी होऊन गेलेल्या महान क्रांतीवीरांनी, देशभक्तांनी, महाविभूतींनी आपल्या जीवनाचे बलिदान दिले. हसत, हसत फासावर चढले, आपले सुख, दुःख विसरून गेले. संपूर्ण आयुष्य भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी वाहिले अशा सर्व महाविभूतींना कोटी, कोटी विनम्र अभिवादन करते. प्रत्येकांनी क्षणभर कल्पना करून बघायला पाहिजे ह्या दिवशी जेव्हा आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले होते तो दिवस कसा असेल....?**



कदाचित आजच्या समाजात असणाऱ्या काही लोकांना माहीत नसणार किंवा काही आत्मे कदाचित आजही जिवंत असतील त्या दिवसाचे साक्षी असतील तो सुखद क्षण व सोन्याचा दिवस बघितले असतील, अनुभवले असतील ह्यात काही शंका नाही खरंच ते भाग्यवान आहेत. गेलेले ते दिवस पुन्हा परत येणार नाही कारण ते जुने दिवस, जुन्या आठवणी, जुने संस्कार, जुनी संस्कृती, जुने आचार, विचार होते. एकमेकांविषयी प्रेम, आदर, सन्मान होता विकास त्या रितीने होत असे, प्रत्येकात आपुलकी होती ,माणुसकी होती पण,आता मात्र दिवसेंदिवस सारेच बदललेले चित्र बघायला मिळत आहेत. आपला भारत देश स्वतंत्र झाला खरी पण काही भागात काही ठिकाणी अजूनही स्वतंत्र झालेला दिसत नाही शहरात जेवढ्या वेगाने विकासाची गती धावत असते तेवढ्या वेगाने ग्रामीण भागात विकास होतांना दिसत नाही म्हणून आजही ग्रामीण भागात काही गावांमध्ये देशाला स्वातंत्र्य मिळून एवढे वर्ष होऊन सुद्धा अनेक ठिकाणी लालपरी पोहोचली नाही. काही दुर्गम भागातील लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही कोसोदूर जाऊन हंडाभर पाणी आणावे लागते , पक्के रस्ते तर सोडून द्या नीट त्या रस्त्यावर पायी चालत जाणे अवघड जाते मग तेथे राहणारे लोक स्वतंत्र कसे होऊ शकतात. ...? अशा अनेक अडी,अडचणी अनेकांच्या जीवनात आहेत त्यांना स्वतंत्रपणे विचार मांडण्याचा अधिकार नाही कारण बरेचदा त्यांच्यात असलेल्या साधेपणाचा फायदा घेऊन त्यांनाच पुन्हा चिखलात गाडण्याचा प्रयत्न केला जातो अशा गोर,गरीब, आदिवासी ,बळीराजा, विधवा महिला, कामगार, गरजू लोकांना स्वातंत्र्य कधी मिळावे...? काही ठिकाणी शाळा आहेत पण,कौलारू व जीवाला धोका असणारी पडकी कौलारूचे शाळा दिसत आहेत तेथे विकासाची उत्सुकता आहे पण,कधी विकास होईल. ..? महिलांच्या विषयी जर बोलायला गेले तर. ..ती,एकटी रस्त्याने स्वतंत्रपणे फिरू शकत नाही मग तिने जगावे तरी कसे...? दररोज असे कितीतरी बलत्कार, हिंसा, बेपत्ता होत आहेत त्या महिलांनी कधी स्वतंत्रपणे जगावे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे पण,अजूनही पुर्णपणे स्वातंत्र्य दिसून येत नाही ज्या महाविभूतींनी संपूर्ण भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, सर्व काही मिळवून दिले, हक्क न्याय मिळवून दिले पण, आजही त्यांचे काही लेकरे दुःखात जगत आहेत तर कोणी रस्त्यावर भीक मागत आहेत तर कोणी नरकासारखे जीवन जगत आहेत त्यांचा विचार खरंच कोणी करावे....? सर्वासाठी आरक्षण आहेत पण,त्यांना ते,हक्काचे असून सुद्धा मिळत नाही , लढून सुद्धा मिळत नाही एवढेच नाही तर काहीच्या जीवनात अजूनही अंधारच आहे ते उजेडाच्या प्रतीक्षेत वाट बघत आहेत पण,तो उजेड त्यांच्या पर्यंत पोहचत नाही. बळीराजा विषयी जर विचार करायला गेले तर तो फक्त पदवी पुरता मर्यादित



दिसत आहे त्याचा मात्र रोज बळी जात आहे कधी निसर्ग त्यावर कोपते तर कधी असे अनेक प्रसंगी त्याला हार मानून जगावे लागते जगाचा पोशिंदा बळीराजा आज गळफासात अडकत आहे. कोणी स्वतंत्रपणे जगू शकतात तर कोणी स्वतंत्रपणे बोलू शकत नाही पण का...? हा एक भारी मोठा प्रश्न अनेकांना पडत आहे. स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार सर्वांना आहे पण, सर्वच तसे जगू शकत नाही आणि काही जण अजूनही मनाने स्वतंत्र झाले नाही दुसरा ज्या प्रमाणे वागायला सांगेल त्या प्रकारची गुलामगिरी करत आहेत अशी गुलामगिरी बंद करणे आवश्यक आहे कारण या प्रकारच्या जगण्याला अर्थ नाही उलट जीवन मातीमोल होऊन जाते हे ध्यानात ठेवणे काळाची गरज आहे. आजच्या या शुभ दिनानिमित्त ग्रामीण भागात राहणारे लोक असोत वा शहरात राहणारे लोक असोत आनंदाने स्वातंत्र्य दिन मिळून, मिसळून साजरा करतात.पण, तसेच त्यातील काही लोकांना एक अपेक्षा असते की, विकास आमचाही व्हावा आणि स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळावा, विचार व्यक्त करण्याचा अधिकार मिळावा जर खरंच असे दिवस त्यांच्या जीवनात आले तर नक्कीच ते पूर्णपणे स्वतंत्र झालेले दिसून येतील, त्यांच्यासाठी तो सोन्याचा दिवस असेल आणि तो दिवस येणे आवश्यक आहे. म्हणून शासनाने जरा ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांकडे दुर्लक्ष न करता काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे व त्यांचाही विचार करावा कारण तेही भारतीय नागरिक आहेत. त्यांचा विकास होणे आवश्यक आहे तेवढेच ते स्वतंत्रपणे जगू शकतील व त्यांच्या जीवनातील अंधार दूर होईल.




# शहरात भव्य तिरंगा रॅली, विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** माझी माती माझा देश व हर घर तिरंगा अभियानातंर्गत चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शनिवार १२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता गांधी चौक आझाद बगीचा दरम्यान भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा,जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन व आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवुन रॅलीस प्रारंभ करण्यात आला. सर्व शालेय मुलांनी हातात राष्ट्रध्वज उंचावुन मनपा कार्यालय गांधी चौक येथुन आझाद बगीचापर्यंत मार्गक्रमण केले. याप्रसंगी विविध घोषणांद्वारे विद्यार्थ्यांनी परिसर दणाणुन सोडला. गांधी चौक ते आझाद बगीचापर्यंत रॅलीचा मार्ग होता, आझाद बगीचा येथे रॅलीचा समारोप करण्यात आला व पंचप्रण शपथ घेण्यात आली.

या रॅलीत शहरातील छोटुभाई पटेल शाळा, एफईएस गर्ल्स, सिटी कन्या, हिंदी सिटी, सिटी माध्यमिक लोकमान्य टिळक विद्यालय, लोकमान्य शाळा, न्यू इंग्लीश,किदवई तसेच नूतन माध्यमिक अश्या १० शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच मनपा अधिकारी - कर्मचारी व शाळांतील हजार विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग होता. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मनपातर्फे विविध कार्यक्रम घेतल्या जात आहेत. तिरंगा रॅलीद्वारे नागरिकांच्या मनात देशभक्ती जागृत करणे हा अभियानाचा उद्देश आहे. या वर्षी सुद्धा स्वातंत्र्य दिन घरोघरी तिरंगा फडकवून मोठया उत्साहात अणि आनंदात साजरा करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# आला वारा गेला वारा, कुठे गेला प्रवासी निवारा ?

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा हे गाव पंधरा ते वीस गावाचे केंद्र बिंदू असून येथे भगवान श्री चक्रधर स्वामींचे तीर्थक्षेत्र म्हणून राज्यात प्रसिद्ध आहे पण गावात पूर्वीपासूनच प्रवासी निवारा नाही.येथे रोज हजारो भाविक भक्त चक्रधर स्वामी मंदीरावर दर्शनासाठी येतात बरेच भाविक भक्त जाळीचा देव येथून पायी येऊन दर्शन घेऊन जळगाव, भुसावळ मार्ग निघून जातात परंतु फाट्यावर प्रवासी निवारा नसल्याने भाविक भक्त व विद्यार्थी यांच्यातून नाराजीचा सूर निघत आहे.सार्वजानिक बांधकाम विभाग फर्दापूर शासनाचे वतीने गिरडा घाट व सावळदबारा ते देवळगांव गुजरी मार्गे जामनेर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण रस्ता काम पूर्ण होऊनही झाले आहे. प्रवासी निवाऱ्याकडे कोणाचे लक्ष नसून दुर्लक्ष आहे.सावळदबारा बसस्थानकावर पूर्वीपासूनच प्रवासी निवारा नाही या रस्त्याचे काम बरेच दिवसापासून झाले आहे. सावळदबारा येथे कोणतेही प्रवासी निवारा चे काम चालू नाही, आणि अद्याप पर्यंत येथे प्रवासी निवारा बांधण्यात पण आला नाही. सावळदबारा परिसरातील पंधरा ते वीस खेड्यांतील नागरिकांना बाहेरगावी इतरत्र कोणत्याही ठिकाणी जायचे असल्यास तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरिता बाहेरगावी जाण्याकरित सावळदबारा येथूनच जावे लागते. येथे गावात व फाट्यावर प्रवासी निवारा नसल्याने रस्त्यावर उभे राहावे लागत असल्याने एखादा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवासी निवारे बरेच वर्षेपासून बांधले नाहीत.

दरम्यान,सावळदबारा गावावरच असा अन्याय का ? असा प्रश्न भाविक भक्त, विद्यार्थी व प्रवासी वर्गाला पडला आहे. सावळदबारा गावात बसस्थानकावर व फाट्यावर प्रवासी निवारा बांधून देण्यात यावा, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिला आहे. सावळदबारा बसस्थानकावर जागा उपलब्ध मोठ्या प्रमाणात आहे त्वरित प्रवासी निवाऱ्याचे काम सुरू करण्यात यावे असे लेखी निवेदनाद्वारे अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कडे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.

# कोपर्डेच्या शाळेत आजी-आजोबा दिन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** कुटूंबात आजी आजोबा ह्या महत्वाच्या व्यक्ती समजल्या जात असतात. वय झाल्याने जास्त करून काही आजी आजोबांना घराच्या बाहेर पडता ही येत नाही.परंतू त्यांच्या असण्याने सुद्धा घराला एक मोठा आधार मिळत असतो.आजी आजोबांना घराच्या बाहेर पडण्यास व त्यांच्या आयुष्याला अजून आनंदी व खेळतं करण्याचा प्रयत्न शाळेतील एका अनोख्या उपक्रमा मुळे झाला आहे.कुणी काठी टेकवत तर कुणी स्वतःच्या आजारपणात असूनही स्वतःच्या जिद्दीवर उभे राहून थेट शाळा गाठली.शाळेत आजी आजोबा हा दिवस साजरा करण्याच्या निमित्ताने आजी आजोबा शाळेत आले अन संस्काराची शिदोरी देणारा कार्यक्रम संपन्न झाला.

कोपर्डे ता.खंडाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हा अनोखा उपक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीलाच आजी आजोबांचे पाय धुणे, पूजा करणे, औक्षण करणे तसेच गुलाब पुष्प देऊन सत्कार करणे हा संस्कार क्षम व आजी आजोबांनी स्वतःची नात नातूस मिठी मारणारा एक अनोखा क्षण पाहायला मिळाला.आजी आजोबांनी स्वतःची मनोगते व्यक्त करताना शाळेचे विशेष कौतुक केले.काहींनी गोष्टी सांगितल्या तर भजन, भारुड,गवळन,पाळणा आदी पारंपारिक गोष्टी गायनातून आजी आजोबांकडून सादर करण्यात आल्या. आजी आजोबां करिता संगीत खुर्ची, फुगडी,बादलीत चेंडू टाकणे आदी खेळ घेण्यात आले.आजी आजोबांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत एक तारुण्याचे चैतन्य निर्माण झाल्यासारखे दमदार अशी कामगिरी केली. संगीत खुर्ची स्पर्धेतून रामचंद्र कदम,कमलाबाई कोळेकर हे विजयी झाले. मुख्याध्यापिका शारदा वायदंडे यांच्या मार्गदर्शना खाली शाळेचे उपशिक्षक पंकज रासकर, सोमनाथ पारखे, धैयशील शेळके,पांडुरंग जाधव, सागर शिंदे, प्रणोती शिंदे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. घरातील व शेजारील आजी आजोबांसह वडीलधाऱ्या लोकांचा आदर करणे त्यांच्या सूचनांचे पालन करणे, घरकामात मदत करणे, सुट्टीच्या दिवशी इतर कामात मदत करणे आदी प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतल्या. शाळा दरवर्षी विविध उपक्रम राबवित असते. कोपर्डे शाळेत घेतलेला हा कार्यक्रम कौतुकाचा असून असे उपक्रम जिल्हा परिषद शाळांमध्ये एक नव चैतन्य आणणारे ठरू शकतात. शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा वायदंडे म्हणाल्या की, आजी- आजोबांच्या व नातवंडांच्यात नविन नाते निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. याचे खूप मोठे समाधान वाटले. आजच्या मोबाईलच्या युगात पालक व विद्यार्थी यांच्यातील आदराची भावना कमी होत चाललेली आहे.

# रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरचा सर्वोत्कृष्ट सचिव पुरस्काराने गौरव संतोष तेलंग सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** २०२२-२३ या वर्षासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीसाठी एकूण १४ पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट सचिव पुरस्कार संतोष तेलंग यांना देवून सन्मानीत करण्यात आले.

रोटरी क्लब ३०३० च्या वतीने वर्धा येथे गांधी सिटी रोटरी क्लबच्या वतीने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला रोटरी क्लब ३०३० चे राज्यपाल आनंद झुनझुनवाला यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती. या सोहळ्यात रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरला एकूण १४ पुरस्कार देवून गौरविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने जगभरातील लोकांच्या जीवनात रोटरीची कल्पना करण्यासाठी मदत केल्याबद्दल रोटरी इंटरनॅशनल सायटेशन अवार्ड, उत्कृष्ट कुटुंब कल्याण पुरस्कार, नैसर्गिक आपत्तीच्या काळात केलेले सर्वोत्तम कार्यासाठी पुरस्कार, सर्वोत्तम युवा महिन्याचे उपक्रम राबविल्याबद्दल अवार्ड, शेगाव येथे झालेल्या जिल्हा कॉन्फरन्सला सर्वाधिक उपस्थिती दर्शविल्याबद्दल पुरस्कार, रोटरी फाउंडेशनसाठी सर्वोच्च योगदानासाठी अवार्ड, जिल्हा. मेंबरशिप ओरिएंटेशन सेमिनारमध्ये आदरातिथ्य आणि व्यवस्थापनासाठी कौतुक पुरस्कार, प्री पेट सिट होस्टींगसाठी अवार्ड, समाजकार्यातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी जिल्हा टीआरएफ सुवर्ण प्रशस्तिपत्र, टीआरएफसाठी सर्व सदस्यांचे शंभर टक्के योगदानासाठी पुरस्कार तथा जिल्हा राज्यपालांच्या वतीने देण्यात येणारा विशेष पुरस्कार पीपी डॉ.विजय आईंचवार, पीपी, भालचंद्र उर्फ राम चांदे व राज्यपालांचा कौतूक पुरस्कार पीपी सचिन गांगरेड्डीवार,पीपी महेश उचके यांना देवून गौरविण्यात आले. जिल्हा राज्यपाल आनंद झुनझुनवाला यांच्या वतीने उत्कृष्ट सचिव पुरस्कार संतोष तेलंग यांना देवून गौरविण्यात आले. रोटरी क्लब




ऑफ चंद्रपूरला एकूण १४ पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन साप्ताहिक बैठकीत पुष्पगुच्छ देवून करण्यात आले. वर्ष २०२२-२३ साठी पुरस्कार मिळाल्याबद्दल अध्यक्ष अजय जयस्वाल, सचिव संतोष तेलंग, सहसचिव विशाल खांडरे, कोषाध्यक्ष संजय ठवस तथा संपूर्ण टिमचे कौतूक करण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगर येथे जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद या आदिवासी सामाजिक संघटना तर्फे औरंगाबाद येथे ९ आगस्ट २०२३ रोजी जागतिक आदिवासी दिन उत्सव मोठ्या उत्साहामधे साजरा करण्यात आला सर्व प्रथम विर एकलव्य ,तंट्या मामा ( तंट्या भिल ) , ख्वाजा नाईक , बिरसा मुंडा सर्व आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळेस मोठ्या संख्येने आदिवासी बंधु भगिनी या कार्यक्रमा दरम्यान उपस्थित होते या जागतिक आदिवासी दिन कार्यक्रमाला मोठा पोलीस बंदोबस्त होता. जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाचा एक मोठा सन आहे हा सन आदिवासी समाजामधे पुर्ण जगामधे ९ आगस्ट रोजी साजरा केला जातो औरंगाबाद येथे ९ आगस्ट रोजी मोठ्या उत्सामधे ढोल तासे नगा-यांच्या तालावरती मिरवणूक काढण्यात आली यावेळेस आदिवासी समाजाच्या महिला पुरुषांनी आदिवासी समाजाची संकृती जपत आप आपल्या वेषभुषा परिधान करुन महापुरुषांचे वेशभुषा आणि आदिवासी कला नृत्य गित सादर केले औरंगाबाद येथील क्रांतिचौक येथुन भव्य दिव्य मिरवणूक रली काढुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमा दरम्यान महामानव विश्वरत्न डाक्टर बाबासाहे आंबेडकर , छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्वोतिबाफुले. सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. आणि मिरवणूक रलीचे रुपांतर हमखास मैदान येथे येऊन स्टेजवरती स्वागत समारंभ कार्यक्रम घेण्यात आला आणि महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद चे पदाधीकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी आदिवासी समाजाला हमखास मैदान येथे सामाजिक जनजागृति कार्यक्रम घेऊन आदिवासी समाजाला मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळेस प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी. प्रदेश कार्याध्यक्ष जब्बार तडवी, सिल्लोड चे माजी नगर अध्यक्ष बनेखा पठाण, डॉ . सुभाष घाटकर , डी.डी.चव्हाण,नरेंद्रसिंग सालुंके, गोपीचंद कुमरे , सुरेंद्र कुमार,गुलाबराव मोरे, औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष नजीर तडवी, प्रदेश सल्लागार डाक्टर समीर तडवी, युनुस तडवी ,हरि कन्नके , जगन्नाथ कुमरे , इरफान तड़वी ,सलीम तड़वी ,नगीना बाई तड़वी , शबाना तड़वी ,रुकसाना तडवी,राशदबाई तडवी, आय्युब तडवी, सलाउद्दीन तड़वी , चाँदखा तड़वी . गुलाब बरडे , रज्जाक तड़वी,भुराज तड़वी मुकद्दर तड़वी , हसन तड़वी मुक्कदर तड़वी , रशीद तड़वी , अशरफ तड़वी, रब्बानी तड़वी, गफूर तड़वी, सुरेंद्र सालुंके, नरसिंमा



सिडमके, आकाश बोरडे , हातिम तड़वी, अरुण खरात, मोसिन तड़वी, यासीन तड़वी , रहेमान तड़वी, ईसुब तड़वी, समिर तडवी, शाहेंशाह तडवी, भिकन तडवी, कौसर तडवी, अकिल तडवी,शफीक तडवी यांची प्रमुख उपस्थिती होती. आदिवासी समाजाला यांच्यातर्फे मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले यावेळेस आदिवासी समाजाचे महिला व पुरुषं तड़वी भील, गोंड, प्रधान, पारधी, भील, ठाकर , आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# बोधेगावात विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बोधेगाव बुद्रुक येथे विविध विकासकामाचे भूमिपूजन बुधवारी ( नऊ ऑगस्ट ) माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरीभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले.

फुलंब्री तालुक्यातील बोधेगाव बुद्रुक येथे जलजीवन मिशनअंतर्गत पाइपलाइन, नळजोडणी, पाण्याची टाकी ( १४९ लाख रुपये ) व १५ व्या वित्त आयोगानुसार गावाअंतर्गत २५ लाख रुपये देण्यात आले आहेत. या अंतर्गत होणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते पार पडले. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, बाजार समितीच्या सभापती अनुराधा चव्हाण, शिवाजी पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी सविता फुके, ऐश्वर्या गाडेकर, राजेंद्र वाघ, राम बनसोड, सरपंच शीतल राजपूत, उपसरपंच अर्चना कैलास कुंटे, अभिषेक गाडेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मोफत रोगनिदान, मोतिबिंदू शिबिराला उत्तम प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तुलसी आय हॉस्पिटल नाशिक, आनंद हॉस्पिटल वैजापूर व उपजिल्हा रुग्णालय वैजापूर यांनी शनिवार( ता,१२ )रोजी आयोजित केलेल्या मोफत सर्व रोग निदान व मोती बिंदू शस्त्रक्रिया शिबीर ला उत्तम प्रतिसाद मिळाला, माजी उद्योग संचालक जे.के. जाधव यांनी पुढाकार घेतलेल्या या शिबिराचे फीत सोडून उदघाटन माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या प्रसंगी प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष जे.के.जाधव व शहर अध्यक्ष जालिंदर मोटे पाटील प्राचार्य भिंगारदेव व भुजाडे होते. शहर व ग्रामीण भागातिल नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम सूत्र संचलन भागवत निकम यांनी तर आभार पंकज साळुंके यांनी मानले,तुलसी आय हॉस्पिटलचे डॉक्टर शेखर सोनवणे, डॉ, हर्षद पाठक, अनिल देवरे यांनी नेत्ररुग्ण तपासणी केली. आनंद हॉस्पिटलचे डॉ. नीरज बाविस्कर डॉ,अभिजित राठोड, डॉ. अश्विनी गायकवाड व डॉ. प्रियांका गायकवाड यांनी सर्वांची आरोग्य तपासनी केली. या प्रसंगी गणेश इंगळे,विशाल शिंदे, मंगेश भागवत, दीपक साळुंकेयांनी सहभाग नोंदविला.



# पोलीस कर्मचारी, पोलीस पाटलास एका वर्षाची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील सात वर्षांपूर्वी लगळूद ( ता. भोकर ) येथील एका आरोपी विरूध्द एनसी दाखल झाली होती. पाच हजार रूपये दिले तर ठिक नाहीतर पोलीस कोठडीत ठाकतो म्हणून पोलिस कर्मचाऱ्यांनी धमकावले.लगळूद येथील पोलिस पाटलांच्या मदतीने लाच घेतल्याचे निष्पन्न झाल्याने दोघाना येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश वाय.एच.खरादि यांनी शुक्रवारी ( ता. ११ ) एका वर्षाची शिक्षा ठोठावली आहे. न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादि दिंगबर गणपत बागडे राहणार लगळुद ( ता. भोकर ) यांच्याविरुद्ध शेती प्रकरणात २९ जूलै२०१६ रोजी येथील पोलीसात एनसी हा गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणात अटक करून पोलिस कोठडीत टाकण्याची भीती दाखवून जामीन करून देण्याच्या कामासाठी अरोपी पोलिस नाईक शिवराज विश्वंभर टरके यांनी तडजोडी अंती ( पाच हजार रूपये ) पंचासमक्ष लाचेची मागणी केली. सदर कार्यवाही दरम्यान अरोपी संजय उमाकांत राजुरे ( पोलिस पाटील,रा.लगळूद ) यांनी तक्रार दाराकडुन पाच हजार रुपये घेऊन पोलीस नाईक श्री.टरके यांना दिले व जामीन घेण्याचा पाठपुरावा केला. लाच मिळाल्याच्या कृतीवरून प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने दोन्ही लोक सेवकानी त्यांना मिळणारे कायदेशीर परीश्रमिका शिवाय पारीतोषण म्हणून स्वतःसाठी पैशाच्या स्वरूपात लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला.दोघाविरूध्द लाचेची मागणी केल्या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध नियमानुसार गुन्हा दाखल करून न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले. सरकिरी पक्षातर्फे चार साक्षीदार तपासुन साक्षपूरावा व सबळ पुराव्या आधारे दोन्ही आरोपींना दोषी ठरविण्यात आले आहे.न्यायालयाने शूक्रवारी दोघांना एक वर्षाची शिक्षा व२०००रूपये दंड न भरल्यास साधी कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सौ.शैलजा अनिल पाटील यांनी काम पाहिले आहे.तपासीक अंमलदार दयानंद मूरलीधर सरवदे,पैरवी अधिकारी प्रदीप कंधारे यांनी मदत केली आहे.



# सर्व सरकारी नोकऱ्यांच्या परीक्षा निःशुल्क घ्याव्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यात २०२३ मध्येच सरकारी नौकऱ्याची भरती सुरु आहे. या नोकर भरतीत भरला जाणारा फॉर्म शंभर रुपये ऐवजी हजार रुपये पर्यंत परीक्षा शुल्क वाढविल्याने बेकार तरुणांना वेगवेगळया ठिकाणी नोकरीसाठी इतकी फिस भरणे शक्य नाही, एक तर हा तरुण बेकार असल्याने पुन्हा तीन चार ठिकाणी फॉर्म भरतांना दोन ते तीन हजार रुपयांचा या बेकारीत बेकारांना फटका बसतो. तसेच परीक्षा ज्या ठिकाणी होणार आहे, तेथे जाण्या-येण्यासाठी खर्च एक हजार रुपये बेकार तरुणांना न परवडणारा आहे. परीक्षा शुल्कच्या माध्यमातून कोटयावधी रुपयांची लूट चाललेली आहे, सरकार दररोज अब्जावधी रुपये जनतेकडून जीएसटी च्या नावाखाली मुघलांच्या जिजीया कराप्रमाणे लुटत आहे. जीएसटीच्या पैशातून बेकार तरुणाच्या परीक्षा शुल्क घ्यावे. व परीक्षा सेंटरवर कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीएसटीच्या पैशातून पगारी कराव्यात. सरकारला सत्तेत ही तरुणाईच पाठवते तेव्हा तुमच्या पेंन्शन बंद करा, तुम्ही सेवक आहात, सरकारी नोकर नाही, तुमच्या पेंन्शन मधून बेकार तरुणांना बेकार भत्ता तरी द्यावा, सरकारने सर्व सरकारी नोकऱ्याच्या परीक्षा निःशुल्क घ्याव्यात तसेच, एवढया हजारो शुल्क भरुन परिक्षा केंद्रावर कुठल्याही सवलती दिल्या जात नाही, तेथे पार्कींगचेही शुल्क भरावे लागतात, बॅग, मोबाईल ठेवण्यासाठी पैसे भरावे लागतात, म्हणजे बेरोजगार तरुणाईची किती लूट चालू आहे. यावरुन स्पष्ट होते. तरी याबाबत उचित कारवाई होणे अपेक्षित आहे. गोरगरीब बेरोजगार तरुणांचा सरकारने विचार करावा, आणि सर्व सरकारी नोकऱ्याच्या परीक्षा निःशुल्क घ्याव्यात अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( सचिन खरात ) गटच्या वतीने विभागीय आयुक्त यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर जिल्हाअध्यक्ष मनीष नरवडे जिल्हाउपाध्यक्ष योगेश उबाळे करण ठोंबरे, आकाश साबळे, कैलास जाधव यांच्या सह्या आहेत.



आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424




मेतकूट हे नाव नुसते ऐकले तरी डोळे बंद केले तरी खमंग मेतकूट ,गरम गरम मऊसुत भात ,वर साजूक तुपाची धार व किंचित मीठ घातलेला भात दिसतो आणि मग... तोंडाला पाणी सुटले ना ? ..मग वाट कशाची पाहताय !चला लगेंच ताजे ताजे मेतकूट बनवूया .

**साहित्य :** 1 वाटी फुटाणे डाळवं, अर्धी वाटी तांदूळ, 1 चमचा गहू , अर्धी वाटी उडीद डाळ, 1 ते दीड चमचा हळद पूड किंवा हळकुंड, 1 खडाहिङगाचा खडा , 1 लहान सुंठ कोंब किंवा पाव चमचा सुंठ पावडर, पाव चमचा तिखट किंवा 2 लाल मिरच्या , पाव चमचा मेथ्या , पाव चमचा मोहरी किंवा मोहरीची डाळ ,1 चमचा तीळ , चिमूटभर मिरपूड , 2..3 लवंगा, लहान दालचिनीचा तुकडा, पाव चमचा जिरे,1 चमचा धणे, 1 चमचा मीठ.

**कृती :** प्रथम कढई गॅसवर ठेवून गरम झाली की सर्वांत आधी तांदूळ मध्यम आचेवर थोडा रंग बदलेपर्यंत भाजावेत .मग ते खाली काढून त्याच कढईत उडीद डाळ गुलाबी रंगावार खमंग भाजावी . नंतर ती काढून गहू तडतंडून हलके होईपर्यंत भाजून खाली काढावेत .आता मंद गॅस करून कढई मध्ये मेथ्या व त्यानंतर धने व जिरे , मिरे ,लवङ घालून ते गरम झाले की त्यातच सुंठ किंवा पावडर व हिंग ,हळद घालून शेवटी तिखट ,मीठ घालून गॅस बंद करावा . मिक्सरच्या भांड्यात सर्वांत आधी उडीद डाळ ,गहू घालून बारीक करावे .ते काढून मग तांदूळ व डाळव घालून एकदम बारीक म्हणजे पीठच करून घ्यावे .आता बाकीचे शिल्लक बारीक सर्व साहित्य घालून व्यवस्थित फिरवून दळून घ्यावे . यांचा खूपच सुरेख घमघमाट दरवळतो . ते काढून पुन्हा त्यात फिरवलेले खालचे पीठ घालून पुन्हा फिरवावे म्हणजे मिक्सरच्या भांड्यातील सर्व बारिक जिनसांची पूड त्याच्याबरोबर राहील .मग सर्व छान एकत्र करून मस्त फिरवावे . मग बारीक जाळीच्या चाळणीने चाळून घ्यावे . थंड होताच लगेंच घट्ट झाकणाच्या बरणीत आधी थोडे भरून मध्ये 1 मोठा हिंगाचा खडा ठेवावा .व मग सर्व मेतकूटभरुन झाकण घट्ट बंद करावे म्हणजे सुगंध मुरेल व जास्त दिवस छान राहील . **वैशिष्ट्य :** मेतकूट करण्यासाठी साहित्याचे प्रमाण प्रत्येक जण आपापल्या चवीच्या आवडीनुसार कमी जास्त करू शकतात .कोणी डाळव म्हणजेच पंढरपूरी फुटाणे डाळाच्या ऐवजी हरभऱ्याची डाळ घालतात .मग तांदूळ जास्त घालतात कारण ही डाळ थोडी उग्र असते व तांदूळामुळे त्याला सौम्यपणा येतो .ज्यांना जास्त तिखटपणा आवडत नाही ते तिखट घालत नाहीत. कारण सुंठ, लवंग ,मिरे यांचा तिखटपणा येतोच .हळद मात्र छान पिवळा रंग येईल अशी घालावी. मेतकूट फक्त भाता वरच खातात असे नाही तर अनेक पदार्थात खास त्याचा वापर केला जातो भडंग , दुधी भोपळ्याचे रायते, लावलेले पोहे वगैरे... तसेंच नुसते मेतकूट, तूप, किंचित मीठ पोळी बरोबर सुद्धा छानच लागते. मेतकूटात मसाला ,मीठ, किंचित साखर ,कोथिंबीर, थोडेसे दाण्याचे कुट घालून तेलाची फोडणी भरपूर करून त्यात घालून तर भाकरी बरोबर कांद्यासोबत जेवण म्हणजे स्वर्गसुखचं ! दह्यात घालून त्यात कुट ,मीठ ,साखर ,बारीक चिरलेला कांदा ,कोथिंबीर घालून फोडणी दिली की झक्कास ! कोणत्याही पक्वांनांना लाजवेल अशी जबरदस्त टेस्ट या मेतकूटात आहे .साक्षात देवांनासुद्धा मेतकूट खाण्याचा मोह आवरत नसावा म्हणूनच कुळधर्मात सुद्धा आवर्जून मेतकूट करतात.

# मनपाद्वारे निःशुल्क राष्ट्रध्वज

## जवळपास ६० हजार घरी वितरित होणार ध्वज

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव साजरा करीत असताना जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती चिरंतन तेवत रहाव्यात तसेच देशभक्तीची जाज्वल्य भावना मनात कायम रहावी, या भावनेने आपल्या इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करण्याच्या उद्देशाने 'हर घर तिरंगा' उपक्रम राबविला जात आहे. उपक्रम यशस्वी होण्याच्या दृष्टीने चंद्रपूर महानगरपालिकेद्वारे घरोघरी निःशुल्क ध्वज वितरण करणे सुरु करण्यात आले असुन जवळपास ६० हजार घरी राष्ट्रध्वज वितरीत केले जाणार आहे.

आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमाच्या समारोपीय उपक्रमाबाबत संपुर्ण देशात व राज्यात मेरी माटी मेरा देश म्हणजेच माझी माती माझा देश अभियान दि.९ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२३ दरम्यान व हर घर तिरंगा उपक्रम १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविण्यात येत आहे. चंद्रपूर महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त घरांवर नागरीकांनी स्वयंस्फुर्तीने तिरंगा फडकविणे या उपक्रमांतर्गत अपेक्षित आहे. याअंतर्गत महिला बचत गट, आशा वर्कर, एनएमएम, मनपाचे कर निरीक्षक यांच्याद्वारे परिसर निश्चित करून ध्वज वितरण करण्यात येत आहे.

राष्ट्रध्वज हे कोणतेही मुल्य न स्वीकारता वितरीत करण्यात आहे,मात्र कुणी रुपये २५ हे स्वागतमुल्य स्वेच्छेने देत असेल तर ते स्वीकारण्यात येईल व अश्या स्वागतमुल्य देणाऱ्या व्यक्तींकडुन प्राप्त निधीचा वापर मनपा शालेय विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी



करण्यात येणार आहे. तिरंगा घरी उंचावतांना राष्ट्रध्वजाचा पुर्ण सन्मान होईल या दृष्टीने ध्वजसंहितासुद्धा देण्यात येत आहे.

आपल्या देशाबद्दल प्रत्येकाच्या मनात असलेला आदर व सन्मान अभिव्यक्त करण्यासाठी 'हर घर तिरंगा' हा अतिशय अभिनव उपक्रम ही एक चांगली संधी असून यामध्ये नागरीकांनी सक्रीय सहभागी होऊन आपल्या घरावर १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत तिरंगा उंचवावा असे आवाहन महापालिका आयुक्त विपीन पालीवाल यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# कनकशीळ आरोग्यवर्धिनी केंद्रात क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियानास सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कनकशीळ येथे क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियाना अंतर्गत आरोग्य वार्धिनी केंद्र कनकशीळ यांच्या वतीने कानडगाव येथे विविध शालेय उपक्रम व ग्राम पंचायत येथे मिटिंगचे आयोजन करण्यात आले होते. जि. प. शाळा येथे शालेय विद्यार्थ्यांना क्षयरोगाबाबत सर्व माहिती देण्यात आली. आरोग्य शिक्षण देण्यात आले क्षयरोग कसा होतो त्याची लक्षणे काय उपचार काय याबद्दल माहिती देण्यात आली, गावात शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढुन त्यामाध्यातुन प्रचार प्रसार आणि जनजागृती करण्यात आली तसेच ग्रुप ग्रामपंचायत कानडगाव येथे सर्व सन्माननीय सरपंच उपसरपंच, ग्रामसेवक,ग्रामपंचायत सदस्य अंगणवाडी कार्यकर्ते शाळा मुख्याध्यापक आरोग्य कर्मचारी यांच्या अध्यक्षतेखाली क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत मीटिंग घेण्यात



आली यामध्ये पेशंट सपोर्ट ग्रुप तयार करण्यात आला. या अभियानांतर्गत सर्व गाव आणि आरोग्य कर्मचारी यांच्या प्रयत्नातून क्षयरोग मुक्त गाव करण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच निक्षय मित्र या संकल्पनेचे महत्व सांगुन गावातील 2 सन्माननीय व्यक्ती निक्षय मित्र बनवण्यात आले. त्यांनी यासाठी नेहमीच सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गावातील टी बी चॅम्पियनच्या माध्यमातुन क्षयरोग समुळ नष्ट करण्याचा निर्धार केला,प्रास्ताविक समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रमेश शेळके यांनी केले. उपक्रमांविषयी अनिल बनकर यांनी माहिती दिली तर ग्रामसेवक पवार यांनी आभार मानले. याप्रसंगी कानडगाव सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,मुख्याध्यापक, तालुका क्षयरोग पर्यवेक्षक,आरोग्य सेविका,आरोग्य सेवक, समुदाय आरोग्य अधिकारी, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा इ उपस्थित होते.

# दूधगंगेच्या पाण्यासाठी इचलकरंजीकर एकवटले

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** दुधगंगेच्या पाण्यासाठी मनाची साखळी करीत इचलकरंजीकर एकवटल्याचे बुधवारी दिसून आले. यावेळी श्रेयवादाचे राजकारण दिसून आले. आमदार प्रकाश आवाडे, माजी खासदार राजू शेट्टी यांना रोखण्याचा प्रयत्न झाल्याने एकीच्या प्रयत्नांना गालबोट लागले. कागल तालुक्यातून दुधगंगा पाणी योजनेला विरोध होत आहे. तर इचलकरंजीत आज क्रांती दिनी जय सांगली नाका ते महासत्ता चौकापर्यंत अशी सुमारे तीन किलोमीटर लांब मानवी साखळी केली होती.

सुळकुड पाणी योजना कृती समितीचे सर्व सदस्य, सर्वपक्षीय राजकीय नेत्यांसह सामाजिक कार्यकर्तेही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातातील फलक आणि डोक्यावरील घागरी लक्ष वेधून घेत होते. आंदोलनात सांगली रोड परिसर, सांगली नाका ते पोट फाडी चौक भागातील सर्व पक्षीय सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, लहान मुलांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मानवी साखळीला राजकीय वादाची किनार लागली. पक्षीय झेंडे घेऊन आंदोलनात उतरायचे नाही असा निर्णय झाला होता. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते बिल्ले लावून आल्याने त्यांना ते काढण्यास भाग पाडण्यात आले. तर आंदोलनाविषयीचे माहिती माध्यमांना कृती समिती सदस्यांनी द्यायचे असे ठरले असताना स्वाभिमानी संघटनेचे नेते राजू शेट्टी हे बाईट देत असताना त्यास आक्षेप घेऊन रोखण्यात आले. आंदोलनावेळी आपल्या प्रभागातच माजी नगरसेवक, स्थानीक कार्यकर्त्यांनी थांबायचे असे निश्चित झाले होते. पण आमदार प्रकाश आवाडे हे आंदोलनाच्या मार्गावर फिरत असल्याने त्यांनाही रोखण्याचा प्रयत्न झाला. त्यावर त्यांच्या कार्यकर्त्यांनी ते आमदार असल्याने एका जागी न थांबता त्यांना अन्यत्र जाण्याची मुभा असू शकते असे उत्तर दिल्याने मतभेद निर्माण झाले. खासदार धैर्यशील माने यांनी भ्रमणध्वनी वरून भाषण केल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.




# कापूस शेतीशाळांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे पळाशी येथे तालुका कृषि अधिकारी मदन सिसोदिया व मंडळ कृषि अधिकारी एस जी वाघ याच्या मागदर्शनाखाली राज्य पुरस्कृत एकात्मीक कापूस उत्पादन वाढ व मुल्य साखळी विकास योजना अंतर्गत कापूस पिकाची शेतीशाळा वर्ग घेण्यात आला यात कापूस एकात्मिक किड व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन कृषि पर्यवेक्षक किशोर महाजन यांनी केले तर निबोळी अर्क व दशपर्णी अर्क कशा प्रकारे तयार केले जाते या विषयी माहिती कृषि सहाय्यक आर एन सोळके यांनी माहिती दिली तसेच पिकात असलेले शत्रु किडी व मित्र किडीची ओळख शेतकऱ्याना करून दिली.शेतकऱ्यांची शेती शाळा कार्यक्रम व गाव बैठक माध्यमाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

पिकाची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना अंतर्गत मौजे पळशी शिवारात कापूस पिक अंतर्गत कापूस पीक शेतकऱ्यांची शेतीशाळा व गाव बैठक माध्यमाने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी व कापूस उत्पादन वाढ करण्याच्या दृष्टीने

शेतकऱ्यांना विविध उपाय योजना सुचविण्यात आले त्यात शेतकरी यांच्या कापुस प्रक्षेत्रवर जाऊन कापूस पीक परिसंस्थेच्या अभ्यास पिकाचे निरीक्षणे घेऊन प्रत्यक्ष कृतीतून पिकावरील नुकसानकारक शत्रू कीड ओळख आणि मित्र किडींची ओळख करणे एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन ,कामगंध सापळे , निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, रस शोषणारे किडी मावा, तुडतुडे, फुलकिडे ,पांढरी माशी यांचे नियंत्रण बाबत मार्गदर्शन ,गुलाबी बोंडअळीचे व्यवस्थापन, मका पिकावरील लष्करीअळीचे व्यवस्थापन , एकात्मिक तण व्यवस्थापन, मृद आरोग्य पत्रिका आधारित किंवा जमीन सुपीकता निर्देशांक व पीक शिफारस नुसार एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थपन व पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार फवारणीद्वारे खते देणे ,ठिबक सिंचनाच्या माध्यमातून विद्राव्य खतांचा वापर करणे, असे उपाय योजना कृषी सहायक किशोर महाजन यांनी सुचविण्यात आले. 15 ते 30 ऑगस्ट 2023 हा पंधरवडा केंद्र शासन सहाय्यित पंतप्रधान मंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवण्यासाठी सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगाविषयी माहिती देऊन शेतकरी गटांना व वैयक्तिक लाभासाठी शेतकऱ्यांना शेती पूरक व्यवसायबाबत कृषी सहाय्यक सोळंके यांनी माहिती दिली. यावेळी शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित व पदाधिकाऱ्यांचे आणि उपस्थित मार्गदर्शनसाठी उपस्थित कृषी अधिकारी व कर्मचारीचे यांचे आभार मानले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# शहराला पाणी पुरवठा करणारे जलस्रोत दूषित होऊ देऊ नका

## आ. किशोर जोरगेवार : विविध विभागाच्या अधिकाऱ्यांशी बैठक, इरई नदीची केली पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूरकरांसाठी जलवाहिनी असलेल्या इरई नदीतील पाणी दुषित झाल्याच्या घटना वारंवार घडत आहे. ही बाब नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असल्याने असे प्रकार खपवून घेतल्या जाणार नाही. भविष्यात असे प्रकार घडणार नाही यासाठी संबंधित सर्व विभागाने आपसात योग्य समन्वय ठेवत शहराला पाणी पूरवाठा करणारे जलस्त्रोत दुषित होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिकाऱ्यांना केल्या आहे.

शहरातील इरई नदीतील पाणी दुषित झाले आहे. त्यामुळे आमदार किशोर जोरगेवार यांनी हिराई विश्रामगृह येथे विविध विभागाच्या अधिका-यांची बैठक घेत त्यांना आवश्यक सुचना केल्या आहे. बैठकीनंतर त्यांनी दाताळा जवळ असलेल्या मनपाच्या जलशुध्दीकरण केंद्राला भेट देत नदीपात्रातील पाण्याची पाहणी केली. यावेळी सिएटीपीएसचे मुख्य अभियंता जि. एस कुमरवार, मनपाचे अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, मनपा शहर अभियंता महेश बारई, सीएसटीपीएसचे रामटेके, प्रदूषण विभगाचे अधिकारी उमेश भादुले, तहसीलदार विजय पवार आदी अधिका-यांची उपस्थिती होती.

इरई नदीतील पाणी गढूळ झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे शहरातील काही भागातील पाणी पूरवठा बंद ठेवण्यात आला आहे. या पाण्याचा नमुनाही तपासणी करिता लॅबमध्ये पाठविण्यात आला आहे. याचा अहवाल येईपर्यंत पाणी पूरवठा बंद राहणार असल्याचे महानगरपालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे. सिएसटीपीएस चे घाण पाणी इरई नदीपात्रात सोडल्याने पाणीसाठा प्रदूषित झाल्याचे बोलल्या जात आहे. प्रदूषण विभागाच्या वतीने सिएसटीपीएस कंपनीला नोटीस बजावली आहे. दरम्यान आज शुक्रवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिका-यांसह इरई नदीची पाहणी केली असून पाणी प्रदूषित होण्यामागची कारणे जाणून घेतली आहे. पाणी दुषित झाल्याने शहरातील काही भागातील पाणी पूरवठाही बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या भागात



महानगरपालिकेने टँकरने पाणीपुरवठा करावा अशा सुचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा अधिका-यांना केल्या आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपाच्या जलशुध्दीकरण केंद्रालाही भेट देत शुध्दीकरण केंद्राच्या वतीने पाणी शुध्द करण्याच्या प्रक्रियेबाबतची माहिती जाणून घेतली. पाणी पूर्णतः शुध्द झाल्याशिवाय येथील पाणी नागरिकांना पूरविण्यात येऊ नये अशा सुचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी दिल्या आहे. पाणी पुरवठा बंद असलेल्या भागातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना करण्याच्याही त्यांनी मनपा प्रशासनाला सूचना केल्या आहे. नागरिकांना दुषित पाण्याचा पूरवठा होणार नाही याकडे विषेश लक्ष देण्याचेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा अधिका-यांना सांगितले आहे.उद्भवलेल्या परिस्थितीवर लवकरात लवकर तोडगा काढून पाणी शुद्धीकरण करत किंवा आवश्यक त्या उपाययोजना करून पाणी पूरवठा सुरळीत करण्यासंदर्भात नियोजन करण्याच्या सुचनाही यावेळी त्यांनी मनपा प्रशासनाला केल्या आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे यंग चांदा ब्रिगेडचे जिल्हा महानगर अध्यक्ष पंकज गुप्ता, आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, अल्पसंख्याक विभागाचे शहर युथ अध्यक्ष राशेद हुसेन, शहर संघटक विश्वजीत शाहा, युवा नेते अमोल शेंडे, विनोद अनंतवार हरमन जोसेफ, ॲड. परमहंस यादव,ताहिर हुसेन, कार्तिक बोरेवार, सतनाम सिंह मिरधा, उपस्थित होते.



# 'गाव तेथे शाखा ! घर तेथे शिवसैनिक'

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे साहेब यांचे प्रतिनिधी परभणी जिल्ह्याचे शिवसेना पक्ष निरीक्षक सुभाषजी साळुंखे साहेब यांनी दिनांक 10 ऑगस्ट 2023 गुरुवार रोजी शिवसंघटन अभियानांतर्गत जिंतूर येथील शिवसेना पदाधिकारी तसेच शिवसैनिकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. पक्ष संघटना वाढीसाठी शिस्त महत्त्वाची असून सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय साधून 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हे धोरण राबवत तळागाळापर्यंत कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत

> शिव संघटन अभियानांतर्गत मा . पक्ष निरीक्षक सुभाष साळुंखे साहेबांना जिंतूर शिवसेना पक्ष संघटनेचा आढावा सादर केला असता साहेबांनी जिंतूर तालुक्यातील पक्ष संघटना वाढीसाठी आवश्यक ते बळ देण्याचे आश्वासन दिले .

कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रातील कल्याणकारी योजना शेतकरी, बालक, युवक, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा असे शिवसैनिकांना, बुथप्रमुखांना, शिवदुतांना आवाहन केले. याप्रसंगी, परभणी जिल्ह्याचे संपर्कप्रमुख माजी खासदार सुरेश रावजी जाधव साहेब, सह-संपर्कप्रमुख भास्करराव लंगोटे साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे, बहुजन आघाडी जिल्हा प्रमुख धम्मदीप रोडे, महिला जिल्हाध्यक्ष सौ. गीता सूर्यवंशी, युवा जिल्हाध्यक्ष दीपक भाऊ टेंगसे, उपजिल्हाप्रमुख प्रल्हाद होगे पाटील, उपजिल्हाप्रमुख केशव कदम, महिला उपजिल्हाप्रमुख सौ. सुशीला ताई चव्हाण, नरेश शेठ खैरजानी, जिंतूर शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. सुनिल शिवाजीराव बुधवंत, महिला तालुकाप्रमुख सौ. अक्षता पाटील, तालुका संघटक अंकुश राठोड, उप तालुकाप्रमुख डॉ. विजय वटाणे पाटील, उप तालुकाप्रमुख सोपान राजे देशमुख, तालुका सचिव अशोक देशमुख, शहर प्रमुख कल्याणराव देशमुख, शहर संघटक संतोष मोरे, महिला शहर प्रमुख सौ. जया थिटे, उपशहर प्रमुख शिवाजी पुणेकर, युवा शहर प्रमुख श्री. गजानन गीते इत्यादी पदाधिकारी, शिवसैनिक तसेच महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# एसटी महामंडळाचे ११ कर्मचारी निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** तिकीट साठ्यात तफावत दिसून आल्यानंतर या प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवालात दोषी आढळल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या ११ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे एसटी महामंडळात खळबळ उडाली आहे. एसटी महामंडळाच्या अमरावती आगारात सन २०१९ ते २०२२ या कालावधीत प्रवाशाच्या तिकीट साठ्यामध्ये तफावत आढळून आली होती. या प्रकरणी विभाग नियंत्रकांनी चौकशीचे आदेश दिले होते. यानुसार विभागीय वाहतूक व लेखाअधिकारी यांच्या पथकाने या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करून याबाबतचा अहवाल आगार व्यवस्थापकांना सादर केला. तिकीटसाठा अद्ययावत न ठेवता या कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवून सहायक वाहतूक अधिकारी, तत्कालीन आगार लेखापाल यांच्यासह सहा लिपिक, ३ वाहतूक नियंत्रक अशा अमरावती आगारातील ११ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# मुलीला फोटो दाखवीत केला विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** अल्पवयीन मुलीला तुझे असलेले फोटो मोबाइलद्वारे व्हायरल करणार असल्याची धमकी देत विनयभंग केल्याचा प्रकार ९ ऑगस्ट रोजी घडला. याप्रकरणी वडोदबाजार पोलिस ठाण्यात पीडितेच्या फिर्यादीवरून नारायण संजय मालोदे ( रा. दरेगाव दरी, ता. फुलंब्री ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नारायणने पीडितेचे फोटो व्हायरल करेल अशी धमकी देत तिच्या आजीच्या मोबाइलवर मेसेज करून घराजवळील शेडमध्ये बोलावून घेतले व तू बोलत का असे म्हणून बळजबरीने विनयभंग केला. तपास सपोनि. विलास मोरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस करत आहेत.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर